सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, ६ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ३० । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विनम्र अभिवादन



भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाणदिन



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचा आज तिथीनुसार जन्मदिन

# ते पुन्हा आले! 'देवा' युगाचा प्रारंभ

**देवेंद्र फडणवीसांचा महाशपथविधी सोहळा** | **तिसऱ्यांदा घेतली मुख्यमंत्रिपदाची शपथ** | **एकनाथ शिंदे, अजित पवार उपमुख्यमंत्री** | **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विशेष उपस्थिती**



आझाद मैदानात आयोजित महासोहळ्यात मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांचा हात हातात घेऊन अभिनंदन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

**मुंबई, ५ डिसेंबर : २०१९ च्या निवडणुकीत केलेली 'मी पुन्हा येईन'ची घोषणा करणारे देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस दिलेल्या शब्दाला जागत महाराष्ट्राच्या सेवेत पुन्हा एकदा आले. भाजपा विधिमंडळ पक्षाचे नेते फडणवीस यांनी गुरुवारी सायंकाळी ५ वाजून ३५ मिनिटांनी राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांनी मुख्यमंत्री म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेण्याचा बहुमान पटकावला आहे.**

**यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी देवेंद्र फडणवीस यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या शपथविधी सोहळ्याला राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उद्योगपती, खेळाडू आणि सिनेकलाकारांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती.**







राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले तिन्ही पक्षांचे हजारोंच्या संख्येने आलेले कार्यकर्ते या भव्यदिव्य शाही सोहळ्याचे साक्षीदार झाले. शपथविधीसाठी भव्य शामियाना उभारण्यात आला होता. यात तीन भव्यदिव्य मंच तयार करण्यात आले होते. मध्यस्थानी असलेल्या मंचावर शपथविधी सोहळा पार पडला. तर, मधल्या प्रमुख मंचाच्या आजूबाजूला एका मंचावर सांस्कृतिक कार्यक्रम आणि दुसऱ्या मंचावर धर्मगुरूंची उपस्थिती होती.

**एकनाथ शिंदे, अजित पवारांचाही शपथविधी**

शेवटच्या क्षणापर्यंत सत्तेत सहभागी होणार किंवा नाही, याबाबत प्रचंड सस्पेन्स निर्माण करणारे शिवसेनेचे पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अखेर उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. काहीही झाले तरी आपण तर उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारच, असे आधीच सांगून मोकळे झालेल्या अजित पवारांनीदेखील उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवारांनी उपमुख्यमंत्री म्हणून सहाव्यांदा शपथ घेऊन एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

**महायुतीचे मंत्री आठवडाभरात शपथ घेतील**

महाराष्ट्रातील महायुतीचे मंत्री आठवडाभरात शपथ घेतील, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी गुरुवारी दिली.

गुरुवारी सायंकाळी सहाव्यांदा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलेले आमचे नेते अजित पवार यांची वित्त विभागावर चांगली पकड आहे, असे छगन भुजबळ यांनी सांगितले. महत्त्वाचे म्हणजे, यापूर्वीही अजित पवार यांच्याकडे अर्थ मंत्रालय होते. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर महायुतीचे नेते मंत्रिमंडळाची रचना बैठक घेऊन ठरवतील. मंत्रिमंडळ स्थापनेच्या पद्धतीवर तिन्ही नेते चर्चा करतील आणि आठवडाभरात मंत्रिमंडळ स्थापन होईल, असे भुजबळ म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

## अक्कलकोटमध्ये गुरुवारी रात्री पावसाच्या सरी

**अक्कलकोट** : अक्कलकोट शहरात पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. गेली तीन चार दिवस ढगाळ हवामान पावसाच्या सरी यामुळे द्राक्ष, डाळींब, कांदा, सिताफळ, टमाटे आदी फळ पिकांना मारक असल्याचे बोलले जात आहे. सध्या अक्कलकोटवासीय गरम, पाऊस, थंडी या तीनही हवामानाचा अनुभव घेत आहेत.

# आता महाराष्ट्र थांबणार नाही : फडणवीस

◆ **मुंबई, ५ डिसेंबर**

नीट योग्य नियोजन करीत महाराष्ट्राला पुढे न्यायचे आहे. राज्यातील १४ कोटी जनतेला आश्वासित करू इच्छितो की, आमचे सरकार आपल्या सेवेत पारदर्शीपणे काम करेल आणि एक लोकाभिमुख सरकार देईल, अशी हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली.

पहिली मंत्रिमंडळाची बैठक पार पडल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, वचननाम्यात दिलेली सर्व आश्वासने पूर्ण करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. बदल्याचे नाही तर, बदलाचे राजकारण आम्हाला करायचे आहे. विरोधकांच्या संख्येनुसार मूल्यमापन करणार नाही. योग्य विषय मांडले तर त्याला पूर्ण सन्मान देऊ. लोकशाही मूल्यांचे पूर्ण पालन करू, असे फडणवीस म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### ७ ते ९ मुंबईत विशेष अधिवेशन

सरकार स्थापन झाल्यावर आमदारांना शपथ देणे आणि विधानसभा अध्यक्षांची निवड करणे ही प्रक्रिया तातडीने करणं आवश्यक असल्याने, ७ ते ९ डिसेंबर या कालावधीत मुंबईत विशेष अधिवेशन घेण्यात येणार आहे. पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन याबाबतचा प्रस्ताव राज्यपालांकडे पाठविण्यात आला आहे. यात नवनिर्वाचित आमदारांना शपथ दिली जाईल, विधानसभा अध्यक्षांची निवड केली जाईल. ९ तारखेला राज्यपालांचे अभिभाषण होईल. त्यानंतर नियमित हिवाळी अधिवेश नागपूर येथे पार पडणार आहे. अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### विरोधी पक्षनेता ठरविण्याचा अधिकार अध्यक्षांचा

विरोधकांकडे विरोधी पक्षनेता नियुक्त केला जाईल, एवढे १० टक्के संख्याबळ नसल्याने विरोधी पक्षनेतेपद यावेळी नसेल, याची शक्यता अधिक आहे. यावर भाष्य करताना फडणवीस म्हणाले की, हा विषय सभागृहातला असून, सभागृहातील कामकाज अध्यक्षांचे विशेषाधिकार असतात. नियमात जे असेल, ते तपासून विधानसभाध्यक्ष याबाबतचा योग्य निर्णय घेतील.

### नागपूर अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार

नागपूर अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार केला जाईल आणि मंत्रिमंडळातील अन्य सहकारी मंत्र्यांचा शपथविधी होईल. असे फडणवीसांनी सांगितले. त्यामुळे येत्या ७ ते ९ डिसेंबर दरम्यान होऊ घातलेल्या विशेष अधिवेशनाप्रसंगी मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे.

### एकही विरोधक दिसला नाही

मुंबईत झालेल्या महायुतीच्या दैदीप्यमान शपथविधी समारोहाला अनेक दिग्गजांनी हजेरी लावली. मात्र, राजकीय विरोधक असलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या सोहळ्याकडे पाठ फिरविल्याचे दिसले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार, नाना पटोले यासारख्या दिग्गजांना वैयक्तिक फोन करून निमंत्रण दिले. मात्र, त्यांच्या खाजगी कारणांमुळे ते येऊ शकले नसावे, असे फडणवीस म्हणाले.

## सरकार स्थापन होण्यापूर्वी महाराष्ट्राला मिळाले १,५९५ कोटी

**मुंबई, ५ डिसेंबर -**

जागतिक बँकेने महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी १८८.२८ दशलक्ष डॉलर्सचे (१,५९५ कोटी) कर्ज मंजूर केले आहे. या कर्जाचा वापर विशेषतः मागासलेल्या जिल्ह्यांतील विकास कामांसाठी करण्यात येणार आहे. बँकेने एका निवेदनात म्हटले आहे की, १,५९५ कोटींचा निधी महाराष्ट्रातील मागास भागांच्या विकासासाठी वापरला जाईल. यात मागास जिल्ह्यांध्ये संस्था बळकट करणे, जिल्हा स्तरावर नियोजन करणे आणि विकासासाठी धोरण राबवणे यांचा समावेश आहे. गुंतवणूक वाढल्याने राज्यातील मागास जिल्ह्यांचा विकास होऊन रोजगाराच्या संधी वाढतील. कर्जाची रक्कम या जिल्ह्यांतील विकासासाठी आवश्यक कौशल्ये निर्माण करण्यासाठी वापरली जाईल. यामुळे व्यवसायासाठी सरकारी आणि खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढेल.




# सत्ता आमच्यासाठी जनसेवेचे साधन : शिंदे

◆ **मुंबई, ५ डिसेंबर**

अडीच वर्षे सर्वसामान्यांचे सरकार सत्तेत होते. पदापेक्षा मी कार्यकर्ता म्हणून काम केले असून, यापुढेही कार्यकर्ता म्हणूनच काम करणार असल्याचे सांगत सत्ता आमच्यासाठी जनसेवेचे साधन राहिली आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदावर विराजमान होताच गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन जनतेशी संवाद साधला.

गेले अडीच वर्षे सर्वसामान्यांचे सरकार सत्तेवर असताना देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी मला सहकार्य केले. याबरोबर केंद्रानेही पाठबळ दिल्याने अनेक कल्याणकारी योजना, विकासकामे पूर्ण आम्ही पूर्ण केली, असे शिंदे यांनी सांगितले.

लाडकी बहीण-भाऊ, लाडक्या शेतकऱ्यांचा आशीर्वाद मिळाल्यानेच महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आले. आम्ही चाळीस आमदार होतो. विधानसभा निवडणुकीनंतर माझे ६० आमदार निवडून आले, ही आमच्या कामाची पावती आहे. मला काय मिळाले, यापेक्षा जनतेला काय मिळणार ही भावना मनात ठेवून आम्ही काम केल्यानेच जनतेने आम्हाला आमच्या कामाची पोचपावती दिली. मुख्यमंत्री असताना मी 'कॉमन मॅन' म्हणून काम केले. यापुढेही देवेंद्र फडणवीस यांना सहकार्य करत आम्ही टीम म्हणून काम करणार असल्याचेही एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

**बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन**

उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर आणि पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुलाबा येथील हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. (वृत्तसंस्था)

### पहिली स्वाक्षरी...

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली. पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखांची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचा निर्देश त्यांनी दिला. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती. ती मान्य करण्यात आली.

# सूर्याच्या वातावरणाची रहस्ये उलगडणार!

### इस्रोकडून प्रोबा-3 चे यशस्वी प्रक्षेपण

**श्रीहरिकोटा** : भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने पुन्हा एकदा इतिहास रचला. इस्रोने गुरुवारी सूर्याची रहस्ये उलगडण्याच्या उद्देशाने युरोपियन स्पेस एजन्सीच्या (ईएसए) प्रोबा-३ उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले.

सूर्याच्या कोरोनाचा अभ्यास करण्यासाठीचा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. आंध्रप्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून गुरुवारी सायंकाळी ४:०४ वाजता प्रोबा-३ चे प्रक्षेपण करण्यात आले. पीएसएलव्ही-सी५९प्रोबा-३ मोहिमेने यशस्वीरीत्या प्रक्षेपणाची उद्दिष्टे साध्य केली आहेत. ईएसएचा उपग्रह



त्याच्या निश्चित कक्षेत अचूकपणे प्रस्थापित करण्यात आला आहे, असे इस्रोने म्हटले आहे.

### प्रोबा-३ ची वैशिष्ट्ये

प्रोबा-३ ही मोहीम इस्रो आणि युरोपियन अंतराळ संस्था यांच्यातील महत्त्वपूर्ण सहकार्य चिन्हांकित करते. ज्याचा उद्देश सूर्याच्या कोरोनाचा अभ्यास करणे, सौर वातावरणाचा सर्वांत बाह्यस्तर आहे, जो सौर गतिशीलता आणि अवकाशातील हवामान घटना समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. हा उपग्रह अवकाशात अत्यंत लंबवर्तुळाकार कक्षेत अंदाजे १५० मीटरने वेगळा होईल, जिथे उपग्रह सूर्यप्रकाश रोखू शकेल. प्रोबा-३ मोहिमेमध्ये प्रक्षेपित करण्यात आलेले उपग्रह कृत्रिम सूर्यग्रहणासाठी परिस्थिती निर्माण करतील; जेणेकरून सूर्याच्या सर्वांत बाह्य थराचा अभ्यास करता येईल.

## संक्षिप्त वृत्त



### मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस शपथविधीचा हिंदू बांधवांकडून बार्शी येथे जल्लोष

**बार्शी, दि. ५ डिसेंबर-**

आज दि. ५ डिसेंबर रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस व उपमुखमंत्री म्हणून अजितदादा पवार व एकनाथ शिंदे यांचा शपथविधी देशाचे पंतप्रधान नरेंदजी मोदी यांच्या उपथितीत पार पडला. त्याचा आनंदोत्सव बार्शी येथील मंदिराच्या बाजूस करण्यात आला. आनंद साजरा करत असताना हिंदू बांधवाकडून शपथविधी पाहण्यासाठी मोठी स्क्रीन लावण्यात आली होती व तसेच सर्व समाज बांधवाना पेढे, लाडू वाटण्यात आले. याप्रसंगी डॉ. सागर कांबळे, तात्या घावटे, भाऊसाहेब हलमे, आकाश कांबळे, लखन बाफना, समाधान ताटे, आदित्य घाटे, अश्विन कुलकर्णी, मुकुंद कुलकर्णी, किरण देशमुख यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्व हिंदू बांधवांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये जोश, आनंद पाहायला मिळाला. सर्वांनी मोठ्या थाटात जल्लोष साजरा केला. डॉ. सांगर कांबळे यांनी हिंदू बांधवांना व समाज बांधवांना आजच्या शपथविधीची माहिती दिली व मार्गदर्शन केले व उपथितांचे आभार मानले.



### शपथविधीनंतर पिलीव येथे फटाक्यांची आतिषबाजी

**पिलीव, दि. ५ डिसेंबर-**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे देवेंद्र फडणवीस म्हणून शपथ घेताच पिलीव येथे भाजपच्या वतीने फटाके फोडून तसेच पिलीव गावात लाडू वाटप करून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल मदने, अतुल नष्टे, प्रमोद भैस, डॉ. निलेश कांबळे, अंकुश भैस, संतोष दुबे, स्वप्निल कुलकर्णी, दिगंबर भैस, बंडू देवकर, सुळे, पत्रकार दामोदर लोखंडे यांच्यासह पिलीव परिसरातील भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपा-महायुतीने प्रचंड मोठे यश संपादन केल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली तर उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री, भाजपा व घटक पक्षाचे मुख्यमंत्री व इतर विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत शपथ घेताच मोठा जल्लोष करण्यात आला.

### प्रेमविवाह केल्याने अपमानास्पद वागणूक विवाहितेस ५ लाखासाठी तगादा, चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर -**

प्रेमविवाह केल्यामुळे राम मनात धरून अपमानास्पद वागणूक देवू लागले. पतीने माहेरहून पाच लाख रुपये घेवून ये म्हणत शिवीगाळ व मारहाण करून छळ केला आहे. याप्रकरणी पतीसह सासरच्या चौघांवर पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना २९ सप्टेंबर ते २ नोव्हेंबर २०२४ दरम्यान साखर पेठेत घडली आहे. याबाबत रेखा राजेश मामडयाल (वय ४० रा. एकता नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती राजेश, सासरे विजय, नणंद वैशाली व नणंदेचे पती जगदीश बोमडयाल (सर्व रा. साखर पेठ) यांच्यावर एमआयडीसी पोलिसांत बुधवारी मध्यरात्री गुन्हा दाखल झाला आहे. रेखा या लग्नानंतर सासरी नांदत होत्या. वरील आरोपींनी मिळून रेखा यांनी प्रेम विवाह केल्यामुळे त्याचा राग मनात धरून अपमानास्पद वागणूक देत होते. घरातील सर्व कामे करण्यास लावत. वेळेवर जेवण न देणे, घालून पाडून बोलत होते. तसेच पती राजेश याने माहेरहून पाच लाख रुपये घेवून ये असे म्हणून शिवीगाळ व मारहाण करून छळ केल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. पोलिस हवालदार मुजावर पुढील तपास करीत आहेत.



### संविधानाच्या ७५ हजार प्रतींचे वाटप; प्रयास संस्थेचा उपक्रम

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

भारतीय संविधान बाबतची सखोल माहिती सर्वसामान्यांना व्हावी, याकरिता प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने भारतीय संविधानाचा ७५ वा अमृत महोत्सवी वर्ष निमित्त रावजी सखाराम हायस्कूल ऑफ कॉमर्स सोलापूर येथे भारतीय संविधान प्रास्ताविकेचे अनावरण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभागाचे सुलोचना सोनवणे, रावजी सखाराम हायस्कूल ऑफ कॉमर्स प्राचार्य संतोष वालवडकर आणि प्रयास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन शिंदे यांची प्रमुख उपस्थित होती. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते या प्रास्ताविकेचे अनावरण करण्यात आले. तद्नंतर सदर भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. यावेळी प्रशिक बनसोडे, हर्षद मेहर, निलेश सोनवणे, पारस कुमठेकर, राहुल वडतीले आदींसह शाळेतील शिक्षक कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सोलापूर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून शुभेच्छा

## एकत्रित काम करा, सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करणार असल्याची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ डिसेंबर-**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सोलापूर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करु शुभेच्छा दिल्या. एकत्रित काम करा, सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

सोलापूर शहर राष्ट्रवादीच्या वतीने ज्यांनी राज्यात सहा वेळा उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेऊन नवा विक्रम केला असे राज्याचे कर्तव्यदक्ष लोकप्रिय नुतन उपमुख्यमंत्री नामदार अजित पवार यांचा देवगिरी या त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ आणि किसन जाधव यांनी श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज यांची प्रतिमा व प्रसाद देवून मनपूर्वक अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.



यावेळी अजितदादा यांनी शहरातील पदाधिकाऱ्यांचे आभार मानत आगामी काळात जिल्हाध्यक्ष संतोष पवार, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यासह शहरातील सर्व पदाधिकारी यांनी एकत्रित काम करा मी आपल्या पाठीशी आहे हवी ती ताकद देवून सोलापूरच्या विकासाकरीता सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

यावेळी माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे, जेष्ठ नेते हेमंत चौधरी, प्रांतिक सदस्य महेश निकंबे, व्हीजेएनटी अध्यक्ष रूपेश भोसले, युवक प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड, सामाजिक न्याय विभाग कार्याध्यक्ष अनिल बनसोडे, शहर मध्य विधानसभा अध्यक्ष अलमेराज आबादीराजे, सोशल मिडीया कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे उपस्थित होते.

# केंद्रशासनाच्या योजना राज्य् सरकारने राबवून राज्याला प्रगत करावे

## चेबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यांची अपेक्षा

### चेंबरच्या वतीने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ डिसेंबर-**

पुर्वी केलेल्या घोषणा, निर्णय व अध्यादेश यांची पहिल्यांदा कार्यवाही करावी. त्यानंतर घोषणापत्रात दिलेल्या वचननामाची पुर्तता करावी. महाराष्ट्राला पायाभुत सुविधा, रोजगार वाढीसाठी उद्योग व व्यापार, सर्व्हीसेस यांची वृध्दी करण्यासाठी योजना आणावी व जास्तीत जास्त् राज्यातील धोरण हे दीर्घ काळाचे असावे. तसेच केंद्रशासनाच्या विविध योजना राज्य् सरकारने राबवून राज्याला प्रगत करावे, हीच अपेक्षा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्याकडून व्यक्त केली आहे.

भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटाचे एकनाथ शिंदे व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अजित पवार यांनी मिळुन महायुतीचा शपथविधी सोहळा गुरुवार (दि.५) रोजी मुंबई संपन्न झाला त्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री पवार यांचे सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अ‍ॅण्ड् अ‍ॅग्रीकल्चरच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# नेताजी शाळेत सोमवारपासून विज्ञान प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ डिसेंबर-**

उत्तर सोलापूर तालुक्याचे ५२वे तालुका विज्ञान प्रदर्शन ९ व १० डिसेंबर रोजी आकाशवाणी रोडवरील निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलात आयोजित केली आहे.

सोमवार दि. ९ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन व १० डिसेंबर रोजी सायंकाळी चार वाजता बक्षीस वितरण समारंभ होईल. तालुक्यातील मुख्याध्यापकांनी दि.७ डिसेंबर पर्यंत https://forms.gle/Hd435nXp3KQZdwRM7 या लिंकवर माहिती भरुन नाव नोंदणी करावी. शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान, सामाजिक, पर्यावरणास अनुकूल या मुख्य विषयाला अनुसरुन अन्न,आरोग्य आणि स्वच्छता, वाहतूक आणि दळणवळण, नैसर्गिक शेती,आपत्ती व्यवस्थापन,गणितीय मॉडेलिंग आणि संगणकीय विचार,कचरा व्यवस्थापन, संसाधन व्यवस्थापन या विषयापैकी एका विषयावर आधारित विद्यार्थी इ. ६ वी ते ८ वी पर्यंत पहिले तीन वस्तू /प्रतिकृती, इ. ९ वी ते १२वी पर्यंत पहिले तीन वस्तू प्रतिकृती,शिक्षक इ. १ली ते ८वी पर्यंत १ शैक्षणिक साहित्य, इ. ९वी ते १२ वी पर्यंत १ शैक्षणिक साहित्य,प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर: एक वैज्ञानिक प्रतिकृती याप्रमाणे निवडलेल्या वस्तू जिल्हा स्तरावर पाठविण्यात येईल. तालुकास्तरावर निवड करताना सृजनशील व कल्पनाशक्ती,वस्तूची मौलिकता व वैज्ञानिक, गणितीय नाविन्यता, वैज्ञानिक विचारतत्व पागम -प्रणाली, दृष्टीकोन, तांत्रिक कौशल्य, कारीगरी, शिल्पकौशल्य, समाजासाठी उपयोगिता, मापनियता, अल्पखर्चिक हस्तवाह्यता, टिकाऊपणा, सादरीकरणाचे पैलू जसे दिग्दर्शन, स्पष्टीकरण आणि प्रदर्शन असे एकूण १०० गुणांचे निकष आहेत, असे उत्तर सोलापूरचे गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी यांनी कळविले आहे. माहितीसाठी विज्ञान साधन व्यक्ती चंद्रकांत वाघमारे (९४०५१२८१७४) यांच्याशी संपर्क साधावा.



सोलापूर : तुळजापूर रोड पुलाखालील रस्त्याच्या बाजूला सुशोभीकरण करण्यात आले. त्याला ट्रॅव्हल्स बसने ठोकरल्यामुळे नुकसान झाले. या बसवर प्रशासन कारवाई करणार का? (छायाचित्र : केवल तिवारी)




# एकीकडे महायुती सरकारचा शपथविधी तर दुसरीकडे ई.व्ही.एम.विरोधात विरोधकांचा यल्गार

### काँग्रेसने राबवली स्वाक्षरी मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर -**

राज्यातील महायुती सरकारने ईव्हीएम घोटाळा करून राज्यात आपली सत्ता आणली आहे. वास्तविक पाहता राज्यातील जनतेचा जनाधार नसताना, महायुतीने हे पाप केले आहे. ईव्हीएम मशीनद्वारे मतांची चोरी करून सरकार स्थापन केले आहे. या विरोधात ईव्हीएम विरोधी कृती समितीकडून आंदोलन करण्यात तर दुसरीकडे काँग्रेस पक्षाकडून ईव्हीएम विरोधी स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली.

दरम्यान, ईव्हीएम हटाव संविधान बचाव हा नारा देत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर आंदोलन करण्यात येऊन काळीफित लावून महायुतीच्या सरकारचा शपथविधीचा निषेध नोंदवण्यात आला. यावेळी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या स्वाक्षरी मोहिमेस प्रचंड प्रतिसाद मिळाला हजारों नागरिकांनी स्वाक्षरी करून ईव्हीएम मशीन बंद करून बॅलेटवर निवडणुका घेण्यास पाठींबा व्यक्त केला.

यावेळी स्वाक्षरी मोहिमेबद्दल माहिती देताना चेतन नरोटे, महेश कोठे आणि सिद्धाराम म्हेत्रे म्हणाले की, देशातील सामान्य नागरिकांचा आजपर्यंत मतदानावर विश्वास होता. विधानसभा निवडणुकीअगोदर अनेक सर्व्हे मध्ये सुद्धा महाविकास आघाडी सत्तेवर येणार असे चित्र होते. तसेच लोकभावना सुद्धा होती. पण निवडणुकीत लोकभावनेच्या विपरीत निवडणुकीचे निकाल आले असल्याची भावना जनतेमध्ये खळबळ निर्माण केली आहे.

# महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला मेणबत्त्या प्रज्वलित करून अभिवादन

## प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्या वतीने उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला प्रबुद्ध भारत तरुण मंडळ( पी.बी. ग्रुप)च्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात मोठ्या प्रमाणात मेणबत्त्या प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी,पी.बी ग्रुपचे प्रमुख गौतम चंदनशिवे, एस के ग्रुप सामाजिक संस्थेचे संस्थापक रविकांत कोळेकर, सामाजिक कार्यकर्ते श्रीमंत जाधव अविनाश भडकुंबे, चंद्रकांत सोनवणे, अँड विशाल मस्के, आरोग्य निरीक्षक जितू मोरे,नितीन बंदपट्टे, सुबन्ना स्वाके, सर्पमित्र अनिल आलदर, सिद्धांत सुर्वे, उमेश रणदिवे, जॉकी भडकवाड यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. सामूहिक बुद्ध वंदना झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून अभिवादन केले.

यावेळी पी.बी. ग्रुप अध्यक्ष आदित्य चंदनशिवे, उपाध्यक्ष श्रीकांत वाघमोडे, आशिष पात्रे, रवी काकडे, किरण माने, धोंडीबा कापुरे, सुरज पाटील, अजय कांबळे, गौतम शिंदे, अजित अंकुश,अण्णा सोनकांबळे, लखन पवार, करण डोळसे, अजय इंगळे, अण्णा जाधव, संकेत भुताळे, रवी वाघमारे, विनय क्षीरसागर, बंटी सरवदे, मनीष साळवे, अमन डोळसे, स्वप्निल पुजारी, बळीराम ठाकूर, सूरज वैद, सुरज पाटील, गणेश पाटील, कुमार सांगे, सतीश अडाकूल, सिद्धार्थ तळभंडारे, प्रथमेश सुरवसे ,प्रतीक वाघमारे, सुमित चंदनशिवे, रवी मॅथरोलू, जयराज सांगे, समाधान सकट, प्रसन्न तळभंडारे, महेश मगर, सिद्धांत मगर, विकी जाधव, सुजल मगर, श्रीकांत गायकवाड, मल्लिनाथ तळवार, लखन चंदनशिवे, राहुल बागले आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्ह्यात यंदा वाळू ठेकेदार वाढल्याने बांधकामासाठी वाळू मिळणार

### ३ जणांना दिला ठेका तर ५ जणांचे ई-टेंडर अंतीम टप्प्यात

### प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

२०२४-२५ या गतवर्षी जिल्ह्यात वाळूचे लिलाव ठेकेदारांनी घेतले नसल्याने जिल्ह्यातील नागरिकांना बांधकामासाठी वाळूच मिळाली नाही. तर काहीजणांनी बाजूच्या कर्नाटक राज्यातून अती महागडी वाळू आणून आपले बांधकाम उरकले. तर काहींनी क्रश सँड अन् खडीवर आपल्या घराची बांधकामे केली. दरम्यान, जिल्ह्यातील अनेक नागरिकांची वाळूची मागणी वाढल्याचे पाहून यंदा जिल्हा प्रशासनाकडून आजतागायत ३ ठेके ई-टेंडर प्रक्रियेतून दिले आहेत तर अजून ५ ठिकाणचे ठेके देण्याची प्रक्रिया येत्या आठवडाभरात पूर्ण होईल आणि सर्वसामान्य नागरिकांना मुबलक वाळू मिळेल, असा आशावाद जिल्ह्याचे प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी आज व्यक्त केला.



#### वाळू लिलाव देताना अशी घ्यावी लागते काळजी

पर्यावरण विभागाची परवानगी घेण्यापूर्वी खाणकाम आराखडा तयार करावा, पर्यावरण, पिण्याचे पाणी उपलब्धतेवर परिणाम होत असल्यास वाळू गट निश्चित करू नये, रेल्वे पूल, रस्ते पुलाच्या दोन्ही बाजूने ६०० मीटर अंतर सोडून वाळू गट निश्चित करावा लागतो. या सर्व गोष्टींचा अहवाल तहसीलदारांनी तयार करून प्रांताकडे द्यावा लागतो. यानंतर त्या प्रस्तावास हरित लवादाची मान्यता घेवून वाळू लिलाव प्रक्रिया राबविण्यात येते.

अवैध वाळू उपसा, पर्यावरणाचे बिघडत असलेले संतुलन, हरित लवादाने यांत्रिकी बोटीने वाळू उपशावर घातलेली बंदी या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने काही वर्षांपूर्वी वाळू लिलावाचा सुधारित शासन निर्णय काढला होता. या निर्णयात अनेक कडक अटी असल्याने लिलावात ठेकेदार भागच घेत नव्हते. यानंतर या लिलावातील काही अटी शासनस्तरावरुन शिथील झाल्यानंतर या वर्षीपासून वाळू लिलाव प्रक्रिया जोमाने सुरू असल्याचे दिसून येत आहे.

आता ठेके वाढू लागल्याने शहर-जिल्ह्यातील नागरिकांना आपल्या स्वप्नातील घरे बांधण्यासाठी कमी दराने वाळू मिळणार आहे.

जलसंपदा, जलसंधारण, सार्वजनिक बांधकाम, प्रधानमंत्री आवास योजना आदी कामांनाही वाळूगट राखीव ठेवण्यात येतात आणि उर्वरित वाळूचा लिलाव होवून सर्वसामान्य नागरिकांना वाळू मिळत असते. आता जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील बठाण, उचेठाण आणि पंढरपूर तालुक्यातील तारापूर अशा तीन ठिकाणचा वाळू ठेका दिल्याने तेथील वाळू उपसा चालू झाला आहे. तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज-मंद्रुप, देगाव, मोहोळ तालुक्यातील घोडेश्वर आणि मंगळवेढा तालुक्यातील आरळी येथील ठेके पुढील आठवड्यात चालू होणार असल्याने जिल्हावासियांना यंदा मुबलक वाळू मिळण्याची शक्यता आहे.

#### वाळूबरोबर क्रश सँड, खडीचे दरही भरमसाठ

आपल्याकडे वाळू सहजासहजी मिळणे कठीण बाब असल्याने परराज्यातून येणारी वाळू ते व्यावसायिक तब्बल १० ते १२ हजार रुपये ब्रास अशा चढ्या दराने वाळूची विक्री करत आहेत. ज्या व्यावसायिकांना तातडीने कामे करावयाची आहेत ते हा ज्यादा दर देऊन वाळू घेत आहेत. वाळू मिळत नसल्याने बांधकामधारक व्यावसायिक नागरिक हे वाळूला पर्याय म्हणून क्रश सँड, डस्टचा वापर करताना दिसू लागले आहेत. याचाही दर भरमसाठ वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांना सिमेंटचे घर बांधणे कठीण झाले आहे.

#### शासकीय कामांनाही येणार गती

रमाई घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास, इंदिरा आवास यासह इतरही योजनेमधून गरिबांना घरकुले मंजूर होतात. मात्र वाळूच मिळणे अशक्य असल्याने बहुतांश कामे अपुरीच राहिली आहेत. तर काही ठिकाणी क्रशसँन्डचा वापर करून कामे सुरू आहेत. आता वाळू उपलब्ध होण्यास सुरूवात झाली तर बांधकामांचा दर्जाही सुधारणार आहे आणि शासकीय योजनांच्या बांधकामांनाही गती येणार आहे.




मुंबई येथे शपथविधी सोहळा संपन्न झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार पदावर विराजमान झाल्याबद्दल बार्शीचे माजी आ. राजाभाऊ राऊत यांनी अभिनंदन केले. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील, नितीन काळे, संताजी चालुक्य.

# सुसंस्कारी राजकारणाचे पुनर्भरण

**- विवेक घळसासी, ज्येष्ठ अभ्यासक**

**देवेंद्रजी फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला आहे. बाविसाव्या वर्षी नागपूर महानगरपालिकेत प्रवेश करणारे देवेंद्रजी महाराष्ट्रातलेच नव्हे तर भारतातले दुसरे सर्वात तरुण महापौर होते. पुढे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष, मुख्यमंत्री आणि आता पुन्हा एकदा त्याच पदी विराजमान होऊन त्यांनी आपल्या वाटचालीतील एक वर्तुळ पूर्ण केले आहे. या सगळ्यात त्यांच्या अंगीचे काही गुण विशेषत्वाने नोंद घेण्याजोगे आहेत...**

देवेंद्रजी फडणवीस यांची विधिमंडळ नेतेपदी निवड झाली, ते विधिमंडळातील भाजपाचे नेते झाले आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचे अधिकृत उमेदवारही झाले. देवेंद्रजी मुख्यमंत्री होण्यामागे बरेच संदर्भ आहेत. या संदर्भातील पहिली गोष्ट म्हणजे गेल्या दहा-बारा वर्षांमध्येच नव्हे तर २५-३० वर्षांपासून जातीय विषाणूंनी महाराष्ट्रातील सामाजिक जीवन गढूळ करण्याचे खूप मोठे कारस्थान झाले. दुर्दैवाने ते यशस्वीही झाले. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण सभ्य-सुसंस्कृत होतेच, पण इथे फार पूर्वीचा पण मनावर चरा ओढून गेल्यामुळे अगदी ताजा राहिलेला एक प्रसंग आठवतो. त्यावेळी पंढरपूर नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून एका गांधीवादी, खादीधारी, जीवनभर व्रतधारी असणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्याने यशवंतरावांना तात्याराव गुर्जर यांचे नाव सुचवले. ते ऐकून तिथे यशवंतराव काही बोलले नाहीत, पण बैठक पार पडल्यानंतर त्या गांधीवादी कार्यकर्त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, 'कोणाचे नाव सुचवायचे असते, हे कळते का तुम्हाला?' असो. शरद पवारांच्या कारकिर्दीत राज्यात जातीय द्वेष उफाळून आला. 'पुणेरी पगडी'चा होणारा उल्लेख असो वा एखाद्या शास्त्रज्ञाने, तज्ज्ञाने मत मांडले तर त्यांच्या जातीकडे निर्देश करणारी विखारी टीकाटिप्पणी करणे असो, असे अनेक प्रसंग समाजाने पाहिले.

गेल्या दहा वर्षांमध्ये तर या द्वेषाचा अतिरेक झाला. दुःखाची बाब म्हणजे राजकीय व्यासपीठांवर अगदी भाजपाच्या वक्त्या वा नेत्यांकडूनही जातीपातीचे राजकारण तापवण्याचा प्रयत्न झालेला दिसला. होळीच्या सणाला सभ्य माणसालाही चौकात बोंब ठोकावीशी वाटते, त्याप्रमाणे कदाचित भाजपामधील या लोकांचे झाले असेल. हे प्रमाण कमी असले तरी ते नव्हतेच असे म्हणता येणार नाही. अशा वातावरणात देवेंद्रजींवर अतिशय वैयक्तिक, खालच्या पातळीवर मते व्यक्त होत होती. त्यामुळे संवेदनशील आणि सुसंस्कृत माणसाला प्रगतीशील, शिवरायांचा; शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र कोणत्या पातळीवर जावू लागला आहे, याची चता वाटत होती. यात भर घालणारी आणि प्रभावी ठरणारी तामसी प्रवृत्ती माध्यमांच्या रुपाने समोर येतच होती, कारण अनेक माध्यमांनी आग भडकवण्याचे काम पूर्ण ताकदीने केले आणि हे करताना तेदेखील याच पातळीवर उतरलेले दिसले. त्यातला आणखी एक पदर यूट्युबर्सचा होता. यापैकी कोणाकडूनही कोणाविषयीच आदरार्थी संबोधन वापरले जात नव्हते. राजकीय मतभेद समजू शकतो, पण नेत्यांचा एकेरी उल्लेख करणे बरोबर नाही. मात्र माध्यमांनी, मोकट सुटलेल्या वक्त्या-प्रवक्त्यांनी या सगळ्याचा कडेलोट केला आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात 'भ'ची बाराखडी आणणाऱ्या (राजकीय क्षेत्रातील गटार म्हणावे अशा) एका व्यक्तीने राज्याची रोजची सकाळ गलिच्छ करुन टाकली.

मधल्या काळात आरक्षणाच्या निमित्ताने वातावरण आणखी ढवळून निघाले. या सगळ्या पार्श्वभूमीवर राज्याची सुत्रे देवेंद्र गंगाधरपंत फडणवीस यांच्या हातात पुन्हा सूत्र आली आहेत. ही महाराष्ट्रासाठी, इथल्या सुसंस्कृत लोकांसाठी, राष्ट्रीय संतांसाठी, युवक-युवतींसाठी महत्त्वाची बाब आहे, याचा विचार आता व्हायला हवा. हे पाहताना संबोधनातील एक सुखद बदल नक्कीच सांगावासा वाटतो. तो असा की, सगळेजण आधी त्यांना 'देवेंद्रजी' म्हणत होते. पण आता अखिल भारतीय पातळीवर ते 'देवाभाऊ' झाले आहेत. या बदलामध्ये डोकावणारी आत्मियता लक्षात घेण्याजोगी असून कुटुंबात अपेक्षित असणारा सुसंस्कृतपणा आता महाराष्ट्रातही बघायला मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

संघाचा स्वयंसेवक, विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता, घरातील जनसंघ-भाजपाची परंपरा पाळणारा मुलगा आणि पक्षात आल्यानंतर बुथ लेव्हलपासून काम सुरू करणारा एक तळमळीचा माणूस हा सगळा प्रवास त्यांच्या वाटचालीला वळण देणारा आहे. या व्यक्तीचा चेहरा त्यांचे बालपणच लोकांसमोर आणतो. त्यातील निरागसता लोकांना भावतो. अर्थातच त्यात खोडकरपणाही आहे, पण ही निरागसता राजकारणात वावरताना त्यांच्यासाठी एक ढालसुद्धा झाली आहे. बाविसाव्या वर्षी नागपूर महानगरपालिकेत प्रवेश करणारे देवेंद्रजी महाराष्ट्रातलेच नव्हे, तर भारतातले सर्वात तरुण दुसरे महापौरही झाले. पुढे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष, मुख्यमंत्री आणि आता पुन्हा एकदा त्याच पदी विराजमान होऊन त्यांनी आपल्या वाटचालीतील एक वर्तुळ पूर्ण केले आहे. या सगळ्यात त्यांच्या अंगचे काही गुण विशेषत्वाने नोंद घेण्याजोगे आहेत. पहिली बाब म्हणजे देवेंद्रजी कोणाच्या 'गुड बुक्स'मध्ये असल्याने मुख्यमंत्री झालेले नाहीत. मोदींच्या कृपेमुळे, अमित शहांच्या लोभामुळे, वरिष्ठांच्या वरदहस्तामुळे त्यांना हे पद मिळाले नसून स्वतःला सिद्ध करुन त्यांनी ते मिळवले आहे. हा ध्येयाचे सतत स्मरण ठेवणारा राजकारणी आहे. आपण संघाच्या शाखेत, परिषदेत काय शिकलो आणि भाजपमधील सुरुवातीच्या काळात उत्तमराव पाटील, वसंतराव भागवत, जगन्नाथराव जोशी, रामभाऊ म्हाळगी यांच्यासारख्या मोठ्या लोकांनी काय शिकवले याचे त्यांनी कधीही विस्मरण होऊ दिले नाही. आपल्या ध्येयबद्कडे दुर्लक्ष न होऊ देता कोणत्याही विषयावर चर्चा करणे, ही त्यांची खासियत आहे. कायम हे स्मरण असल्यामुळेच ते एक स्वयंसेवक, पक्षाचा कार्यकर्ता म्हणूनच कोणत्याही पदावर निष्ठेने काम करताना दिसतात.



अलिकडच्या काळात राजकीय नेत्यांमध्ये क्वचितच दिसणारी पण देवेंद्रजींमध्ये आढळणारी एक बाब म्हणजे वैचारिक स्पष्टता. यंदा भाजपने गाठलेला १३२ चा आकडा खूप मोठा असून यात त्यांचेही मोठे यश आहे. मुख्यमंत्रीपद मिळाल्यानंतर त्यांनी केलेले भाषण आपण ऐकले. इथे वैचारिक स्पष्टता सिद्ध करणारे त्यांचे एक वाक्य लक्षात घेण्याजोगे वाटते. युतीधर्म असताना चार गोष्टी मनासारख्या होतात, तर चार गोष्टी होत नाहीत. त्यामुळेच त्या पोटात घेऊन पुढे जाता आले पाहिजे असे सांगत ते पुढे म्हणाले की, सत्ता टिकून राहण्यासाठी हे करायचे नसते तर एक मोठे ध्येय गाठण्यासाठी हे करणे गरजेचे ठरते. हे मोठे ध्येय अर्थातच २०२९ ची विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे, स्वतःच्या ताकदीवर, पूर्ण बहुमताची सदस्यसंख्या मिळवून जकणे हे आहे. म्हणूनच या 'लार्जर इंटरेस्ट'चा मुद्दा भाजपाचे कार्यकर्ते, नव्याने निवडून आलेले सगळे आमदार यांनी लक्षात घेतला तर त्यांचे सभागृहातील आणि मतदारसंघातील वागणेही पुढच्या पाच वर्षांमध्ये भाजपाला एकट्याला बहुमत आणि हदुत्वाला सकारात्मकता मिळवण्याच्या दिशेने ठरेल.

देवेंद्रजींचे अवधान असे की, त्यांनी आपल्या भाषणात संविधानाच्या ७५ वर्षांची, अहिल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीपर्वाची तसेच बिरसा मुंडा यांची आठवण करुन दिली. म्हणजेच हे संदर्भ देत त्यांनी अनेकांना आपल्या जवळ केले. अर्थातच ही बाब त्यांच्या वैचारिक स्पष्टतेची आणि संघटनकौशल्याची ओळख देणारी आहे. या संघटनकौशल्यामध्ये सर्वांचा सहयोग पण तडजोड कोणाशीही नाही, हा कळीचा मंत्र दिसतो. त्यांनी अजित पवारांना जवळ केल्यानंतर अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती. पण अजित पवार बरोबर असण्याचा आणि त्यांना स्वतंत्रपणे इतक्या जागा मिळण्याचा न बोलता, न कशाची वाच्यता करता किती मोठा लाभ होऊ शकतो, हे मधल्या काळाने दाखवून दिले. ही बाबही त्यांच्या वैचारिक स्पष्टतेचा दाखला देणारी आहे. सभागृहात वा सभागृहाबाहेर अशा दोन्ही ठिकाणी देवेंद्रजी कधीही सार्वजनिक जीवनातले संकेत सोडत नाहीत. ही बाबही नोंद घेण्याजोगी आहे. त्यांनी कोणाविषयी 'अरे-तुरे' केलेले आपण ऐकलेले नाही. अनुदार उदगार काढलेले नाहीत. मतभेद ठाम मांडतील पण 'शरद पवारांना काय कळतंय...' असे वाक्य ते कधीच बोलणार नाहीत. खेरीज पराकोटीचा संयम ही त्यांच्या व्यक्तित्वाची ठळक ओळख आहे. गेल्या अडीच वर्षात सर्वांनीच ती जोखली आहे. विरोधकांनी त्यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर उतरुन टीका केली. पण देवेंद्रजींनी त्यांना कृतीतून उत्तर दिले. अत्यंत धूर्तपणे त्यांनी एकनाथ शदे यांना शिवसेनेतून तर अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर काढले. हदुत्वाचा विरोध करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना सार्वजनिक जीवनातून संपवायचे असेल तर खरा कार्यकर्ता आणि सच्चा हदुत्ववादी शिवसैनिक यांना सन्मानाने बाहेर काढले पाहिजे, हे त्यांनी ओळखले होते. दुसरीकडे स्वार्थ, जातीपाती, नातीगोती, परिवारवादाचे राजकारण करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील एक गट बाहेर काढण्याचे महत्त्वही त्यांनी जाणले होते. म्हणूनच धूर्तपणे निर्णय घेत त्यांनी हे काम केले.

संसदपटू म्हणूनही ते मोठे आहेत. त्यांना यासंबंधीचे पुरस्कारही मिळाले आहेत. खरे तर त्यांना पाहून मला रामभाऊंचीच (म्हाळगी) आठवण येते. देवेंद्रजी प्रमाण असल्याखेरीज कोणताही प्रहार करत नाहीत, हे अत्यंत महत्त्वाचे. या सगळ्या गुणांमुळेच त्यांच्यामध्ये एक आत्मविश्वास दिसतो. आता आत्मविश्वासाने परिपूर्ण असणारा आणि समोरच्याला जशास तसे पण सभ्यतेचे संकेत न मोडता उत्तर देणारा लोकांच्या मनातील असा नेता मुख्यमंत्रीपदी विराजमान झाला आहे. शरद पवारांचा दबदबा संपवणारे हे नाव आता नव्याने सत्तेच्या केंद्रस्थानी आले आहे. त्यामुळेच त्यांच्या या नव्या कार्यकाळात विकास, विकासशील उपक्रम-योजना आणि सामाजिक समतेविषयीचा प्रामाणिक आग्रह बघायला मिळेल तसेच त्यांची राजवट संस्मरणीय होईल यात शंका नाही.

**(शब्दांकन- स्वाती पेशवे)**

**(अद्वैत फीचर्स)**

## डॉ. आबेंडकर यांचे अनुयायी मुंबईस रवाना



सोलापूर : महानिर्वाणदिनानिमित्त सोलापुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुयायी चैत्यभूमी दर्शनासाठी मुंबई रवाना होताना सोलापूर रेल्वे स्थानकावर गुरुवारी रात्री टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)



## अग्रलेख...

# आव्हान पेलण्याचा आनंद

१० वर्षांपूर्वीच्या, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीआधी, 'भाजपाचे महाराष्ट्रातील एक प्रभावी प्रदेशाध्यक्ष' अशी स्वत:ची ओळख निर्माण करणाऱ्या आमदार देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात २०१४ च्या विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची माळ काहीशा अनपेक्षितपणेच पडली होती. ती निवडणूक लढविताना महाराष्ट्र भाजपा 'मोदी लाटे'वरच स्वार होता. मोदींच्या करिष्म्यामुळेच भाजपाला सत्तासंपादनासाठी संख्याबळ जमविता आले असले, तरी 'स्वबळा'चा पक्षाचा आवाज मात्र क्षीणच झाला होता. तेव्हा भारतीय जनता पार्टी केंद्रात मजबुतीने सत्तेवर दाखल झाला होता आणि देशात सर्वत्र मोदीनामाचा उत्स्फूर्त गजर सुरू होता. अशा काहीशा अनपेक्षितपणे भारलेल्या वातावरणातच भाजपाला काहीशा राजकीय कसरतीही कराव्या लागल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अप्रत्यक्ष मदतीमुळे बहुमताच्या पहिल्या परीक्षेत तगलेल्या आणि मागाहून सत्तेत सहभागी झालेल्या शिवसेनेमुळे स्थिरावलेल्या सरकारचा गाडा हाकण्यासाठी महाराष्ट्रात भाजपाकडे सक्षम नेतृत्व नाही, अशीच स्थिती असताना भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने फडणवीस यांच्या खांद्यावर सरकारच्या नेतृत्वाची जबाबदारी टाकली, तेव्हा अनेक इच्छुकांच्या भुवया उंचावून वक्रदेखील झाल्या होत्या. अगोदरच सरकारमध्ये सहभागी होऊनही विरोधाची धार परजलेल्या शिवसेनेचे आव्हान आणि त्यात अंतर्गत नाराजीची भर अशा दुहेरी अडचणींचा सामना करण्याचे आव्हानही या जबाबदारीसोबत पक्षाने फडणवीस यांच्यासमोर उभे केले, तेव्हा पुढच्या पाच वर्षांआधीच या नवख्या नेत्याची दमछाक होईल, अशा आशेने अनेकांच्या नजरा येणाऱ्या प्रत्येक नव्या दिवसावर खिळल्या होत्या. पण, दिल्लीच्या भक्कम पाठिंब्याच्या जोरावर फडणवीस यांनी ही दोन्ही आव्हाने झेलत मुख्यमंत्रिपदाची पूर्ण पाच वर्षे पार केली. महाराष्ट्राच्या इतिहासात मुख्यमंत्रिपदाची पाच वर्षे पार करण्याची नोंद केवळ वसंतराव नाईक यांच्या नावावर झाली होती. फडणवीस हे या यशाचे दुसरे मानकरी ठरले. आता नव्याने मुख्यमंत्रिपदाची धुरा खांद्यावर घेतल्यानंतर, तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होणारे फडणवीस हे दुसरे नाव असेल. सलग पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या मुख्यमंत्र्यांमध्येही वसंतराव नाईक यांच्यानंतर फडणवीस हेच दुसरे मुख्यमंत्री ठरले आहेत. साहजिकच एवढी चमकदार कामगिरी असलेल्या नेत्यास त्याचा नैसर्गिक हक्क देण्याची न्याय्य भूमिका भाजपा श्रेष्ठींनी पार पाडली. यावरून त्या पक्षाच्या संस्काराची प्रचीती येते. त्यांच्या सलग पाच वर्षांच्या कर्तबगार राज्य कारभाराची पावती म्हणून २०१९ मधील लोकसभा निवडणुकीत 'मुख्यमंत्रिपदाचा चेहरा' म्हणून भाजपाने फडणवीस यांनाच मतदारांसमोर नेले. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपा-शिवसेना-रिपाइं आणि अन्य काही गटांनी केलेल्या 'महायुती'स बहुमताचा स्पष्ट जनादेश मिळाला. पण, अगदी अलिकडचा सगळा घटनाक्रम महाराष्ट्राच्या राजकारणास वेगळ्याच वळणावर घेऊन गेला आणि फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदावरून विरोधी पक्षनेतेपदावर बसण्याची वेळ आली. या कालखंडात फडणवीस यांच्या नावावर इतरही अनेक राजकीय विक्रम जमा झाले. २०१९ नंतरच्या निवडणूक निकालानंतरच्या नाट्यमय घडामोडींनी त्यांचा नैसर्गिक हक्क हिरावला गेला आणि ते माजी मुख्यमंत्री ठरले. त्या काळातच अनपेक्षित क्षणी पुन्हा चमत्कार घडवून मुख्यमंत्रिपदाची शपथही त्यांनी घेतली. या प्रसंगामुळे '८० तासांचा मुख्यमंत्री' अशीही नोंद त्यांच्या नावावर झाली.

गेल्या १० वर्षांतील व त्यापैकी मागील पाच वर्षांतील या घडामोडींनी अनेक राजकीय वळणे घेतली. अशाच अनपेक्षित घडामोडी घडवून नव्या सत्तास्थापनेचा अचाट प्रयोग यशस्वीपणे पार पाडल्यानंतर पुन्हा सत्ता हाती येताच उपमुख्यमंत्रिपदावर काम करण्याचा पक्षाचा आदेशही नम्रपणे स्वीकारला. या काळात फडणवीस यांच्या वैयक्तिक राजकीय कारकीर्दीच्या आलेखात मोठे चढ-उतार आले आहेत, हे स्पष्ट आहे. म्हणूनच महायुती सरकारचे मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस हे नव्याने पदाची सूत्रे हाती घेत असताना, त्यांच्या कल्पनेतील नवा महाराष्ट्र घडविण्याबाबत त्यांनी याआधी अधोरेखित केलेल्या बाबींचा मागोवा घेणे आवश्यक ठरते. काँग्रेसी सत्तेच्या काळातील अनेक वर्षांचे राज्याचे धोरण पाहिले, तर शहरीकरण हा अभिशाप असल्याच्या भावनेतून शहरांच्या नियोजनाकडे फारसे लक्षच दिले गेले नाही. तरीही शहरीकरण होतच गेले, पण त्याचे नियोजन आपण करू शकलो नाही. परिणामी शहरे बकाल झाली. पण याच शहरांतून देशाचा सर्वाधिक जीडीपी उभा राहतो, वस्तू आणि सेवांची निर्मितीही शहरांकडूनच होते. त्यामुळे शहरांमध्ये संधी अधिक असतात, साहजिकच लोकांचा ओढादेखील शहरांकडेच असतो. म्हणून शहरांचा नियोजनबद्ध विकास होत नाही, तोवर शहरीकरणाला योग्य प्रकारे न्याय दिला जाणार नाही, याचे भान फडणवीस यांना आहे. ते त्यांनी अनेकदा बोलूनही दाखविले आहे. शहरीकरण ही एक संधी आहे. केवळ इमारती आणि रस्ते करून शहरे चांगली होणार नाहीत. आता सुविधा आणि त्यांचे सुनियोजित व्यवस्थापन सुरू झाले आहे. पंतप्रधानांच्या स्मार्ट सिटी संकल्पनेच्या गुंतवणुकीत महाराष्ट्र सर्वांत पुढे आहे, असे सांगितले जाते. अशा शहरांमध्ये शाश्वत विकास करणे ही गरज आहे. त्यासाठी शहरांमधील गुंतवणूक वाढवावी लागेल. शहरांची वस्तू आणि सेवा निर्मितीची क्षमता लक्षात सार्वजनिक क्षेत्रांतून अधिकाधिक वस्तू व सेवांची निर्मिती होईल, असा प्रयत्न व्हायला हवा. त्यासाठी शहरीकरणाचे व्यवस्थापन करणेही गरजेचे ठरेल. महाराष्ट्रातील औद्योगीकरण फक्त मुंबई-ठाण्यात दिसते. पुण्यात अलिकडे थोडे जास्त दिसते. नाशिकमध्ये हा वेग काहीसा थांबला आहे, तर छत्रपती संभाजीनगरात औद्योगीकरणाचा थोडासा प्रभाव दिसतो. त्या पलीकडे ते फारसे दिसत नाही. मुंबई-पुण्यासारख्या सुविधांचे फायदे राज्याच्या अन्य सर्व जिल्ह्यांना मिळावेत, ही महाराष्ट्राच्या विकासनीतीची अपेक्षा आहे. शेतीच्या व्यवस्थापनासाठीची एक नवी साखळी निर्माण करण्याचा संकल्प फडणवीस सरकारने समृद्धी महामार्गाच्या निर्मिती काळात सोडला होता. गेल्या काही वर्षांत ज्या अनेक कारणांमुळे महाराष्ट्राला काहीशी मरगळ आली, त्यामध्ये सत्तेची साठमारी हे महत्वाचे कारण होते. जनतेने स्पष्ट कौल दिलेल्या पक्षाला सत्तेची संधी मिळाली की सरकार स्थिर असते आणि विकासाच्या तसेच अन्य महत्त्वाच्या धोरणात्मक बाबींवर ठोस निर्णय घेऊ शकते. २०१९ नंतरचा काळ त्या दृष्टीने मोठा अस्थिरतेचा गेला. एक तर, सत्तेवर आलेल्यांना सरकार चालविण्याचा जनादेश नसतानाही व परस्परांच्या विरोधात निवडणूक लढवूनही केवळ आकड्यांची गोळाबेरीज शक्य झाल्यामुळेच सरकार स्थापन झाले असले, तरी राज्यहितासाठी सत्ता राबविण्याची त्यांची मानसिकताच नव्हती, हे त्या काळात समोर आलेल्या अनेक धक्कादायक, आश्चर्यकारक घडामोडींवरून उघड झाले होते. त्यामुळे विकासाच्या बाबतीत आर्थिक क्षेत्रात पोकळीही निर्माण झाली आणि त्याचा फायदा घेत अन्य राज्यांनी ती पोकळी भरून काढली. महाराष्ट्र मागेच राहिला. तरीही महाराष्ट्राचे आणि मुंबईचे महत्त्व कधीही कमी होणार नाही. महाराष्ट्र सदैव पुढेच राहावयास हवा आणि फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील नव्या महायुती सरकारने त्या दृष्टीनेच सतत प्रयत्नशील राहावयास हवे. शिक्षण, औद्योगीकरण, प्रकल्पग्रस्तांचे न्याय्य पुनर्वसन, समतोल विकास आणि अनुशेष वा शेतकऱ्यांच्या समस्या अशा अनेक प्रश्नांवर सकारात्मकदृष्ट्या भरीव काम करण्याची संधी संपूर्ण बहुमत असलेल्या स्थिर सरकारला लाभली आहे. राज्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय आणि लक्ष्य आहे, असे देवेंद्र फडणवीस नेहमी सांगत असतात. फडणवीस यांच्याकडे पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपद आले आहे. अगोदरच्या सत्ताकाळात अनेक गुपितेही त्यांच्यासमोर उघडी झाली असतील, यात शंका नाही. त्यांचा वापर करण्याची संधी साधून जुन्या वाटांना पडलेली भगदाडे बुजविण्याची, महाराष्ट्र आता नव्या विश्वासाने पुढे जात आहे, याची ग्वाही देण्याची व 'पक्ष अधिक शक्तिमान झाला आहे' असा विश्वास पक्ष आणि परिवारात पुन्हा रुजविण्याची ज्येष्ठत्वाची भूमिका फडणवीस यांनाच पार पाडावी लागणार आहे. कारण नेतृत्वाच्या आणि राजकारणातील कौशल्य सिद्ध करण्याच्या साऱ्या कसोट्या त्यांनी लीलया पार पाडल्या आहेत.

## दृष्टिक्षेप

**विलास पंढरी**

# ट्रम्प, मोदी आणि भारत

अंबानी कुटुंबात काही दिवसांपूर्वी झालेल्या लग्नाचे कवित्व अनेक दिवस पूर्ण मीडिया व्यापून राहिले होते. अमेरिका हे तर जगातील सर्वाधिक शक्तिशाली राष्ट्र, महासत्ता. किती शक्तिशाली तर जीडीपी, दरडोई उत्पन्न, शस्त्रास्त्रे, जगातील सर्वात शक्तिशाली सैन्य अशा महत्त्वपूर्ण क्षेत्रात एक नंबरवर आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था किती मोठी आहे, हे समजण्यासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेची आकडेवारी पाहायला हवी. अलिकडेच भारतीय अर्थव्यवस्था ब्रिटनला मागे टाकून जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. भारताचा २०२३ अखेरचा जीडीपी ३७५५ अब्ज डॉलर्स असून त्याचे दरडोई उत्पन्न २३८९ डॉलर्स होते. अमेरिका ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून तिचा २०२३ अखेरचा जीडीपी तब्बल २६,४६२ डॉलर्स अब्ज इतका होता आणि दरडोई उत्पन्न ८०,३९९ डॉलर्स होते. अशा महाशक्तिशाली देशाच्या प्रमुखपदी दुसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांची चर्चा येत्या कमीत कमी २० जानेवारीपर्यंत तरी सर्व माध्यमातून होतच राहणार आहे. कारण युनायटेड स्टेट्समध्ये दर चार वर्षांनी २० जानेवारी रोजी नवनिर्वाचित अध्यक्षांचा शपथविधी आयोजित केला जातो; जो नवीन राष्ट्रपती पदाच्या कार्यकाळाच्या प्रारंभास सूचित करतो. ट्रम्प यांनी उपाध्यक्ष कमला हॅरिस यांच्यावर निर्णायक विजय मिळवून अमेरिकेच्या अध्यक्षपदावर पुनरागमन केले आहे. त्यांचा अधिकृत शपथविधी सोमवार, २० जानेवारी, २०२५ रोजी वॉशिंग्टन, डीसीमधील यूएस कॅपिटल येथे होईल.

ट्रम्प आणि मोदी दोघेही जगातील लोकसंख्येने मोठ्या लोकशाही देशांचे निवडून आलेले प्रमुख आहेत. दोघांमध्ये चांगली मैत्री असून दोन्ही देशांना त्याचा फायदा नक्कीच होऊ शकतो. २५ डिसेंबर २०१५ रोजी रशिया दौऱ्यावरून परतताना तत्कालीन पाक पंतप्रधान नवाज शरीफांची अचानक घेतलेली भेट, अचानक जाहीर केलेली नोटबंदी, पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी भारतीय जवानांच्या केलेल्या हत्येनंतर पाकिस्तानला धडा शिकवणारा केलेला सर्जिकल आणि एअर स्ट्राईक असे धक्कादायक निर्णय मोदींनी घेतले.

२०१६ साली ट्रम्प यांनी आपल्या कॅबिनेटसाठी मंत्र्यांना निवडले, काहींना मनाला येईल तेव्हा काढले, पुन्हा घेतले. आता ट्रम्प आपल्या समर्थकांनाच निवडत आहेत. ट्रम्प म्हणतील तीच पूर्व दिशा असे म्हणणारी माणसे मंत्रिमंडळात घेतली जात आहेत. विशेष म्हणजे भारतीय वंशाच्या काहींना महत्त्वपूर्ण पदे मिळाली आहेत; याचा मात्र भारताला फायदा होऊ शकतो. मोदी आणि ट्रम्प दोघांनाही जनतेशी थेट संवाद साधण्याची कला अवगत असून मोदींनी तर रॅलीत केलेल्या जोरदार भाषणांनी जनतेशी थेट संवाद प्रस्थापित करण्याचा विक्रमच प्रस्थापित केला आहे. ट्रम्प यांच्याप्रमाणेच मोदींनीही प्रेसकडे दुर्लक्ष केले आहे. मोदींनी आत्तापर्यंत कोणत्याही पत्रकार परिषदेला संबोधित केलेले नाही. काही वृत्तवाहिन्यांशिवाय कोणत्याही पत्रकाराला मुलाखत दिलेली नाही. ट्रम्प आणि मोदी या दोघांनीही धोरणात्मक घोषणा करण्यासाठी, महत्त्वाचे मतप्रदर्शन करण्यासाठी पूर्वीच्या ट्विटर आणि आत्ताच्या एक्स हँडलचा लीलया वापर केल्याचे दिसते. ट्रम्प यांची पृष्ठभूमी अतिश्रीमंत अशी आहे. त्यांचे वडीलही श्रीमंत होते तर स्वतः ट्रम्प फार मोठे उद्योगपती आहेत. मोदींची पृष्ठभूमी अतिशय गरिबीची असून त्यांचे वडील चहा विक्रीचा व्यवसाय करीत होते. मोदी हे भाजपाचे स्पष्टपणे एकमताने निवडलेले पंतप्रधान पदासाठीचे उमेदवार होते. अमेरिकेतील राजकीय प्रणालींमधील फरकामुळे, ट्रम्प आपल्या मंत्रिमंडळासह नवीन नोकरशाहीची भरती करू शकतात. भारतातील प्रणालीनुसार कायमस्वरूपी नोकरशाहीतूनच आपल्याला हवे ते अधिकारी निवडण्याचे मर्यादित स्वातंत्र्य मोदींना आहे. त्यांनी भारताचे माजी परराष्ट्र सचिव एस. जयशंकर यांची परराष्ट्रमंत्री म्हणून केलेली निवड. ते परराष्ट्रमंत्री म्हणून एवढे उत्तम काम करीत आहेत की विरोधकांनासुद्धा त्यांच्यावर टीका करणे शक्य होत नाही.

ट्रम्प यांना आणखी चार वर्षांचाच कार्यकाळ मिळू शकतो. कारण अमेरिकेच्या घटनेने अध्यक्षांना जास्तीत जास्त दोन-चार वर्षांच्या टर्म्सची मर्यादा घातली आहे. मोदींची सध्याच पाच वर्षे असलेली तिसरी टर्म सुरू असून अमेरिकेसारखी कुठलीही मर्यादा आपल्याकडे नाही. मोदींनी आतंकवादाविरुद्ध कडक धोरण अंगीकारण्याचे धैर्य दाखविले आहे, हे दोघांमध्ये साम्य असले, तरी मुस्लिम आतंकवाद असा थेट उल्लेख करण्याचे ते टाळतात. ट्रम्प यांनी निवडणुकीपूर्वीच्या आपल्या सार्वजनिक भाषणात बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन अल्पसंख्यकांवर होत असलेल्या अत्याचारांचा तीव्र निषेध केला असून निवडून आल्यावर बांगलादेशातील युनूस सरकारवर हिंदूंच्या संरक्षणासाठी दबाव आणण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांच्याकडे असलेले सामर्थ्य बघता ते यात यशस्वी होतील, अशी आशा आहे. बांगलादेशातील हिंदूंविषयी ट्रम्प यांनी व्यक्त केलेली काळजी भारत व अमेरिकेतील नव्हे तर साऱ्या जगातील हिंदू समाजाला सुखावणारी होती. त्यांच्या प्रतिस्पर्धी भारतीय वंशाच्या असूनही कमला हॅरिस यांनी मात्र बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारांचा साधा निषेध केला नव्हता.

पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती ट्रम्प राष्ट्रवाद आणि संरक्षण नीतीला बळकटी देण्यात अग्रेसर आहेत. अमेरिकेमध्ये स्थलांतरित लोकांविरुद्ध कडक धोरण ट्रम्प यांनी अवलंबले आहे तसेच मोदी यांनी भारतामध्ये घुसखोरांविरुद्ध कडक पावले उचलली आहेत. ट्रम्प यांच्या स्थलांतरित नागरिकांविरुद्ध धोरणाचा परिणाम हा मुस्लिम समाजावर पडला होता तसेच काहीसे चित्र हे भारतामध्ये पाहायला मिळते. काश्मीरमधून ३७० कलम हटवल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या या निर्णयावर टीका करण्यात आली होती. मात्र, ट्रम्प यांनी या निर्णयाचे स्वागत करत भारत सरकारच्या निर्णयाला समर्थन दिले होते. अमेरिकेमध्ये नरेंद्र मोदी यांच्यासाठी 'हाऊडी मोदी' कार्यक्रमाचे आयोजन केले होते, तर अहमदाबादमध्ये ट्रम्प यांच्यासाठी 'नमस्ते ट्रम्प' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चीन-अमेरिकेचा व्यावसायिक प्रतिस्पर्धी आणि विरोधक असल्याने ट्रम्प यांची चीनविरोधी धोरणे चीनवर दबाव ठेवण्यासाठी भारताला नक्कीच फायदेशीर ठरणार आहेत.

दोघांनाही कमीत कमी पुढील चार वर्षे मिळणार असून भारताची प्रगती वेगाने होईल, अशी अपेक्षा आहे. युक्रेन पूर्णतः अमेरिका आणि नाटो गटातील राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून असल्याने ट्रम्प ही मदत थांबवतील आणि पर्यायाने युद्ध थांबवल्याचे श्रेय लाटतील, पण इस्रायलला मात्र मदत चालू ठेवून ते उघडपणे म्हणत असलेल्या इस्लामी वर्चस्वाला लगाम लावतील असे वाटते.

९८६०६१३८७२

## वेध

**विजय पांढरीपांडे**

# लाडके विद्यार्थी योजना

कुलगुरू आपल्या दालनात फायली चाळत होते. अर्धा दिवस उलटून गेला, तरी कुणी निवेदन द्यायला आले नाही, मोर्चा घेऊन आले नाही, याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. हे घडले नाही तर कुलगुरूंना चुकल्या चुकल्यासारखं वाटतं. तितक्यात सचिवाने १०-१२ विद्यार्थी आल्याचे सांगितले. नियमाप्रमाणे सुरक्षा गार्ड आधी आत आले. त्यांनी माहिती दिली, मुलांना फक्त निवेदन द्यायचे आहे. तसाही बाहेर आरडाओरडा ऐकू येत नव्हता. त्यामुळे कुलगुरू बिनधास्त होते. त्यांनी मुलांना परवानगी दिली. तसा घोळका आत आला. दोघे-तिघे उपरणे घातलेले... कुठल्या तरी पक्षाचे विद्यार्थी सेनेचे स्वयंघोषित नेते.

"बोला काय काम काढलं? कसली मागणी?"

"निवेदन आहे सर लहानसे. सरकारने लाडकी बहीण, लाडका भाऊ अशा लाडक्या योजना सुरू केल्या आहेत. आमचे म्हणणे एवढेच आहे की, यालाच जोडून 'लाडके विद्यार्थी' अशी योजना सुरू करण्यात यावी."

"अरे व्वा! छान कल्पना आहे. पण सरकारने करायचं काय?"

"काही जास्त नाही सर. विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय घ्यायचे. त्यांच्या अडचणी सोडवायच्या?"

"म्हणजे नेमके काय करायचे?" कुलगुरूंनी गुगली प्रश्न टाकला.

"सर, अनेक विद्यार्थी फेल होतात. त्यांना काही विषय समजत नाहीत. जड जातात. त्यांना सवलत द्यायची. पुढच्या वर्गात बसू द्यायचे. हजेरी नसली तरी परीक्षेला बसू द्यायचे. फी कमी करायची. होस्टेलमध्ये नोकरी लागेपर्यंत, म्हणजे सरकारी घर मिळेपर्यंत राहू द्यायचे. मेसमध्ये जेवू द्यायचे. सोपे पेपर काढायचे. परीक्षेची भीती वाटते सर सगळ्याच मुलांना. मुलं आत्महत्या करतात मग ताण सहन झाला नाही की!"



"कल्पना छानच आहे की! मलादेखील हे सुचलं नाही इतके दिवस. आपण असे करू. परीक्षाच बंद करू. विद्यापीठाचे लाखो-करोडो रुपये खर्च होतात परीक्षा घेण्यात. पेपर काढा, ते तपासा, निकाल लावा यात प्राध्यापकांचा वेळही वाया जातो. त्यातून निष्पन्न काहीच होत नाही. कारण आपल्या निकालावर कुणी विश्वास ठेवत नाही. प्रत्येक कंपनी पुन्हा वेगळी परीक्षा घेते. पुढील शिक्षण घ्यायचे तर पुन्हा प्रवेश परीक्षा द्या. मग त्या प्रवेश परीक्षांचा घोळ, पेपर फुटणे, निकाल चुकीचे लागणे, वरचा नंबर येण्यासाठी लाच देणे, जुगाड करणे... तुम्हाला, तुमच्या पालकांना नसता त्रास. शिवाय सगळ्यांच्या वेळेचा अपव्यय. त्यापेक्षा आपण परीक्षा विभागच बंद करू. चार वर्षे झाली की 'कोर्स पूर्ण केला' असे सर्टिफिकेट देऊन टाकू. तुम्हालाही ताण नको. आम्हालाही ताण नको. शिवाय त्यामुळे सर्वांचा वेळ वाचेल. प्राध्यापक त्या वेळात संशोधन करतील. त्यामुळे देशाची प्रगती होईल. मुख्य म्हणजे लाखो रुपये वाचतील. ते पैसे आपल्याला, म्हणजे विद्यापीठाला, म्हणजे सरकारला 'लाडके विद्यार्थी योजने'साठी सहज वळते करता येतील! त्यासाठी बजेटमध्ये वेगळी तरतूद करावी लागणार नाही. आता परीक्षाच नाही म्हटले की, विद्यार्थ्यांना ताण नाही. आत्महत्या नाही. सगळेच प्रश्न एकाच दणक्यात सुटतील. मी हे सहज रिकमेंड करतो पुढील कारवाईसाठी...!" कुलगुरू इतक्या सहजपणे हे सगळे मान्य करतील असे त्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना वाटले नव्हते. त्यांनी नारे लावले... विजय असो... लाडके विद्यार्थी झालेच पाहिजे... वगैरे. मुलांनी निवेदन देताना फोटो काढले. नेते पुढे पुढे झाले अन् नारे देत निघून गेले.

पाचच मिनिटांत त्यातले दोन नेते पुन्हा परत आले. यावेळी ते चक्क कुलगुरूंच्या पाया पडले. म्हणाले,

"सर माफ करा, तुम्ही काहीच ॲक्शन वगैरे घेऊ नका. आम्हाला वरचे नेते सांगतात ते आम्ही करतो. उद्या फक्त फोटोसह बातम्या यायला हव्यात आम्हाला. तुम्ही परीक्षा विभाग बंद करू नका सर. उलट कडक धोरण ठेवा आहे त्यापेक्षा. आपल्या विद्यापीठाचे नाव झाले पाहिजे. रँक वाढली पाहिजे. तुम्हीच ते करू शकता."

कुलगुरू ओठातल्या ओठात हसले. कुलगुरूसोबत सेल्फी घेऊन नेते हसत निघून गेले. कुलगुरूंनी निवेदन फाईल करण्यासाठी कुलसचिवाकडे पाठवून दिले. एक तरी मोर्चा आल्याने कुलगुरूंना समाधान वाटले. आता लंच ब्रेक घ्यायला हरकत नव्हती.

७६५९०८४५५५

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# फडणविशी : भाजपाचा भविष्यातील चेहरा!

अखेर सस्पेन्स संपला. तसा तो नव्हताच. मात्र राक्षसी बहुमत मिळून १३ दिवस उलटले. तरीही महायुतीचे सरकार बनत नाही म्हणून लोक अस्वस्थ होते. या विधानसभा निवडणुकीत भाजपाने १३२ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री भाजपाचाच होणार हे स्पष्ट होते. देवेंद्र फडणवीस यांनी एकहाती ही निवडणूक जिंकवून आणली म्हणून मुख्यमंत्री तेच होणार, हे स्पष्ट होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींची मान्यता, संघाचा आग्रह, पाठीशी शंभरावर आमदारांचे सैन्य. असे सारे असतानाही घोळ घातला गेला. अजितदादा त्रास देतील असे अनेकांना वाटले होते; मात्र ज्यांच्यासाठी फडणवीस यांनी अडीच वर्षांपूर्वी 'त्याग' केला, त्या एकनाथ शिंदेंनीच टेन्शन होते. चॅनेलवाल्यांना एवढे दिवस खाद्य मिळाले. ठीक आहे. राजकारणात प्रत्येकाला काही महत्त्वाकांक्षा असतात. शेवट गोड झाला हे महत्त्वाचे. 'मी पुन्हा येईन' असे फडणवीस म्हणाले होते. त्यांनी शब्द निभवला. 'समुद्र पुन्हा येतोय.' त्यामुळे किनाऱ्यावर दुकानं लावू पाहणाऱ्यांची पळापळ सुरू आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात प्रत्येक पिढी एका नेत्याभोवती फिरते. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील यांच्याकडे महाराष्ट्राचे नेते म्हणून बघितले जायचे. कालपर्यंत हे स्थान शरद पवार अडवून बसले होते. या निकालाने शरद पवारांचे युग पूर्ण संपवले. उद्धव ठाकरे उत्तम फोटोग्राफर आहेत. आता लग्न-मौंजीच्या ऑर्डर घ्यायला ते मोकळे झाले आहेत. काँग्रेस कोमामध्ये आहे. सक्षम विरोधी नेता आहे कुठे? आताच्या पिढीत देवेंद्र फडणवीस हे नाव निर्विवादपणे नंबर एकवर आहे. वयाच्या २२ व्या वर्षी नगरसेवक, २७ व्या वर्षी सर्वात तरुण महापौर, १९९९ पासून सतत सहाव्यांदा आमदार, २०१४ मध्ये मुख्यमंत्री, पुढे पहाटेच्या शपथविधीच्या ७२ तासांचे मुख्यमंत्री आणि आता तिसऱ्यांदा मुख्यमंत्री. राजकारणातील ही 'फडणविशी' आहे. त्यांच्या सोबत राजकारण सुरू करणारे बहुतेक नेते विस्मृतीत गेले. देवेंद्र धावताहेत. त्यांच्याकडे वय आहे, विकासाचा आश्वासक चेहरा आहे, क्षमता आहे, संघ परिवाराच्या संस्कारात वाढले आहेत; आणखी २५ वर्षे धावतील. संयमी, सुसंस्कृत पण पक्षहितासाठी विरोधकांवर तुटून पडणारा भाजपाचा हा नेता उद्याचे 'पीएम मटेरियल' आहे. एकही मराठी नेता पंतप्रधान झाला नाही, याची महाराष्ट्राला खंत आहे. फडणवीस ती दूर करू शकतात. शपथविधीला त्यामुळेच महत्त्व आहे.

देवेंद्र फडणवीसांनी असे काय केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांचा 'परममित्र' म्हणून उल्लेख करतात, असा प्रश्न बहुतेकांना पडतो. त्याच्या उत्तरासाठी १० वर्षे मागे जावे लागेल... २०१४ च्या निवडणुकीच्या धामधुमीचा तो काळ होता. भाजपाने मोदींना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून जाहीर केले होते. देश जिंकायचा तर महाराष्ट्र जिंकणे आवश्यक आहे, हे मोदींच्या चाणाक्ष नजरेने हेरले होते. मोदी नव्या चेहऱ्याच्या शोधात होते. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची खुबी, कुठलाही अहंकार नाही, मात्र प्रचंड आत्मविश्वास या



गुणांवर एक तरुण मोदींच्या मनात भरला. निवडणूक प्रचाराच्या नागपूरच्या सभेत मोदी म्हणाले होते, "हा तरुण नागपूरने महाराष्ट्राला दिलेला हिरा आहे." हा तोच हिरा आहे ज्याने सध्या विरोधकांची झोप उडवली आहे. शरद पवारांचे ५० वर्षांचे घरफोडी राजकारण संपवले आहे. 'मी राहीन किंवा तू राहशील' अशा भाषेत ललकारणाऱ्या उद्धव ठाकरेंना घरी बसवले आहे. फडणवीसांनी मग काय वेगळे केले? चोवीस तास राजकारण करणाऱ्या नेत्याने जे करायला हवे, तेच फडणवीसांनी केले. मोदी युगात राजकारण हा पार्ट टाईम जॉब नाही. प्रचंड परिश्रम घेऊन टार्गेटचा पिच्छा करायचा हा भाजपाच्या आजच्या यशाचा मंत्र आहे. फडणवीसांनी आपल्या नेत्यांचे 'वर्क कल्चर' स्वीकारले, त्यावर स्वतःचा 'तडका' मारला. फडणवीसांचे आजचे जे नेतृत्व तुम्हाला दिसते, ती गेल्या १० वर्षांतील त्यांची कमाई आहे. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्या तालमीत तयार होताना त्यांनी भाजपाच्या प्रदेशाध्यक्षापर्यंत धडक मारली. थेट नरेंद्र मोदींशी संपर्क आला. मोदींनी संधी दिली आणि फडणवीसांनी त्या संधीचे सोने केले. मोदींनी त्यांना कुठलेही जास्तीचे अधिकार दिले नव्हते. पण तल्लख बुद्धी, समयसूचकता आणि आत्मविश्वासाने घेतलेले निर्णय प्रत्यक्षात उतरवताना फडणवीसांनी दाखवलेली धमक कौतुकाचा विषय झाली. या निवडणुकीची लढाई तर त्यांनी एकहाती लढली. सामाजिक समीकरणांना छेद देत केवळ स्वतःलाच नव्हे, तर भाजपालाही सिद्ध केले. त्यामुळेच मोदी छायेतल्या अनेक बड्या नेत्यांना मागे सारून स्वतःला महाराष्ट्राचा निर्विवाद नेता म्हणून मोठी झेप घेतली. समृद्धी महामार्ग, जलयुक्त शिवार, मेट्रो रेल्वेचे जाळे, मुंबईचा कोस्टल रोड, विकासाचे अनेक प्रकल्प सांगता येतील. आत्मविश्वास असेल तर नेते स्वयंप्रेरणेने काम करू शकतात, हे दाखवून देताना फडणवीसांनी स्वतःची निर्णय क्षमता सिद्ध केली आहे. २०१४ पासून सलग पाच वर्षे देवेंद्र मुख्यमंत्री होते. या आधी वसंतराव नाईक सलग ११ वर्षे मुख्यमंत्री राहिले आहेत. शरद पवार चारदा मुख्यमंत्री होते. मात्र, त्यांनाही सलग पाच वर्षे मुख्यमंत्रिपद टिकवता आले नव्हते. पवारांना जमले नाही ते फडणवीसांनी करून दाखवले. राज्य चालवण्याचा कुठलाही अनुभव नसताना फडणवीसांना हे कसे जमते, असा प्रश्न तुम्हालाही पडत असणार. तीच फडणवीसांची खासियत आहे. त्यांची एक खुबी आहे. ते विरोधकांना चूक करू देण्याची वाट बघतात. त्यांच्याशी पंगे घेणाऱ्या अनेक नेत्यांनी शरणागती पत्करली. 'कल का छोकरा' म्हणत एकनाथ खडसेंनी फडणवीसांशी पंगा घेतला. त्या नादात खडसे केव्हा संपले ते त्यांनाही कळले नाही. अनेक नेत्यांवर घोटाळ्याचे आरोप झाले. मात्र फडणवीसांवर कुठला आरोप करण्याचे धाडस विरोधकांना झाले नाही, हे विशेष. राजकारणात फक्त 'गॉडफादर' असून भागत नसते. त्याने दिलेल्या संधीचे सोने करण्यासाठी कष्ट उपसावे लागतात. त्यांनी ते उपसले. १८-१८ तास काम करून त्यांनी स्वतःची जागा निर्माण केली. ती जागाच आज त्यांना तिसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून खुणावते आहे.

२०१९ ची निवडणूक भाजपा आणि शिवसेना यांनी युती करून लढवली होती. युतीला बहुमतही मिळाले होते. पण उद्धव ठाकरेंनी दगा दिला. मुख्यमंत्री व्हायच्या नादात शरद पवारांच्या जाळ्यात अडकले. त्या धुंदीत हिंदुत्व सोडले. पवार म्हणा की उद्धव म्हणा, दोघांनीही फडणवीसांना टार्गेट केले होते. फडणवीसांना रोखले नाही तर आपले राजकारण संपणार, हे ओळखून पवारांनी उद्धव ठाकरेंना पुढे केले होते. उद्धव बिनकामाचे निघाले हे खुद्द पवारांनी आपल्या पुस्तकात लिहिले आहे. तरीही फडणवीसांना संपवण्यासाठी त्यांनी महाविकास आघाडीचे भूत उभे केले होते. फडणवीसद्वेष हाच त्यांचा अजेंडा होता. भाजपाच्या विकास कामांना स्थगिती देण्यापलीकडे यांनी काही केले नाही. अडीच वर्षांतच ठाकरे सरकार कोसळले तेव्हा पवारांनी मराठा आरक्षणाच्या बहाण्याने फडणवीसांना घेरू पाहिले. या आधुनिक अभिमन्यूने तेही चक्रव्यूह भेदले. कुठल्याही नेत्यावर एवढे हल्ले झाले नसतील जेवढे प्रहार फडणवीसांनी झेलले आहेत. फडणवीसांनी आपल्या कारकीर्दीत मराठा आरक्षण करून घेतलं होतं. हायकोर्टात ते टिकवूनही दाखवलं. २०१९ मध्ये त्यांचे सरकार राहिले असते तर ते त्यांनी सुप्रीम कोर्टातही टिकवलं असतं. मात्र ते शरद पवारांना नको होतं. समाजाचा एक नेता सर्व जातींचा नेता होतो, हे पवारांच्या डोळ्यात खुपत होतं. मनोज जरांगे पाटलांना कोणी उचकवलं? ते आता बाहेर येत आहे. पण आता जरांगे हंगामा करू शकणार नाहीत. आपला माणूस कोण हे आता मराठ्यांनाही उमगले आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## सनातनची आनंददायी स्वभावदोष निर्मूलन प्रक्रिया

सद्यस्थितीत आपण पाहतो की, आपले जीवन धकाधकीचे झाले आहे. जीवन जगण्यासाठी खूप धडपड करावी लागत आहे. अशा परिस्थितीत निराशा आणि ताणतणावाचे वातावरण निर्माण होते; ज्यामुळे मानसिक अडचणींनाही सामोरे जावे लागते. सर्वप्रथम मानसिक आरोग्य चांगले ठेवणे, निरोगी राहणे आणि जीवनातील अडचणींना सामोरे जाणे ही आपली प्राथमिक गरज बनली आहे. बाहेर कितीही प्रतिकूल वातावरण असले, तरी आपले मन शांत, स्थिर आणि सुदृढ कसे राहील, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मन शांत ठेवण्यासाठी आपल्यातील दोष ओळखणे आणि त्यावर मात करणे महत्त्वाचे आहे. आपल्यामध्ये अतिविचार करणे, आत्मकेंद्रितपणा असे अनेक अहंभाव, न्यूनगंड, नकारात्मकता किंवा ऐकण्याची वृत्ती नसणे असे दोष कमी-अधिक प्रमाणात दिसून येतात; ज्यामुळे आपण मानसिक स्वास्थ्य गमावून बसतो. यातून बाहेर पडण्यासाठी नेमके काय करावे, असे विचार मनात येत असताना सनातन संस्थेचा स्वभावदोष आणि अहं निर्मूलन प्रक्रिया हा ग्रंथ वाचण्यात आला. या ग्रंथात इंद्रियांवर ताबा कसा मिळवायचा यासाठी शास्त्रशुद्ध पद्धत सांगण्यात आली आहे. मनाला योग्य त्या स्वयं-सूचना दिल्यास त्याच्या सैरभैरतेला आळा घालता येतो. अशा स्वयं-सूचना दिल्याने मन आणि इंद्रियांवर ताबा मिळवता येतो, याची अनेक उदाहरणे या ग्रंथात दिली आहेत. याव्यतिरिक्त संस्थेद्वारे निर्मित अन्य ग्रंथांचे वाचन करण्यात आले. भावी पिढीला अध्यात्मातील विविध विषयांवरील ज्ञान मिळावे, या उदात्त हेतूने या ग्रंथांची निर्मिती झाली आहे. आनंदमय जीवनासाठी या ग्रंथांचा लाभ घेता येईल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

## देवाभाऊंचे अभिनंदन

'मैं समंदर हूं, लौटकर जरूर आऊंगा...' अशा आत्मविश्वासाने, सत्तेसाठी तत्त्वांना तिलांजली देणाऱ्या धोकेबाजांना आव्हान देणारे देवेंद्र गंगाधर फडणवीस आता परत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार, हे स्पष्ट झाल्याची बातमी भाजपा आमदारांच्या मुंबईतील सभेनंतर येताच देशभर आनंदाची लाट पसरली आहे. 'अकेला देवेंद्र क्या करेगा?' या प्रश्नांचे उत्तर त्यांना मिळाले असेलच. या अभूतपूर्व यशाबद्दल देवाभाऊंचे हार्दिक अभिनंदन!

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

●● ●●

## मनाच्या श्रीमंतीची किमया

व्यक्तिजीवनात धनापेक्षा मन महत्त्वाचे असते. धन हे सर्व प्रकारचे सुख, संपन्नता, समाधान, संतुष्टता, ऐश्वर्य वैभव इत्यादी सर्व देऊ शकते. पण हेच धन, मनःशांती, मनसंपन्नता, मनप्रसन्नता देऊ शकत नाही. मनाच्या शांतीसाठी, मनातील वेदना निवारण्यासाठी, मनातील दुःख हे सर्व दूर करण्यासाठी या सर्वांचे निराकरण करण्यासाठी मनापासून मनांपर्यंत जोडलेली माणसचं उपयुक्त ठरतात हे कदापिही विसरता कामा नये. जोडलेली मनच शांती देऊ शकतात. म्हणून म्हटले जाते की, धनाच्या श्रीमंतीमुळे कमावलेली माणसे, धन असेपर्यंतच साथ देतात, संगत ठेवतात व धन संपले की दूर जातात. परंतु मनाच्या श्रीमंतीमुळे कमावलेली माणसे, आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत साथ देतात, सोबत समाजातील सर्व व्यक्तींनी आपले मन सदैव स्वच्छ, निर्मळ, निकोप ठेवून मनं जोडावी. धनाच्या श्रीमंतीपेक्षा मनाची श्रीमंती ही जगात सर्वश्रेष्ठ आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

## भाजपाचा नांदेड लोकसभा, झारखंड पराभव!

महाराष्ट्राच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत महायुतीतल्या भाजपा १३२, शिवसेना ५७ व राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागा जिंकल्या तर महाविकास आघाडीतील काँग्रेस १६, उबाठा २० व शरद पवार गटाने १० जागा जिंकल्या. एकूण ४६ म्हणजे विरोधी पक्षनेत्यासाठी आवश्यक आकड्यालाही या तिन्ही पक्षातील कोणीही गाठू शकले नाही. एवढी दयनीय आणि नामुष्कीची वेळ आघाडीतील या पक्षांवर सुज्ञ मतदारांनी आणली. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेस उमेदवार रवींद्र चव्हाण यांनी भाजपाचे डॉ. संतुक हंबर्डे यांचा फेरमोजणीत अवघ्या १४५७ मतांनी पराभव केला. या पराभवाचे शल्य निश्चित बोचणारे आहे. येथे विजय झाला असता तर भाजपाचे लोकसभेतील संख्याबळ एकने वाढून ते २४१ झाले असते. महाराष्ट्रात ते १० आणि महायुतीच्या विजयी खासदारांची संख्या १८ झाली असती. सार्वत्रिक पोटनिवडणुकीतही भाजपा उमेदवाराचा येथून पराभव झाला होता. तिकडे झारखंडमध्ये भाजपा नेत्यांनी एक्सपायरी डेट झालेल्यांना पक्षात सामावून घेत आयाराम गयारामावर भिस्त ठेवली. झारखंड मुक्ती मोर्चातून आलेल्या चम्पई सोरेन व इतरही जनाधार नसलेल्यांना उमेदवारी देत त्यांनी पराभवावर शिक्कामोर्तब केले. परिणामी पूर्वी होत्या तेवढ्या २५ जागाही भाजपा राखू शकली नाही. घुसखोरीचा मुद्दा हेमंत सोरेन यांच्या आदिवासी एक है तो सेफ है पुढे पुरता निष्प्रभ ठरला आणि भ्रष्टाचारासाठी त्यांना तुम्ही जेलमध्ये टाकल्यावरही तुमच्या नाकावर टिच्चून ते सहकाऱ्यांसह परत सत्तेत परतले.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

## संक्षिप्त वृत्त



### घोणस जातीच्या विषारी सापाला डब्ल्यूसीएएस सदस्यांनी दिले जीवदान

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर -**

८० फुट खोल विहीरीत पडलेल्या घोणस जातीच्या विषारी सापाला डब्ल्यूसीएएस सदस्यांनी जीवदान दिले. १ डिसेंबर रोजी चपळगाव (ता. अक्कलकोट) गावातील बावकरवाडी येथील शेतकरी संगमेश्वर पाटील यांच्या विहीरीमध्ये दोन साप पडल्याची माहिती त्यांनी डब्ल्यूसीएएस चे सदस्य सचिन पाटील यांना कळविली. पाटील यांनी ही माहिती संतोष धाकपाडे यांना सांगितली. ही माहिती मिळाल्यानंतर डब्ल्यूसीएएसचे सदस्य अजित चौहान व संतोष धाकपाडे हे ४ डिसेंबर रोजी सकाळी बावकरवाडीला गेले. शेतात पोहोचल्यानंतर विहीरीची पाहणी केली असता त्या विहीरीत घोणस जातीचे दोन विषारी साप त्यांना दिसून आले. परंतू विहीराला पायऱ्या नसल्याने सापांना रेस्क्यू कसे करायचे हा मोठा प्रश्न दोघांसमोर उभा होता. परंतु दोघांनी क्षणाचाहि विलंब न करता पोलीस पाटील विजय बावकर यांच्याकडून एका क्रेटची मागणी केली. त्या क्रेटच्या एका बाजूला दोरी व दुसऱ्या बाजूला ड्रीपचे पाईप बांधून ते क्रेट विहिरीत सोडण्यात आले. एका बाजूला तेथील शेतकरी व एका बाजूला डब्ल्यूसीएएस सदस्य यांनी ते क्रेट विहिरीत उतरवले. विहीर आकाराने मोठी होती आणि आत पाणी भरपूर असल्याकारणाने विहिरीमध्ये सापांना फिरण्यास मुबलक जागा होती. दोन ते तीन तासाच्या अथक परिश्रमानांतर एकेक करून त्या दोन्ही सापांना क्रेटमध्ये पकडून विहिरीबाहेर काढण्यात आले. विहिरीच्या बाहेर काढल्यानंतर त्याला सुरक्षितरित्या दोन वेगवेगळ्या पिशवीमध्ये बंद करून जवळच त्यांच्या नैसर्गिक अधिवासामध्ये सोडून देण्यात आले. या बचाव कार्यामध्ये डब्ल्यूसीएएसचे अजित चौहान, संतोष धाकपाडे, बावकरवाडीचे विजय बावकर, सिद्धनाथ बिराजदार, सुरेश इंगोले आदींनी सहभाग घेतला.

### भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोश महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्षपदी कारमपुरी

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

कामगार नेते व मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समितीचे संस्थापक विष्णू कारमपुरी यांचे भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश



महाराष्ट्र राज्य संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष म्हणून संघटनेचे अध्यक्ष व संस्थापक भाऊसाहेब कांबळे यांनी जाहीर केले आहे. महाराष्ट्र राज्य भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश संघटनेचे प्रदेश अध्यक्ष व संस्थापक भाऊसाहेब कांबळे यांनी पत्रान्वये निवड जाहीर केले आहे. भारत सरकार मान्यताप्राप्त भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश (महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या राज्य प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य) पदी २ वर्षाकरिता आपली निवड करण्यात आलेली आहे.

### इन्शुरन्स सल्लागारांसाठी आयप्रू एज ॲप

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सने सल्लागारांसाठी खास तयार केलेला आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या सल्लागारांच्या उत्पादकतेत एच१-एफवाय२०२५ मध्ये ३७% वाढीचा अनुभव आला. ज्यामुळे त्यांच्या कमाईतही वाढ झाली.महत्त्वाची गोष्ट म्हणजे,आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या ९८.१% एजंटना एकाच दिवशी त्यांचे कमिशन प्राप्त झाले.यावेळी शोबी सॅम म्हणाले,आमचा आयप्रू एज मोबाइल ॲप इन्शुरन्स एजंटना व्यवसाय वाढवण्यास सक्षम करत आहे. एच १-एफवाय२०२५ मध्ये आम्ही पाहिलेली ३७% ची उत्पादकता वाढ याचेच एक उदाहरण आहे.त्याचबरोबर आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या ९८.१% सल्लागारांना एकाच दिवशी कमिशन मिळाले.

### विलास कुलकर्णी यांचे निधन



**अकलूज, दि. ५ डिसेंबर-**

येथील ब्राह्मण सेवा संघाचे ज्येष्ठ सदस्य विलास दिनकरराव कुलकर्णी उर्फ बापूराव (वय ६२) यांचे गुरुवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन बंधू, भाऊजया, पुतणे असा परिवार आहे. ब्राह्मण सेवा संघाचे माजी अध्यक्ष व वृत्तपत्र विक्रेते प्रमोद उर्फ अण्णा कुलकर्णी यांचे ते कनिष्ठ बंधू होत.

# एनबीएन सिंहगड इन्स्टिट्यूटला सांघिक प्रकारात तिहेरी मुकुट

### जिल्हा विज्ञान प्रदर्शन स्पर्धा

### वैयक्तिकमध्ये दयानंदची वैष्णवी गुलमिरे प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

विज्ञान प्रदर्शन आणि सायन्स मेळाव्यात सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाने सांघिक प्रकारात तीनही क्रमांक पटकावित तिहेरी मुकुट संपादिला. वैयक्तिक प्रकारात दयानंद महाविद्यालयाच्या वैष्णवी गुलमिरे हिने प्रथम क्रमांक पटकाविला.

क्रीडा व युवक सेवा, संचालनालय पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन अंतर्गत एनबीएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात गुरुवारी (ता. ५ डिसेंबर) केले होते. या मेळाव्याचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांच्या हस्ते झाले. यावेळेस जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार, सिंहगड इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. आर. टी. व्यवहारे, प्रदर्शन समन्वयक प्रा. व्ही. एस शाखापुरे, परीक्षक डॉ. नागेश नकाते, डॉ. प्रशांत शिंपी, संजय जवंजाळ यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी केले. सूत्रसंचालन राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार यांनी मानले.



**स्पर्धेतील अंतिम निकाल (प्रथम तीन ): वैयक्तिक :** वैष्णवी गुलमिरे ( डी बी दयानंद कॉलेज, तीन हजार रुपये), श्रुती ठोकळ (एनबीएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय , दोन हजार रुपये), सय्यद शहनवाज (डी बी दयानंद कॉलेज) (१५०० रुपये )

**सांघिक (प्रकल्पाचे नाव, विद्यार्थी) :** कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून आभासी माउस) (आदित्य बनसोडे, रितेश साळुंके, ओंकार जगताप, सात हजार रुपये), तणनाशक, फवारणी यंत्र आणि खत स्प्रेडर यांच्या बॅटरीवर चालणाऱ्या संयोजनाचे अभिनव मॉडेल) (दिनेश कदम, विजय वाघमोडे, शुभम आगलवे, गणेश देशपांडे, पाच हजार रुपये), लोअर ट्रोपोस्फियर मापन आणि क्लाउड सीडिंगसाठी हवामान ड्रोनची रचना) ( निरंजन देशमाने, आकाश कुंभार, अभिषेक मगर, वैभव हजारे, तीन हजार रुपये )

या प्रदर्शनात विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १६ प्रकल्प सादर केले. यातील सांघिक प्रकारात निवड झालेले संघ विभागीय स्पर्धेत पाठवले जाणार आहेत.

निवडलेले प्रकल्प पुढे विभागीय स्तरावर पाठवण्यात येणार आहे. या विज्ञान मेळा प्रदर्शनात शेतीविषयक वनस्पती शिफारस आणि वनस्पती पानांचे रोग, तणनाशक, फवारणी यंत्र आणि खत यांच्या बॅटरीवर चालणाऱ्या संयोजनाचे नाविन्यपूर्ण मॉडेल, मार्केट यार्ड सोलापूरचे नियोजन व रचना, सोलापूर शहरासाठी भूजल तंत्राची रचना आणि मूल्यांकन, वाहन पार्किंग ऑटोमेशन सिस्टम, लोअर ट्रोपोस्फियर मापन आणि क्लाउड सीडिंगसाठी हवामान ड्रोनची रचना असे विविध क्षेत्रातील १६ प्रकल्प सादर केली.

या यशाबद्दल संस्था सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर टी व्यवहारे यांनी कौतुक केले आहे.

# नॅशनल कमिशन ऑफ योग नॅचरोपॅथी मेडिकल बिल लागू करा

### योग आणि निसर्गोपचार संघटनेच्या अधिवेशनात संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

नवी दिल्ली येथे ७ व्या निसर्गोपचार दिनानिमित्त सूर्या फाउंडेशन आणि आंतरराष्ट्रीय निसर्गोपचार संघटना यांनी भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या सहकार्याने राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन केले होते. नॅशनल कमिशन ऑफ योग नॅचरोपॅथी मेडिकल बिल २०२३ लागू करण्याची मागणी या अधिवेशनात करण्यात आली.

तालकटोरा इनडोअर स्टेडियमनवर या अधिवेशनाला देशभरातील ३ हजारांहून अधिक योग आणि निसर्गोपचार प्रतिनिधींनी हजेरी लावली. केंद्रीय कायदा व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दीपप्रज्वलन करून या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन केले. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा आणि आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आचार्य लोकेश मुनी, पंचमशाली पीठाचे जगतगुरु श्री श्री वचनानंद स्वामी उपस्थित होते.

या अधिवेशनाला उपस्थित होते. या निसर्गोपचार दिनानिमित्त निसर्गोपचारातील उत्कृष्ट सेवा आणि योगदानाबद्दल ७ जणांना गौरविण्यात आले.

कायदा मंत्री मेघवाल जी म्हणाले की, प्रलंबित असलेले राष्ट्रीय आयोग फॉर इंडियन मेडिसिन सिस्टीम विधेयक मंजूर करून घेण्याची ताकद कोणाकडे असेल, तर त्यांचे नाव नरेंद्र मोदी आहे, जे अशक्य गोष्टीला शक्य करून दाखवतात. नारी वंदन विधेयकाचे उदाहरण देताना ते म्हणाले की, हे विधेयकही प्रलंबित होते आणि ते प्रलंबित विधेयक संसदेत मंजूर करून नवा इतिहास घडवला गेला. प्रलंबित असलेले निसर्गोपचार योग विधेयक मंजूर करून घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले कारण आपले नामवंत पंतप्रधान निसर्गाच्या पाच घटकांसह नैसर्गिक जीवन जगतात. त्यामुळेच मोदी असतील तर ते शक्य आहे, असे म्हटले जाते. त्यामुळे, प्रत्येक परिस्थितीत तुमचे विधेयक मंजूर होणे शक्य आहे.



श्री जेपी नड्डा जी म्हणाले की सूर्या फाउंडेशन ने योग-निसर्गोपचाराच्या प्रचार आणि विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. भारत सरकार पारंपारिक वैद्यकीय प्रणालींच्या विकास आणि संशोधनाचे काम सातत्याने पुढे नेत आहे. अधिवेशनाला आलेल्या देशभरातील योग आणि निसर्गोपचार प्रतिनिधींचे त्यांनी स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

आयुष मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, महात्मा गांधी निरोगी राहण्यासाठी निसर्गोपचाराचा अवलंब करत असत. ७८ वर्षांपूर्वी याच दिवशी १९४६ मध्ये गांधीजींनी पुण्यात ऑल इंडिया नेचर क्युअर फाउंडेशन ट्रस्टची स्थापना केली. निसर्गोपचाराचे ज्ञान आणि फायदे प्रत्येक घरापर्यंत पोहोचवणे हा या ट्रस्टचा उद्देश होता. मला आज तुम्हाला सांगायला अतिशय आनंद होत आहे की आज पुण्यात त्याच ठिकाणी निसर्ग ग्राम नावाने २५० खाटांचे हॉस्पिटल बांधले गेले आहे, ज्याचे नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी सूर्या फाऊंडेशनचे अध्यक्ष पद्मश्री जयप्रकाश अग्रवाल यांनी निसर्गोपचारप्रेमींचे अभिनंदन करून निसर्गोपचार करणाऱ्या प्रत्येक डॉक्टरांनी आधी स्वतः ती अंगिकारली पाहिजे, तरच या पद्धतीच्या माध्यमातून रुग्णांना आरोग्याचा लाभ मिळू शकेल, असे सांगितले. ते म्हणाले की, प्रत्येक निसर्गोपचार डॉक्टरांनी आठवड्यातून एकदा वॉटर थेरपी, फास्टिंग थेरपी, मड थेरपी आणि फ्रूट डाएटचा सराव करावा.



# विशेष स्वच्छता मोहिमेंतर्गत ४ ठिकाणी रस्त्यावरचे अतिक्रमण हटविले

### महापालिका अतिक्रमण विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर -**

सोलापूर : विशेष स्वच्छता मोहिमे अंतर्गत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील ४ ठिकाणच्या रस्त्यावरील, फूटपाथ वरील अतिक्रमण हटविण्यात आले. दरम्यान, आज मोहिमेत सिव्हिल चौक येथे कारवाई करत असताना काही विक्रेत्यांनी विरोध केला. विरोध झुगारून अखेर महापालिकेने येथे कारवाई केली.

या मोहिमेत लोखंडी खोक्यांसह हात गाड्या व इतर साहित्य जप्त करण्यात आले. महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.

सोलापूर महापालिकेच्या वतीने दि. २ ते १३ डिसेंबर दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रस्ते, फुटपाथ तसेच दुभाजकाची नेटक्या पद्धतीने स्वच्छता करण्यात येत आहे. रस्त्यावरील तसेच फुटपाथवरील अतिक्रमणही काढण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आज

सकाळच्या सत्रात रंग भवन ते सिव्हिल चौक तसेच सिव्हिल चौक ते पोटफाडी चौक या रस्त्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत दोन लोखंडी खोके , चार हात गाड्या व इतर सामान जप्त करण्यात आले. दुपारच्या सत्रात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते रेल्वे स्टेशन तसेच रेल्वे स्टेशन ते सात रस्ता रस्त्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण हटविण्यात आले. यावेळी तीन लोखंडी खोके व एक लोखंडी काउंटर, गॅस टाकी, प्लास्टिक कॅरेट व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

#### सिव्हिल चौकात विक्रेत्यांचा विरोध

अतिक्रमण प्रतिबंधक पथकाकडून सिव्हिल चौकात कारवाई करतेवेळी त्यास येथील काही विक्रेत्यांनी विरोध दर्शवला. कोणतीही पूर्व सूचना न देता कारवाई चुकीची आहे. रोजी रोटीचा प्रश्न आहे. आमची आर्थिक अडचण निर्माण होणार आहे असे सांगत या कारवाईस विरोध दर्शवला. यावेळी शाब्दिक चकमक झाली. पोलिसांनी हस्तक्षेप केला. अखेर अतिक्रमण पथकाने कारवाई पूर्ण केली.

**SHRI.A.P.D.JAIN PATHASHALA**
Ashok Chowk, Solapur.413006
Ph. 0217-2655222 Email id - witstore.solapur@gmail.com

**E- TENDER NOTICE**

**e- Tender Notice for Kitchen furniture for our Hostel**

Dining Table, Hot Bainmarie, Work table, Hot Spoon warmer, Plate rack Trolley, wash shink, Work table with Speed Rail & etc.

The Details of work are mentioned in the tender document. Tender form are available on our site may be downloaded from www.sapdjpathashala.com. Right to accept or reject any or all tender without giving any Reason is reserved with the Trust authority.

Date: 06 /12 / 2024
Ref: SAPDJ/Central Store/

Hon. Secretary.
SHRI.A.P.D.JAIN PATHASHALA, SOLAPUR.
(Walchand Group of Education)

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी कि. अर्ज नं : २९/२०२४
निशानी नं. ४

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. साहेब यांचे कोर्टात**

**आशाबाई गोपीचंद सोनकांबळे वगैरे - अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही - सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अक्कलकोट येथील न्यायालयात दिवाणी कि.अर्ज. २९/२०२४ बॉम्बे रेग्युलेशन कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीताचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नं.१ व २ यांचा मयत मुलगा प्रमोद गोपीचंद सोनकांबळे हा दिनांक २२/०८/२०२४ रोजी चौधरी धाबा खराबवाडी, पो. चाखण ता. खेड, जि.पुणे येथे अपघातात मृत्यु झालेले आहे. मयत प्रमोद हा अविवाहीत असुन, अर्जदार नं.१ व २ हेच त्याचे कायदेशीर वारसदार असुन मयत प्रमोद गोपीचंद सोनकांबळे याचे नांवे एल.आय.सी. व दुचाकी वाहनावर इंन्सयुरन्स असल्याने मयताचे पश्चात सदर एल.आय.सी. व दुचाकी वाहनावर इंन्सयुरन्स असल्याने अर्जदारांच्या नांवे वारसाप्रमाण पत्र मिळणे करीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसात अथवा दिनांक १०/०१/२०२५ जोजी या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहुन आपली हरकत दाखल करावी. अन्याथा कोणाची हरकत नाही म्हणून अर्जदाराच्या मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंदी घ्यावी.

आज रोजी मे कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे व माझ्या सहीने हे प्रसिध्दीकरण केले.
तारीख : ०४/१२/२०२४

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
अक्कलकोट

**जाहीर प्रगटन**

दि.कि. अर्ज नं. २० /२०२४
निशानी नं. ६

**बार्शी येथील मे. सह. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर बार्शी यांचे न्यायालयात**

**आशा सुमंत मुंढे - अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही - सा.वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार आशा सुमंत मुंढे यांचा मुलगा नामे अतुल सुमंत मुंढे व सुन नामे तृप्ती अतुल मुंढे हे दिनांक २८/११/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. मयत अतुल सुमंत मुंढे व तृप्ती अतुल मुंढे यांचे पश्चात यातील अर्जदार आशा सुमंत मुंढे या जवळचे व कायदेशीर वारस आहेत. त्यांचेशिवाय मयतास कोणीही वारस नव्हते व नाहीत. सबब यातील अर्जदार ही मयत अतुल सुमंत मुंढे व तृप्ती अतुल मुंढे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून व जाहिर होऊन मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्जदार यांनी सदरील मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार आशा सुमंत मुंढे यांचेशिवाय मयत अतुल सुमंत मुंढे व तृप्ती अतुल मुंढे यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमलेली तारीख १०/१२/२०२४ रोजी ने. कोर्टात हजर राहून स्वतः अगर आपल्या विधिज्ञा मार्फत म्हणणे मांडावेत तसे मुदतीत करणेस कसुर केल्यास त्या अर्जाचा अनुषंगाने पुढील योग्य ते आदेश पारीत होतील याची नोंद घ्यावी. अथवा कोणाचीही काहीही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदार आशा सुमंत मुंढे हिस मयत अतुल सुमंत मुंढे व तृप्ती अतुल मुंढे हिचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, कळावे, हे जाहिरनामा दिला, तारीख ०३/१०/२०२४

सही/-
कनिष्ठ लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर,
बार्शी

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project

**E-TENDER NOTICE NO :2024_DOAWB_1121333**

**Supply, Installation, Commissioning and Testing of Fully Automatic Rice Mill 4 TPH**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Ambagad Farmer Producer Company Ltd.Ambagad, Tal. - Tumsar, Dist. - Bhandarais one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **25/12/2024 up to 12.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project, Dist. Bhandara**

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project

**E-TENDER NOTICE NO : 2024_DOAWB_1121441**

**Supply, Installation, Commissioning and Testing of Fully Automatic Rice Mill 4 TPH**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Vidharbha Baliraja Farmer Producer Company Ltd.Sakoli, Tal. - Sakoli, Dist. - Bhandarais one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders. gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **25/12/2024 up to 12.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project, Dist. Bhandara**

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project

**E-TENDER NOTICE NO : 2024_DOAWB_1121412**

**Supply, Installation, Commissioning and Testing of Fully Automatic Rice Mill 4 TPH**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Bhumisparsh Farmer Producer Company Ltd. Jamb, Tal. - Mohadi, Dist. - Bhandara is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **25/12/2024 up to 12 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project, Dist. Bhandara**

**दि लक्ष्मी को-ऑप.बँक लि., सोलापूर (अवसायनात)**

मुख्य कार्यालय - ३१९ दक्षिण कसबा सोलापूर नमुना झेड (नियम १०७ पोट नियम ११ ड (१)
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

**जावक नंबर** **दिनांक : २९/११/२०२४**

ज्याअर्थी वसुली अधिकारी सोलापूर द्वारा दि लक्ष्मी को ऑप बँक लि. सोलापूर अवसायनात मुख्य कार्यालय ३१९, दक्षिण कसबा सोलापूर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये खालील नमूद केलेल्या ऋणकोस नमूद दिनांकास नमूद केलेल्या रकमेची मागणी नोटीस व जप्ती नोटीस पाठवली आहे सदर कर्जदार व जामीनदार याचे खालील निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा वसुली अधिकारी सोलापूर द्वारा दि लक्ष्मी को ऑप बँक लि, सोलापूर अवसायनात ३१९, दक्षिण कसबा सोलापूर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम पोट नियम ११ ड (१) अन्वये दिलेल्या आधिकारानुसार नमूद केलेल्या दिनाकाम ताबा घेतला आहे. ऋणको व सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे कि खालील नमूद केलेल्या मालमतेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि केल्यास दि लक्ष्मी को ऑप बँक लि, सोलापूर अवसायनात मुख्य कार्यालय ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर यांचे सर्व प्रकारच्या देणी देण्यास आधीन राहावे लागेल.

| | |
|---|---|
| धकीत कर्जदार व जामीनदार नाव व पत्ता | **कर्जदार १. स्नेहल गोपाल बार्शीकर** राहणार - ४१३/अ१/ब२, लिमयेवाडी, आदिशक्ती मंदिर जवळ मोलापूर **जामीनदार १. गोपाळ नारायण बार्शीकर** राहणार - ४१३/अ१/ब२, लिमयेवाडी, आदिशक्ती मंदिर जवळ सोलापूर **जामीनदार २. विष्णु नंदकुमार सिंघम** राहणार - माने वस्ती कुमठा नाका. सोलापूर |
| मागणी नोटीस दिनांक | १६/०७/२०२२ |
| जप्ती नोटीस दिनांक | ११/११/२०२४ |
| स्थावर ताबा घेतल्याचा दिनांक | २९/११/२०२४ (प्रतिकात्मक ताबा) |
| येणेबाकी दिनांक २८/११/२०२४ व त्यापुढील व्याज व इतर खर्च | ३,०४,९६०/- |
| स्थावर मिळकतीचा तपशील | जिल्हा व उपजिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर, सोलापूर महानगरपालिका हद्दीतील कसबे सोलापूर येथील सि.स.नं.४१६/अ१/ब२/ प्लॉट नं १४२/२ यासी क्षेत्रफळ ४६.००.०० चौ.मी. **(मिळकतदार - गोपाळ नारायण बार्शीकर)** |
| मिळकतीच्या चतु:सीमा | **१.** पूर्वेस- प्लॉट नं , **२.** दक्षिणेस - पठाण यांची मिळकत **३.** पश्चिमेस - रस्ता, **४.** उत्तरेस- गायकवाड यांची मिळकत |

वरील सर्व कर्जदारांना त्यांच्या जप्त केलेल्या स्थावर मालमत्ता ताबा घेणेसाठी नोटिसा बजावलेल्या होत्या व सदर नोटीसीमध्ये असे नमूद केलेले होते कि ज्याच्या मालकीच्या स्थावर मालमत्ता आहेत व ज्या मालमत्ताच्या उतान्यावर बँकेच्या बोजाची नोंद आहे अशा सर्व धकबाकीदार कर्जदारानी सदर मालमनेचा ताबा बँकेचे वसुली अधिकारी याना लेखी स्वरूपात द्यावा, अशी लेखी नोटीस सर्व कर्जदारांना बजावलेली होती परंतु बऱ्याच कर्जदारांनी ताबा पत्रकावर सह्या करून देण्याचे नाकारलेले आहे. सबब सर्व संबधीताना कळविण्यात येते कि त्यांना त्याच्या स्थावर मिळकतीचा कागदोपत्री ताबा, ताबापत्रावर सही करून (दोन प्रतीत) दि लक्ष्मी को ऑप बँक लि, सोलापूर अवसायनात येथे बँकेत दि. १०.१२.२०२४ च्या रोजीच्या आत योग्य ती पोहच घेऊन सादर करावा जो कर्जदार ताबा पत्रावर सही करून देणार नाहीत अशा मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सोलापूर याचे कार्यालयास सादर केला जाईल व नियमातील तरतुदीनुसार मा. जिल्हाधिकारी सोलापूर याचे मार्फत सदर मालमतेचा ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया पार पाडली जाईल त्यानंतर सदर मालमत्तेचे मूल्याकन करून जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल, होणाऱ्या सर्व परिणामास संबधित कर्जदार व त्याचे जमीनदार व्यक्तिशः जबाबदार राहतील यांची संबंधितानी नोंद घ्यावी. उक्त निर्दिष्ट स्थावर मालमत्तेची प्रतीकात्मक ताबा नोटीस माझे सही व कार्यालयिन मुद्रेसह दिली असे.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : २९/११/२०२४**

**सही/- विशेष वसुली अधिकारी**
महाराष्ट्र सहा. संस्था अधिनियम १९६० व
नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये
द्वारा दि.लक्ष्मी को-ऑप बँक लि., सोलापूर (अवसायनात)

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३२६/२०२४

**जाहीर नोटीस मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. पांडुरंग चांगदेव सावंत - अर्जदार**
रा. दुर्गा नगर पुणे
(असल्यास, तर्फे वकील एस.एम. भोसले)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
**तथा ग्रामसेवक, ग्रा. पं. कोरफळे - गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. दुर्गा नगर, पुणे यांचा बोरगाव (खुर्द) या ठिकाणी दिनांक : ०२ जुन १९७७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ जुन १९७७ बोरगाव (खुर्द) याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत में. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी,
बार्शी

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३२७/२०२४

**मे. कार्यकारी दंहाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. सविता सौदागर चौपडे - अर्जदार**
रा. अंबेजवळगे ता. धाराशिव, जि धाराशिव
(असल्यास तर्फे वकील एस.एम. भोसले)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी - गैरअर्जदार**
**तथा ग्रामसेवक ग्रा. पं. चिखर्डे**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची आज्जी अनुसया एकनाथ कोंढारे, रा. अंबेजवळगे ता. धाराशिव, जि. धाराशिव यांचा मौजे चिखर्डे, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०५ जुलै २०१७ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९०९ (सुधारीत २०२३) कलम १३(३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दास केलेला आहे. तरी अर्जदाराची जाज्जी अनुसया एकनाथ कोंढारे यांचा दिनांक ०५ जुलै २०१७ रोजी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत में. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी,
बार्शी

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३२८/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. सावित्रा चांगदेव सावंत - अर्जदार**
रा. दुर्गा नगर पुणे
(असल्यास, तर्फे वकील एस.एम. भोसले)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी - गैरअर्जदार**
**तथा ग्रामसेवक, ग्रा. पं. कोरफळे**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. दुर्गा नगर, पुणे यांचा मौजे कोरफळे, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०१ जुन १९६५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९६५ रोजी मौजे कोरफळे, ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत में. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी,
बार्शी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# भारत-ऑस्ट्रेलिया गुलाबी चेंडूसह कसोटी आजपासून

**भारत-ऑस्ट्रेलिया दुसरा कसोटी सामना**
**स्थळ :** ओव्हल मैदान, ॲडिलेड
**वेळ :** सकाळी ९.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

## रोहितच्या फलंदाजीच्या क्रमावर लक्ष

**ॲडिलेड, ५ डिसेंबर**

बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिकेत शुक्रवारपासून ओव्हल मैदानावर भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान दिवस-रात्र काळात गुलाबी चेंडूनिशी दुसरा कसोटी क्रिकेट सामना खेळला जाणार आहे.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ गुलाबी चेंडूच्या कसोटीत स्वतःला सिद्ध करण्यास प्रयत्नशील असेल, तिकडे दुखापतीच्या समस्येने त्रस्त यजमान ऑस्ट्रेलिया संघ घरच्या मैदानाचा फायदा घेण्यासाठी योग्य संयोजनाच्या शोधात आहे.

पर्थ कसोटीत यशस्वी जयस्वाल व केएल राहुल या सलामीच्या जोडीच्या यशस्वी खेळीमुळे भारताने पहिला विजय नोंदवून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. एकंदरीतच भारतीय संघ बळकट दिसत आहे, परंतु फलंदाजीचा क्रम लावताना संघ व्यवस्थापनाची डोकेदुखी वाढणार आहे. रोहितला संघाचे नेतृत्व करताना एक पाऊल मागे घ्यावे लागू शकते, कारण फलंदाजीची क्रमवारी ही भारतीय संघाची सर्वात मोठी अडचण आहे. पितृत्वाच्या सुटीनंतर संघात परतलेल्या रोहितला सामावून घेण्यासाठी तसेच शुभमन गिल पुन्हा तंदुरुस्त झाल्यामुळे संघात थोडा बदल करावा लागणार आहे.

ऑस्ट्रेलियाच्या गत दौऱ्यात ॲडिलेड ओव्हलमध्ये भारतीय संघाला ३६ धावांत गुंडाळले होते, परंतु ऑप्टस स्टेडियमवर नोंदवलेल्या पहिल्या विजयामुळे भारतीय संघाचा आत्मविश्वास बळावलेला असेल. तथापि, प्रकाशझोतात गुलाबी चेंडूसह भारतीय संघाला सर्वोत्तम प्रयत्न करावे लागतील.

ऑस्ट्रेलिया संघाने घरच्या मैदानावर १२ दिवस-रात्र कसोटी सामन्यांपैकी केवळ एकच सामना गमावला आहे, त्यामुळे ऑस्ट्रेलिया संघाचे पर्थमधील पराभवातून सावरत मालिकेत पुनरागमन करण्याचे लक्ष्य असेल.

फॉर्मात असलेल्या जयस्वाल व केएल राहुल ही सलामी जोडी कायम ठेवल्यास रोहित स्वतःला क्रमवारीत खाली उतरवू शकतो. रोहित संघाचे सर्वोत्तम हित लक्षात घेऊन योग्य निर्णय घेईल हे निश्चित आहे. रोहितसुद्धा न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या मालिकेतील पराभवानंतर धावा काढण्यास उत्सुक आहे.

देवदत्त पडिक्कल व ध्रुव जुरेल यांच्या जागी रोहित व शुभमन गिलला अंतिम एकादशमध्ये स्थान मिळू शकते. अंगठ्याच्या दुखापतीतून सावरल्यानंतर गिल सराव सामन्यात चांगला दिसत होता. ऑस्ट्रेलियातील आपल्या भूतकाळातील कामगिरीचा आत्मविश्वास शुभमन गिलला बळ देईल. पर्थमधील फलंदाजी ही भारतीय संघाची सर्वात मोठी सकारात्मकता आहे. यात विराट कोहलीला सूर गवसला. ऑस्ट्रेलियातील पदार्पणाच्या कसोटीत जयस्वालने शतक साजरे केले व केएल राहुलनेही दमदार फटकेबाजी केली. गोलंदाजी विभागात बदल अपेक्षित नसले तरी पारंपरेनुसार ओव्हल, ॲडिलेडची खेळपट्टी फिरकीपटूंसाठी नेहमीच अनुकूल राहिली आहे, ज्यामुळे आर. अश्विन व रवींद्र जडेजा चर्चेत आले आहे. दुसरीकडे, ऑस्ट्रेलियाला मालिकेत बरोबरी साधण्याचे उद्दिष्ट असल्यामुळे त्यांना काळजी करण्याची गरज आहे, परंतु त्यांचा सर्वोत्तम गोलंदाज जोश हेझलवूड दुखापतीमुळे या सामन्यातून बाहेर पडला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### खेळाडूंना रेल्वे प्रवास सवलत सुरू करा : खासदार प्रणिती शिंदे



**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

राज्य, राष्ट्रीय व आंतरराराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना रेल्वेच्या प्रवासात ७५ टक्के सवलत सुरू होती. कोरोनामुळे ही सवलत बंद झाली होती. ती पुन्हा सुरू करावी, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी लोकसभेत बुधवारी प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केली आहे.

यासंदर्भात बेसबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष सीए विनोद भोसले, सोलापूर शहर क्रीडाशिक्षक संघटनेचे शहराध्यक्ष प्रा. संतोष खेंडे सचिव सुहास छचूरे यांनी खासदार शिंदे यांना निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्यानुसार त्यांनी हा प्रश्न उपस्थित केल्यामुळे खेळाडूंमध्ये आशादायक वातावरण निर्माण झाले आहे.



### राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत वालचंदच्या हर्षदा गोली हीस कांस्य पदक

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाच्या हर्षदा गोली हिने स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया, केंद्रीय क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत राजकोट, गुजरात येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय जलतरण स्पर्धेतील डायव्हिंग प्रकारात कांस्य पदक प्राप्त झाले. हर्षदाने १७ वर्षे वयोगटात हायबोर्ड डायव्हिंग प्रकारात ही कामगिरी केली. तिला क्रीडाशिक्षक राहुल हजारे व प्रशिक्षक मनीष भावसार यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, डॉ. के. आर. राव, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांनी अभिनंदन केले.



### श्री स्वामीनारायण गुरुकुल स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

कुंभारी येथील श्री स्वामिनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन क्रीडा शिक्षक डॉ.शैलेश बंडे यांच्या हस्ते झाले. त्यांनी मानवी जीवनातील खेळाचे महत्व पटवून दिले. भविष्यात भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक संतोषकुमार अन्नम यांनीही विद्यार्थ्यांना विविध खेळांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी क्रीडा प्रशिक्षक दत्तात्रय बडगू, मनोज बाळगे, दिनेश सारंगी आदी उपस्थित होते. या सप्ताहात क्रिकेट, डॉजबॉल, फुटबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, बुद्धिबळ आदी खेळांचा समावेश होता. या कार्यक्रमात संस्थेचे आचार्य विश्वमंगलदास स्वामीजी, श्री ब्रह्मस्वरूपदास स्वामीजी यांचे आशीर्वाद लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल बनसोडे यांनी केले. क्रीडा शिक्षक राजेश येमूल यांनी आभार मानले.



### स्वामी विवेकानंद प्रशालेत शालेय क्रीडा सप्ताह सुरू

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

नॅब संचलित स्वामी विवेकानंद प्रशाला एमआयडीसी सोलापूर येथे जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधून क्रीडा सप्ताहास सुरवात झाली. या सप्ताहाचे उद्घाटन वसुंधरा कला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अशोक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका तथा नॅब सेक्रेटरी सीमा यलगुलवार उपस्थित होत्या. प्रारंभी प्रशालेचे क्रीडाशिक्षक सुभाष माने यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख अतिथींच्या हस्ते हेलन केलर व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. खेळाडूंनी मशाल व ध्वज संचालनद्वारे प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. या क्रीडा सप्ताहात कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, तसेच थलेटिक्स आदी विविध स्पर्धा प्रशालेत घेण्यात येणार आहेत. याप्रसंगी प्रशालेतील सहशिक्षक सपताळे, कोळी, हिंगमिरे, राठोड उपस्थित होते. सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक खंडू शिंदे यांनी केले तर आभार गणपती कोळी यांनी मानले.

## छत्रपती शिवाजी प्रशालेची सॉफ्टटेनिस व योगासन स्पर्धेत कामगिरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

पुणे येथे झालेल्या शालेय पुणे विभागीय सॉफ्टटेनिस स्पर्धेत छत्रपती शिवाजी प्रशालेतील विपश्यना सोनवणे हिने १४ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक पटकाविला. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात जॅक भंडारे याने द्वितीय व योसेफ नाईक याने तृतीय क्रमांक मिळविला. या सर्व खेळाडूंची दिनांक ६ डिसेंबर ते ९ डिसेंबर बारामती येथे होणाऱ्या राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली.

लातूर येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत अमृता गुंफेकर हिने तृतीय क्रमांक मिळविला. या खेळाडूंचा सत्कार मुख्याध्यापिका सुजाता जुगदार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तानाजी माने, पर्यवेक्षक श्रीपादराव जगदाळे, संतोष गवळी, सचिन गायकवाड, पालक प्रसाद सोनवणे व लक्ष्मी सोनवणे आदी उपस्थित होते. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे, शालेय समिती चेअरमन शिवदास चटके, जनरल सेक्रेटरी महेश माने, उपमुख्याध्यापिका जयश्री साठे यांनी अभिनंदन केले.



## सेवासदन प्रशालेची विविध क्रीडा स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी सेवासदन प्रशालेच्या केतकी चौगुले हिची निवड झाली. डॉजबॉल स्पर्धेत देवयानी यादव, गिरीजा भोसले, प्रतिभा गुंड, सिध्दी गायकवाड, राजकन्या चव्हाण यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत काव्या जगताप हिने ब्राँझपदक प्राप्त झाले. वैदेही नवले हिने फाईट प्रकारात सुवर्ण पटकाविले. पंढरपूर येथील गतका खेळाच्या शिबीरासाठी नेहा जगताप, श्रावणी मोरे, गिरीजा भोसले, श्रेया पाटील, अक्षरा जाधव, ज्ञानेश्वरी मोरे, किर्ती शिंदे व प्रिया काशीद यांची निवड झाली आहे. किकबॉक्सिंग स्पर्धेत सृष्टी मोटे हिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

सर्व खेळाडूंना क्रीडा विभागा प्रमुख ज्ञानेश्वर काळे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी सर्व खेळाडूंचे सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिवा वीणा पतकी, शालेय समिती अध्यक्ष उमेश मराठे, संचालक डॉ. राजीव प्रधान मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षक स्वाती पोतदार, शिक्षक प्रतिनिधी सतीश घंटेनवरू आदींनी अभिननंदन केले.

### श्री समर्थ स्पोर्टस् नर्सरीच्या निर्जला तवार हीस राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत कांस्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**



येथील श्री समर्थ स्पोर्टस् नर्सरीची निर्जला कमलाकर तवार हिने राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत मुलींच्या फॉईल सांघिक प्रकारात कांस्य पदक मिळविले. ३२व्या ज्युनियर राष्ट्रीय तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धा पटना (बिहार) येथे सुरु आहेत. तिला एनआयएस प्रशिक्षक अक्षय माने, आकाश लाटणे व सोनाली मुंगापाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे मार्गदर्शक अशोक दुधारे, महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे सचिव डॉ. उदय डोंगरे, उपाध्यक्ष प्रकाश काटुळे, क्रीडा संघटक राजेंद्र माने, जिल्हा सचिव दिपक शिंदे यांनी अभिनंदन केले.



## स.हि.ने प्रशालेत क्रीडा महोत्सव सुरु

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

दत्त चौक गणपती घाट येथील श्री सरस्वती मंदिर संस्था संचालित सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेत क्रीडा महोत्सवास सुरवात झाली.

याचे उद्घाटन माजी राष्ट्रीय हॉकी खेळाडू राजेंद्र गोटे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिवा प्रीती चिलजवार होत्या. त्या म्हणाल्या ''शालेय जीवनामध्ये प्रत्येक खेळात सहभाग झालेच पाहिजे. खेळात सहभागी झाल्याने शरीर तंदुरुस्त राहते. शालेय जीवनातील खेळ आपल्या सदैव आठवणीत राहतात. खेळ हा आनंद घेण्यासाठी असतो.

यावेळी मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, पर्यवेक्षक मुकुंद गिरी, क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी उपस्थित होते. या महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी कबड्डी, थ्रोबॉल, डॉजबॉल, शंभर मीटर धावणे, रिंग टेनिस या खेळांच्या स्पर्धा होणार आहेत. पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी प्रास्ताविक केले. सहशिक्षिका विद्या माने यांनी सूत्रसंचालन केले. रोहिणी कुलकर्णी यांनी आभार मानले.

**योग्य आहारामुळे क्रीडा कामगिरी सुधारण्यास मदत**

राजेंद्र गोटे म्हणाले ''कोणत्याही एक खेळाची निवड करावी. या खेळामध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रावीण्य मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत. वैयक्तिक क्रीडा प्रकार निवडणे क्रीडा नैपुण्य प्राप्तीसाठी उपयुक्त ठरू शकते. दररोज सराव केल्याने अपेक्षित यश प्राप्त होऊ शकते. त्यासाठी रोज सकाळी साडेपाच वाजता उठून व्यायाम व क्रीडासराव केला पाहिजे. सरावा इतकाच पोषक आहार हितकारक ठरतो. योग्य आहारामुळे क्रीडा कामगिरी सुधारण्यास मदत होते.

## चित्तथरारक कवायतीच्या सादरीकरणाने उमाबाई श्राविका विद्यालयात क्रीडा सप्ताह सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**



येथील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन चित्तथरारक कवायतीच्या सादरीकरणाने प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

पीएसव्ही ट्रस्टच्या वरिष्ठ दीप्ती शहा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड, प्राचार्य सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत सहशिक्षिका सोनाली उंडे व पल्लवी खांडवे यांनी गायलेल्या गीताद्वारे करण्यात आले. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी झेंडा कवायत, डंबेल्स, रिंग, घुंगरू काठी, झांज व लेझीम कवायतींचे चित्तथरारक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकून घेतली. कार्तिक भागवत याने यावेळी डोळ्यांचे पारणे फेडणारे योगासनाचे प्रात्यक्षिक सादर केले. राज्य खेळाडू अनुष्का केतन हिने विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ दिली. यावेळी राष्ट्रीय व राज्य पातळीवरील विविध खेळात पदक विजेत्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

**निरोगी जीवनासाठी खेळ आवश्यकः गायकवाड**

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कवायतींचे कौतुक करून प्रमुख पाहुणे प्रा.सचिन गायकवाड म्हणाले, निरोगी जीवनासाठी जीवनात खेळ आवश्यक आहे. तसेच खेळामुळे शारीरिक मानसिक बौद्धिक याचा विकास होतो.

प्राचार्य सुकुमार मोहोळे यांनी प्रास्ताविक केले. क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांनी वार्षिक क्रीडा अहवाल वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी खांडवे यांनी केले तर वऱ्हाडे यांनी आभार मानले. प्रमुख पाहुण्यांची ओळख वैभव बारडकर यांनी करून दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे, सुकुमार वारे, अभिनंदन उपाध्ये, अभिजीत पाटील, प्रविण कंदले, अनुप कस्तुरे, राजकुमार देवकते, अनंत बळ्ळे, प्रा.कल्याणप्पा हायगोंडे, विश्वजीत मोहोळे आदींनी परिश्रम घेतले.

### राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी अथर्व गुरुजी याची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**



पंढरपूर येथे उमा महाविद्यालयात झालेल्या अंतर महाविद्यालयीन योगासन स्पर्धेमध्ये अथर्व गुरुजी यांनी ट्रॅडिशनल योगासन प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त केला. या कामगिरीवर त्याची २४ ते २७ डिसेंबर ओडिसा युनिव्हर्सिटी येथे राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली. तो स्नेहसाधना योगा क्लासेस मध्ये सराव करत आहे. त्याचे प्रशिक्षक रोहन घाडगे व सारिका घाडगे हे त्याला मार्गदर्शन लाभले. त्याचे राष्ट्रीय योगासन पंच स्नेहल पेंडसे व साधना काकडे यांनी शुभेच्छा दिल्या.

## वरद लिमकर, स्वराली हातवळणे, श्रेयस कुदळे, सानवी गोरे अजिंक्य

### श्रीमती नीता तांबोळकर चषक बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**



श्रीमती नीता तांबोळकर चषक बुद्धिबळ स्पर्धेत ३० वर्षांखालील गटात वरद लिमकरने पाच पैकी पाच डावात वर्चस्व राखत तर स्वराली हातवळणे हिने पाच पैकी साडेचार गुण मिळवत सतरा वर्षांखालील गटात अजिंक्यपद पटकाविले. दहा आणि तेरा या दोन्ही वयोगटात श्रेयस कुदळे याने चमकदार कामगिरी करीत शेवटपर्यंत अजिंक्य राहत दुहेरी मकुटाचा मान मिळविला.

सुंदर मल्टीपर्पज हॉल सोलापूर येथे झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ भाजपा शहर सरचिटणीस विशाल गायकवाड यांच्या हस्ते झाला. यावेळी माजी परिवहन सभापती दैदिप्य वडापुरकर, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा सहायक संचालक डॉ.आनंदा कुदळे, सुशीलकुमारजी शिंदे प्रशालेचे अध्यक्ष संतोष पैकेकरी, माजी जिल्हा बालकल्याण समिती सदस्य सुवर्णा बुंदाले व सोलापूर डिस्ट्रिक्टचे असोसिएशनचे सचिव शरद नाईक यांचे हस्ते संपन्न झाला यावेळी स्पर्धेचे पंच इरन्ना जमादार व सचिन चव्हाण हे उपस्थित होते.

**अंतिम गुणानुक्रमे खेळाडू : ३० वर्षाखालील :** वरद लिमकर, सागर पवार, श्रेया संदूपटला, स्वप्निल हदगल, जल्लीपल्ली पवन, कोरे प्रज्वल, ईश्वरी गानबोट, तेजस दौंड, नविना वडशेरला.

**१७ वर्षांखालील :** स्वराली हातवळणे, अथर्व रेड्डी, तन्मय कदम, प्रथमेश शिंदे, सानिध्य जमादार, स्वानंद तापकिरे, हर्ष देशपांडे, रणवीर पवार, अथी चाबुकस्वार, समर्थ कुलकर्णी, मानस मुसळे, श्रीपाद पाटील, श्रावणी देवनपल्ली, अरुष वाल्मिकी, हॉकीप जॉथनलेन, साक्षी पाटील, विराज पताडे.

**१३ वर्षांखालील :** सानवी गोरे, मुसळे वेदांत, राठोड विहान, हलमल्ली हर्ष, जांभळे प्रसेंनजित, कोगनाळे विघ्नेश, साळुंखे रजत, उंबरे सार्थक, स्वामी विनायक, देशमुख सिद्धी, भिंगारे आदित्य, निरंजन ओम, वाल्मिकी अनुज, उलभगत अनन्या, राठोड अंश, अंबरकर शिवम, श्रीयांश गाजुल.

**११ वर्षाखालील :** श्रवण शेंडगे, जय तुम्मा, यशोदा बिराजदार, रणवीर पवार.

**१० वर्षाखालील :** श्रेयस कुदळे, पटवर्धन देवदत्त, विहान कोंगारी, मुसळे सृष्टी, पांडेकर वेदांत, चौधरी श्लोक, इंगळे श्रेयस, कवडे निशांत, कसबे आदित्य, अरकाल विहान, जानगवळी आयुष्, उत्कर्षा लोखंडे, दासरी विवान, होटकर नैतिक, आयुष गायकवाड, सिद्धांत गरदास, श्रेयस कंदीकटला. ९ वर्षाखालील : प्रथमेश पवार, प्रतीक हलमल्ली, शशांक जमादार, मनस्वी क्षीरसागर. ८ वर्षाखालील : पृथा ठोंबरे, प्रथम मुदगी, हिमांशु वनगावडे, सुमित गंगापुरे. ७ वर्षाखालील गट : मुली : वेदिका डोंगरे, आरव पाटील. ईशा पटवर्धन मुले : रत्नेश घाणेगावकर, प्रज्ञेश काबरा, अशाच कमलीवाले, स्वरा निरंजन.

**उत्तेजनार्थ बक्षिसे :** चेस इन स्कूल : फैज मोमीन, हॉकीप जिन्हाजो, होरन सिमका, होरान थेमजन. मुली : पलक मेसे, प्रज्ञा मलजी, यशोदा बिराजदार, श्वेता पवार. करमाळा : सार्थक ठेंगडे, ऋषिकेश खरात, अंश राठोड. धाराशिव : अर्णव शिंदे, सार्थक डोंगरे, लातुर : अपूर्वा रेड्डी.



## ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयास दुहेरी मुकुट

**सोलापूर विभागीय टेबल टेनिस स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत सोलापूर विभागीय टेबल टेनिस स्पर्धेत ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने पुरुष व महिला गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

लोकमंगल फार्मसी कॉलेज वडाळा येथे झालेल्या या स्पर्धेतून दोन्ही संघाची आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. संघास शारीरिक शिक्षण संचालक शिवशरण एस. कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव शिवानंद पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, सर्व विभाग प्रमुख, स्पोर्ट्स कॉर्डिनेटर यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**कामगिरी केलेले संघ : पुरुष :** चंद्रकांत हन्नूरे, ओंकार पवार, अजिंक्य कांबळे. **महिला :** पूर्वा लिगाडे, साक्षी पाटील, सरस्वती माळी.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात सेव्ह एनर्जीवर मार्गदर्शन

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

केगाव येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात सेव्ह एनर्जीनवर एनर्जी ऑडिटर ऊर्जा मित्र अमित कामितकर यांनी भारतातील ऊर्जेच्या स्रोत त्याची कमतरता व त्यासाठी घेण्याची दक्षता या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी महाऊर्जा सोलापूर विभाग जिल्हा व्यवस्थापक प्रसन्न चित्रे, प्रजापिता ब्रह्माकुमारीचे बी. के. सोमप्रभा दीदी, बी.के. भारत, बी. के. प्रसाद, महाविद्यालयाचे प्राचार्य, अकॅडमिक डीन प्रोफेसर पिरमपल्ली, इएनटीसी एचओडी प्रोफेसर भोसले, मेकॅनिकल एचओडी प्रोफेसर धनवले, तसेच जनरल सायन्स एचओडी स्नेहल शिंदे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रोफेसर नेहा इनामदार यांनी केले.



### आयडल्स बहुउद्देशीय संस्थेच्या शिबिरात १८८ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयडल्स बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित शिबिरात १८८ जणांनी रक्तदान केले. संस्थेचे संस्थापक कुणाल बाबरे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिराचे उद्घाटन जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीप सिंह राजपूत, डॉ.किरण देशमुख, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष अमित आळंगे, सी.ए धीरज जवळकर, ॲड. संजीव सदाफुले, युवराज पवार, शितल शिवशरण संस्थेचे अध्यक्ष सुमित शिवशरण यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बुद्धवंदना घेण्यात आली. यावेळी सुहास सुरवसे, भारत बाबरे, ॲड. राजकुमार बाबरे, सुशांत तुळशे, मंगेश कांबळे, अतुल सोनवणे, ॲड. राजकुमार नरोटे, मंगेश काळे, आनंद बनसोडे, आकाश शिवशरण, सुमित बाबरे, मंथन उघडे, कपिल बाबरे, श्रीशैल हिरेमठ, सिद्धार्थ बाबरे, शेषपाल माने, अनिल शिवशरण उपस्थित होते.

### अनाथ मुलांना मदत करून सिंहगड इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्याचा वाढदिवस साजरा

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**



केंगाव येथील एनबीएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील एका विद्यार्थ्याने अनाथ मुलांना जीवनावश्यक साहित्य देऊन सामाजिक दायित्वाची भावना कृतीतून दाखवून दिली आहे.इलेक्ट्रिकल विभागातील शेवटच्या वर्षातील विद्यार्थी अभिषेक राजकुमार मगर (सावरगाव, तुळजापूर) याने आपल्या वाढदिवसानिमित्त इतर वायफट खर्चास फाटा देत शेजारी असलेल्या अनाथ मुलांच्या संस्थेला भेट देऊन दैनंदिन वापरातील वस्तू व धान्य देऊन आणि त्यांच्या सोबत वेळ घालवून आपला २२ वा वाढदिवस साजरा केला आहे. अभिषेक हा शेतकरी कुटुंबातला आहे. आई-वडील, भाऊ शेती करतात. शेतीजमीनीशी नाळ जोडली असल्यानेच अभिषेकने कपडेसह इतर वायफळ खर्चाला फाटा देत जमा झालेले तीन हजार रुपयांत साहित्य खरेदी करून मदत केल्याचे सांगितले.

### पशुसंवर्धन विभागांतर्गत योजनांसाठी लाभार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर दि. ५ डिसेंबर-**

पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्यामार्फत जिल्हा वार्षिक योजनेमधून वैयक्तीक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात, यासाठी पात्र लाभार्थीना २० डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करावेत असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन. एल. नरळे यांनी केले आहे. या योजनांसाठी पात्र लाभार्थीकडून अर्ज मागविण्यात येत असून सदरचे अर्ज पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती व सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक पात्र लाभार्थीनी वरील योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे अध्यक्ष, तथा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन. एल. नरळे यांनी केले आहे.

### आंबेडकर नगरात ४० वर्षीय इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर दि. ५ डिसेंबर-**

अज्ञात कारणावरून ४० वर्षीय व्यक्तीने राहत्या घरातील फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. ही घटना गुरुवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास आंबेडकर नगर, तालुका पोलिस ठाण्याच्या मागील बाजूस असलेल्या वसाहतीमध्ये घडल्याचे उघडकीस आली आहे. मयूर चंद्रकांत गायगवळी (वय ४०, रा. आंबेडकर नगर) असे गळफास घेवून आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. मयूर यांनी गुरुवारी सकाळी साडे नऊच्या सुमारास राहत्या घराच्या छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्म हत्या केली. ही घटना नातेवाईक यांना कळाल्यानंतर त्यांनी ही माहिती सदर बझार पोलिसांना दिली. त्यास गळ फासावरून खाली उतरवले. त्यास बे शुध्द अवस्थेत पोलिस हवालदार एस.एम मोरे यांनी यादीसह सिव्हिल रुग्णालयात दाखल केले, तो उपचारापूर्वीच मयत झाला होता. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# घरात मैत्रिपूर्ण संबंध ठेवा, गुन्हेगारी थांबेल

## न्या. जी. एस. पाटील : बार्शीतील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयामध्ये विधी साक्षरता शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ डिसेंबर-**

अलीकडच्या काळामध्ये समाजामध्ये १८ वर्षाखालील मुले आणि मुली यांच्याबाबतीत वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे घडण्याचे प्रमाण वाढत चाललेले आहे. त्यामुळे समाजाला निश्चितपणे कायद्याचा धाक असणं गरजेचं आहे. यामध्ये ही बालकेही काही प्रमाणामध्ये गुन्हेगार म्हणून सापडत आहेत. यासाठी सध्याच्या काळामध्ये घरामध्ये सुसंवाद कमी होत आहे. तो सुसंवाद अधिक वाढणे गरजेचे आहे. जेणेकरुन पुढच्या पिढीला सुरक्षित भविष्य सहजपणे घरापासूनच मिळू शकेल. त्याचबरोबर बालकांनी आपल्या आई-वडिलांशी तसेच सहकाऱ्यांशी व मार्गदर्शकाशी सतत सुसंवाद साधला पाहिजे. घरामधील कौटुंबिक वातावरण हे मैत्रीपूर्ण ठेवण्याची ही सर्वांची जबाबदारी आहे. यामुळे समाजामध्ये



बालकांच्या बाबतीत घडणाऱ्या गुन्ह्यांचं प्रमाण निश्चितपणे कमी होऊ शकते, असा आशावाद मत तिसरे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर जी. एस. पाटील यांनी व्यक्त केला.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी, संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी, येथे आज तालुका विधी सेवा समिती बार्शी यांच्या वतीने (कॉमन मिनिमम प्रोग्राम माहे डिसेंबर २०२४) कायदेविषयक साक्षरता शिबीर घेण्यात आले, यावेळी त्या बोलत होत्या. प्रास्ताविक वकील संघ बार्शीचे अध्यक्ष ॲड. काकासाहेब गुंड यांनी केले.

याप्रसंगी ॲड. डी. पी. घोगरे यांनी मुलांसाठी बालस्नेही कायदेशीर सेवा आणि त्यांचे संरक्षण, ॲड. कुलकर्णी यांनी पीडित महिला आणि लैंगिक अत्याचाराच्या इतर गुन्ह्यातून वाचलेल्यांसाठी भरपाई योजना या विषयावर मार्गदर्शन केले. ॲड. अक्षय पाटील यांनी शाळा व महाविद्यालयांमध्ये पोस्को कायदा याविषयी माहिती दिली. यामध्ये त्यांनी शाळा व महाविद्यालयांमध्ये कशा प्रकारे काळजी घेतली जावी, सीसीटीव्ही बसवले जावेत, विविध समित्या स्थापन केल्या जाव्यात व तक्रार पेटी ठेवली जावी, असे विचार मांडले. यानंतर ॲड. संजय कोकाटे यांनी स्त्रीभ्रूण हत्या आणि इतर प्रचलित सामाजिक दुष्कृते याविषयी विद्यार्थ्यांच्यामध्ये जागृती करण्याच्या हेतूने विविध उदाहरणे देऊन महाराष्ट्रातील असलेल्या कायद्याबद्दल मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. डी. पी. गुंड यांनी प्राथमिक शिक्षकाला कायदेविषयक ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन ॲड. रत्नमाला पाटील व प्रा. जे. पी. गायकवाड यांनी केले. आभार ॲड. बापूसाहेब गलांडे यांनी मांनले.

**कायद्याविषयक तरतुदींमध्ये सुधारणा व्हावी : शितोळे**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी तसेच शिक्षक आणि पालकांना समुपदेशनाची असलेली गरज आपल्या मनोगतामधून व्यक्त केली. शिक्षण व्यवस्थेमध्ये असलेल्या प्रचलित कायदेविषयक तरतुदीमध्ये अधिकाधिक सुधारणा व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.



## जमिनीचे आरोग्य जपणे हे भविष्यातील मोठे आव्हान : प्राचार्य सुगंध शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ५ डिसेंबर-**

दरवर्षी ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिन जगभर उत्साहाने साजरा केला जातो. यंदा संयुक्त राष्ट्र संघटनेने मृदेची काळजी: मोजमाप, निरीक्षण व व्यवस्थापन या संकल्पनेवर आधारित जागतिक मृदा दिन साजरा करण्याचे आवाहन केले होते. यावेळी जनिमीनचे आरोग्य जपणे आव्हान असल्याचे मत प्राचार्य सुगंध शिंदे यांनी सांगितले.

या निमित्ताने महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नीत आर्या कृषी महाविद्यालयात मोठ्या उत्साहाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमासाठी संस्थेचे मार्गदर्शक रणजितसिंह शिंदे आणि महाविद्यालय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून श्रीराम कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, पानीव (ता. माळशिरस) येथील प्रभारी प्राचार्य प्रा. सुगंध शिंदे उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी आर्या कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन उबाळे होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.

प्राचार्य सुगंध शिंदे यांनी शेतीसमोरील आव्हाने आणि मातीचे व्यवस्थापन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी हवामान बदल व मानवी हस्तक्षेपामुळे जमिनीचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे स्पष्ट केले. मातीच्या आरोग्याची काळजी घेताना पाणी आणि खतांचा योग्य वापर तसेच सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. प्राचार्य शिंदे म्हणाले, सेंद्रिय कर्ब हा जमिनीचा आत्मा आहे, मात्र सध्याच्या काळात त्याचे प्रमाण झपाट्याने घटत आहे, ज्यामुळे जमिनी नापीक होत आहेत. माती आणि पाणी परीक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी विद्यार्थ्यांना जमिनीच्या आरोग्यासाठी जागरूक राहण्याचे आणि मातीच्या संरक्षणासाठी सक्रिय प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन समन्वयक प्रा. ज्ञानेश्वरी झोळ यांनी केले. यावेळी प्रा. संदीप मुरूमकर, प्रा. तुषार नामदे, प्रा. खंडेराव वाघे, डॉ. तृप्ती राठोड तसेच कुमार शिंदे व रोहित घळके उपस्थित होते.

## 'कर्मयोगी'चे एका दिवसात ९,२१० मे. टन विक्रमी गाळप



### ज्युस, इथेनॉलच्या पहिल्या टँकरचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ५ डिसेंबर-**

श्रीपूर येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने चालू गळीत हंगामात एका दिवसात विक्रमी ९,२१० मे. टन गाळप केले.

कारखान्याचा गाळप हंगाम चालू होऊन साधारण तीन आठवडे होत आहेत. या कालावधीत कारखान्याने आजपर्यंत १ लाख ५९ हजार ८४८ मे. टन ऊसाचे गाळप करीत सरासरी १०.१२ टक्के साखर उताऱ्याने १ लाख ४१ हजार ३० साखर पोत्यांचे उत्पादन केले आहे. चालू गळीत हंगामाचा विचार करता कर्मयोगी कारखाना १२ लाख मे. टन ऊसाचे गाळप करणार आहे. कारखान्याची गाळप क्षमता ८५० मे. टन आहे. परंतु कारखान्याने सुरुवातीपासूनच ऊस गाळपाचे सातत्य राखत आज एक दिवसीय सर्वोच्च गाळप केले आहे.

याबरोबरच केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीस परवानगी दिल्याने ज्यूस ते इथेनॉल निर्मिती करत एक्सपोर्ट होणाऱ्या पहिल्या टॅन्करचे पूजन कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या हस्ते करून टँकर रवाना करण्यात आला. यावेळी प्रोडक्शन मॅनेजर मुकुंद कुलकर्णी, मुख्य शेती अधिकारी कुमठेकर, डिस्टलरी मॅनेजर पाटील, मुख्य अभियंते अमोल बारटक्के, मुख्य लेखापाल रविंद्र काकडे, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, परचेस मॅनेजर महेश देशपांडे, अधिकारी तानाजी भोसले, हणमंत नागणे, सचिन विभूते, समिर सय्यद, सोपन कदम, तेजस जाधव उपस्थित होते.

**सामुहिक प्रयत्नांचे यश**

कर्मयोगी कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, उपाध्यक्ष कैलास खुळे व सर्व संचालकांचे मार्गदर्शन, अधिकारी व कामगारांचे सामुहिक प्रयत्न व सर्वांत महत्वाचे म्हणजे कारखान्याचे संस्थापक कै. सुधाकरपंत परिचारक यांच्या शेतकरी हिताय व कामगार सुखाय या उक्तीचा आदर्श पुढे ठेवून आम्ही काम करत आहोत. त्यामुळे व्यवस्थापन, अधिकारी व कामगार यांच्या सामुहिक प्रयत्नांचे हे यश आहे. **- डॉ. यशवंत कुलकर्णी, कार्यकारी संचालक**

## वैराग परिसरात महायुतीच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ डिसेंबर-**

राज्याच्या मुख्यमंत्रीपदी भाजपाचे गटनेते देवेंद्र फडणवीस विराजमान झाले असून मुंबईतील आझाद मैदानावर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. यावेळी राष्ट्रवादीचे अजितदादा पवार, शिवसेनेचे एकनाथ शिंदे या दोन्ही नेत्यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. पुन्हा येईन अशी गर्जना करणारे फडणवीस यांनी शपथ घेताच ग्रामीण भागातील भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच महायुतीचे कार्यकर्ते यांनी गुलालाची उधळण, फटाक्यांची आतिषबाजी करीत एकमेकांना पेढे भरवित आनंद उत्सव साजरा करण्यात आला.



माजी राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाचे तालुका सरचिटणीस संजय आवारे यांनी तडवळे ग्रामस्थांसमवेत जल्लोष साजरा केला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य गणेश आवारे, श्रीकांत पाटेकर,धवल पवार, सुधीर आवारे, अकील शेख, विलास कुलकर्णी, श्रीकांत गुरव, तात्यासो भोसले, अभिमन्यू पवार ग्रामस्थांनी पेढे वाटून, फटाक्याची आतषबाजी करत मोठ्या जयजयकारात जल्लोष साजरा केला. यावेळी पेढे आणि लाडू यांचे वाटप करून गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी अण्णा ग्रुपचे संस्थापक वैजिनाथ आदमाने, मेजर जगन्नाथ आदमाने, सतिश करंडे, दत्ता क्षीरसागर, आण्णा पौळ, आण्णा गाटे, नाना शिखरे, वैभव खेंदाड, महेश पन्हाळे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या कायम पाठीशी उभा राहणाऱ्या काळेगाव येथील ग्रामस्थांनी देखील फडणवीस यांची निवड होताच जल्लोष साजरा केला. यावेळीविनायक देशमुख, आप्पासो घायतिडक, सोमनाथ घायातिडक, नेताजी घायतिडक, पंडीत गटकळ यांच्यासह भाजपाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. सारोळे येथेही जल्लोष साजरा केला. यावेळी विलास गाटे, बाळराजे गाटे, जितेंद्र चौधरी, अरुण पाटील, अंकुश गाटे, प्रकाश गाटे, कमलाकर पाटील, कल्याण पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाळवणीतील युनियन बँकेला टाळे ठोकण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ डिसेंबर-**



भाळवणी येथील युनियन बँक ऑफ इंडियाच्या शाखेत कर्मचारी कमी असल्याने खातेदारांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. कर्मचारी वाढवण्याचा ठराव करण्याबरोबरच बँकेला टाळे ठोकण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या ठरावाचे निवेदन सरपंच रणजीत जाधव व वसंतराव काळे साखर कारखान्याचे संचालक सुनील पाटील यांच्या हस्ते शाखाधिकारी बालाजी हारके यांना निवेदन देण्यात आले. यावेळी सरपंच रणजीत जाधव यांनी बँकेत भाळवणीसह, केसकरवाडी, शेंडगेवाडी, धोंडेवाडी, जैनवाडी, महीम, तांदुळवाडीतील खातेदारांना व्यवहार करावा लागत आहे. या परिसरात साखर कारखाना, शासकीय कार्यालय, महाविद्यालये, व्यापारी, शेतकरी, कामगार, सेवानिवृत्ती धारक यांची गर्दी कायम राहत आहे, त्यांना सेवा देणे अडचणी ठरत असल्याचे सांगितले. पासबुक प्रिंट करून मिळावे, एटीएम मशीन इतर ठिकाणी सुरू करावी, सोने तारण कर्ज योजना सुरू करावी, शेती,व्यवसाय कर्ज योजना सुरू करावी, शासकीय योजनांची माहिती फलक दर्शनी भागात लावावेत, एटीएम, चेक बुक तात्काळ मिळावे यासह विविध मागण्या करण्यात आल्या.

# समारया हुल्लूरने रचला इतिहास


## सर्वांत लहान वयात पायलट होण्याचा मान मिळवला

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. ५ डिसेंबर-**

ती लहान असताना विजयपुरामध्ये आयोजित नवरसपूर उत्सवादरम्यान स्थानिक हेलिकॉप्टर सहल आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्या पोरीचे वडील कुटुंबासह हेलिकॉप्टरमध्ये बसून फेरफटका मारला होता. पायलट होण्याचे स्वप्न पाहिलेल्या ८ वर्षांच्या त्या मुलीने वयाच्या १८ व्या वर्षी आपले स्वप्न साकार केले. याद्वारे ती भारतातील सर्वात लहान वयात पायलट होण्याचा मान मिळवून इतिहास रचला आणि तिने राष्ट्रीयस्तरावर जिल्हा आणि राज्याची शान वाढवली आहे.

शहरातील रहिवासी उद्योजक इमाम साब हुल्लूर यांची नात अमिनोद्धीन हुल्लूर यांची सुपुत्री समायरा हुल्लुर वयाच्या १८ व्या वर्षी कमर्शिअल पायलट लायसन्स मिळवून भारतातील सर्वात तरुण पायलट बनली. यातून मुली हवे तितके उंच भरारी घेऊ शकतात हे समीराने दाखवून दिले आहे. तिने २०० तासांचे उड्डाणाचे प्रशिक्षण पूर्ण केले आणि दिल्ली आणि महाराष्ट्रातील एव्हिएशन अकादमींमध्ये प्रशिक्षण घेऊन अधिकृत पायलट बनले.

सैनिक शाळेत एलकेजी ते तिसरी इयत्तेपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर तिने शांतिकेतन इंटरनॅशनल स्कूलमध्ये चौथी ते दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले. शहरातील केंद्रीय विद्यालयात पीयू सायन्स पूर्ण केल्यानंतर, समायरा थेट दिल्लीला गेली. जिथे तिने डीजीसीए फ्लाइंग परीक्षा दिली आणि उत्तीर्ण झाली. त्यानंतर दिल्लीतील विनोद यादव एव्हिएशन अकॅडमीमध्ये कोचिंगला रुजू झाली आणि तेथेच प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर महाराष्ट्रात बारामती येथील कारवे एव्हिएशन अकॅडमीमध्ये प्रात्यक्षिक प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी २०० तासांचा उड्डाणाचा अनुभव पूर्ण केला. तिने पहिल्यांदा १८ वर्षे ८ महिने वयात विमानाचे प्रशिक्षण घेतले आणि ती सर्वात तरुण भारतीय वैमानिक बनली. दुसरे म्हणजे, पायलट होण्यासाठी सुमारे ३ ते ४ वर्षे लागतात, तर समायराने तिचे प्रशिक्षण अवघ्या १ वर्ष ७ महिन्यांत पूर्ण करुन पायलट बनली.



लहानपणापासून विमान उडताना पाहिल्यावर मला त्याप्रमाणे पायलट व्हायचे होते. माझ्या इच्छेसाठी आमच्या घरातील सर्वांनी मला साथ दिल्याने व कॅप्टन तपेशकुमार व विनोद यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळू शकले. प्रत्येकाने आपल्या घरातील मुलींची इच्छा जाणून घेऊन त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या स्वप्नात साथ दिली पाहिजे. **-समायर हुल्लूर, भारतातील सर्वात तरुण पायलट**

तरुण वयात पायलट झालेली समायर हुल्लुर सर्वांसाठी आदर्श आहे. समायराच्या पालकांप्रमाणेच प्रत्येकाने आपल्या मुलांच्या इच्छेला पाठिंबा दिला पाहिजे. भारतभर नाव कमावणारा हा विद्यार्थी आमच्या शाळेत शिकला ही शाळेसाठी अभिमानाची गोष्ट आहे. **- सुरेश बिरादार, अध्यक्ष, शांती निकेतन हायस्कूल, विजयपूर**

## संक्षिप्त वृत्त

### तांदुळवाडीत तरूणाचा खून



**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील तांदुळवाडी येथे तरूणांचा डोक्यात हत्याराने मारून खून करण्यात आल्याची घटना गुरुवारी दुपारी उघडकीस आली. पत्नीनेच पतीचा डोक्यात लाकडाने मारून खून केल्याची चर्चा गावामध्ये गावकऱ्यांमधून होत होती. रात्री उशिरापर्यंत याबाबत सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते. धुळप्पा नंदकुमार हेले (वय ३५, रा. तांदुळवाडी) असे मरण पावलेल्या पतीचे नाव आहे. धुळप्पा व त्याची पत्नी प्रगती यांचा सुमारे १० वर्षापूर्वी प्रेमविवाह झाला आहे. लग्नानंतर दोघांना तीन मुली असून धुळप्पा यास दारूचे व्यसन होते. यातूनच धुळप्पा आणि प्रगती यांच्यामध्ये वादावादी होत होती. या वादावदीतूनच गुरुवारी दुपारी प्रगती हिने धुळप्पा याच्या डोक्यात लाकडाने जबर मारहाण करून त्याचा खून केला. याची माहिती मिळताच सोलापूर तालुका पोलिसांनी घटनास्थळी जाऊन धुळप्पाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. तर प्रगती हि पोलिसांसमोर हजर झाली आहे. दरम्यान याबाबत गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात सुरु होते. पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे पुढील तपास करीत आहेत.



### वाढेगाव येथे तालुकास्तरीय जागतिक मृदा दिन साजरा

**सांगोला, दि.५ डिसेंबर-**

तालुका कृषी विभाग, सांगोला यांचेतर्फे वाढेगाव येथे तालुकास्तरीय जागतिक मृदा दिन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कृषी विज्ञान केंद्र, मोहोळचे डॉ.तानाजी वळकुंडे यांनी जागतिक मृदा दिन का साजरा केला जातो, मृदा आरोग्य पत्रिकेनुसार रासायनिक खतांचा किती वापर कसा करावा, मृदेची प्रत टिकविण्यासाठी सेंद्रिय निविष्ठांचा वापर, ताग, धेंचा यासारखी हिरवळीची खते, पिकांची फेरपालट याबाबत मार्गदर्शन केले. तसेच तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव यांनी प्रास्ताविकेमध्ये माती नमुना का तपासावे त्याचे कोणकोणते फायदे आहेत इत्यादी व कृषी विभागाच्या योजनेविषयी माहिती दिली. तसेच अनुसुचित जाती जमातीतील शेतकऱ्यांसाठी विविध योजनेअंतर्गत निधी शिल्लक आहे तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टल वर अर्ज करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मृदा आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमास वाढेगाव येथील संजय डोईफोडे, शिवाजी दिघे, जालिंदर दिघे, धोंडीराम दिघे, नारायण दिघे, दीपक भगत, आप्पा इंगवले, विष्णू दिघे, सुरेश दिघे, बंडू चौगुले, गोरख सूर्यगंध, पप्पू माने, भास्कर दिघे, आत्मा सांगोलाचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक मेघराज पोळ, व सहा. तंत्रज्ञान व्यवस्थापक श्रीकांत सोनवणे, कृषी पर्यवेक्षक मधुकर चव्हाण, मनोज जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन कृषि पर्यवेक्षक श्रीकांत शिंदे यांनी केले. आभार मंडल कृषी अधिकारी प्रवीण झांबरे यांनी मानले.

### बचत गटाच्या महिलांची फसवणूक; पोलिसांकडे तक्रार

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

शहरातील अनेक बचत गटाच्या महिलांची फसवणुक झाल्याचे समोर आले असून महिलांकडून पैसे घेऊन काम न देणाऱ्या कंपनीने कार्यालय बंद करून पळ काढल्याचे दिसून आले आहे. हा प्रकार गुरुवारी उघडकीस आला असून याबाबत शहर पोलिसांकडे महिलांनी तक्रारी दाखल केल्या आहेत. जुनी मिल कंम्पौडमधील दि स्क्वेअर मॉल येथे कृष्णप्रिया महिला व बहुउद्देशीय संस्था, संचलित खुशी महिला गृह उद्योग समुह, पुणे यांचे कार्यालय आहे. या कार्यालयाकडून शहरातील विविध भागात फिरून बचत गट तयार करण्यात आले. बचत गटातील महिलांना पेन्सिल पॅकींगचे काम देण्याचे आमिष दाखवून प्रत्येक महिलेकडून २१०० रुपये घेण्यात आले. पैसे घेऊनही कार्यालयाकडून काम देण्यात आले नाही, त्यामुळे गुरुवारी दुपारी या कार्यालयाजवळ अनेक महिला जमा झाल्या होत्या. अखेर फसवणुक झालेल्या सर्व महिलांनी फौजदार चावडी पोलिस ठाणे गाठले. पोलिसांना सर्व हकीकत सांगून पोलिस निरीक्षक अरविंद माने यांनी या महिलांना पोलिस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेकडे पुढील चौकशीसाठी पाठवून दिले. रात्री उशिरापर्यंत या प्रकरणाची कसलीही नोंद पोलिसांकडे झालेली नव्हती.



### सांगोला येथे हिंदू जनजागृती समितीचे तहसीलदारांना निवेदन

**सांगोला, दि.५ डिसेंबर-**

बांगलादेशातील इस्कॉनचे स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांच्या अन्याय अटके विरोधात त्वरित हस्तक्षेप करण्याची मागणी करत तेथील हिंदू अल्पसंख्यांक वरील अन्याय रोखण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नावे सांगोला येथे हिंदू जनजागृती समितीच्या वतीने तहसीलदार यांना गुरूवार दि.५ डिसेंबर रोजी निवेदन देण्यात आले. यावेळी तहसीलदार यांच्या वतीने महसूल नायब तहसीलदार उदया देसाई यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने डॉ. मानस कमलापूरकर, गणपत पटेल, समर्थ कदम, प्रवीण जानकर, संतोष पाटणे, श्रीकांत बाबर, अभय काटकर, विशाल राजगे, नवनाथ कावळे, बिरुदेव खुळे, भीमाराम चौधरी, सुनील शिंदे, महेश चौधरी, कृष्णा कांबळे उपस्थित होते.

छाया-प्रकाश फाऊंडेशनतर्फे

# दाभोळकर, केतकर, सौमित्र, शिंगाडे यांना पुरस्कार जाहीर

- एक लाख रुपये व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप
- मॅगसेसे पुरस्कार विजेत्या अरुणा रॉय यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण



अरुणा रॉय



कुमार केतकर



भरत दाभोळकर



किशोर कदम



सिध्दार्थ शिंगाडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ डिसेंबर-**

ख्यातनाम जाहिरात तज्ज्ञ आणि अभिनेते भरत दाभोळकर, ज्येष्ठ पत्रकार आणि माजी खासदार कुमार केतकर, अभिनेते किशोर कदम तथा सौमित्र, आणि युवा चित्रकार सिद्धार्थ शिंगाडे यांना यंदा छाया-प्रकाश फाऊंडेशनच्या वतीने अनुक्रमे 'अभिवंदन', 'सव्यसाची पत्रकार', 'कलाकौस्तुभ' आणि 'प्रेरणा' पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. एक लाख रूपये रोख आणि मानपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. मॅगसेसे पुरस्कार विजेत्या आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अरुणा रॉय यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान सोहळा होईल, अशी माहिती फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि दिल्ली हायकोर्टाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती अजित शहा यांनी दिली.

शिवछत्रपती रंगभवन येथे शनिवार, दि.२१ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता हा समारंभ होईल. याप्रसंगी संभाजीनगर (ता. पंढरपूर) जिल्हा परिषद. प्राथमिक शाळेतील सूर्यकांत बनकर यांना शिक्षक गौरव, चंद्रमौळी (ता. मोहोळ) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अनुपमा क्षीरसागर यांना शिक्षिका गौरव, ओझेवाडी (ता.पंढरपूर) येथील उद्योजक अभय नागणे यांना सुहास शहा 'उद्योजकता पुरस्कार' देण्यात येईल. याखेरीज प्राणीमित्र विलास शिवलाल सर्वोदय ट्रस्ट, (माढा) आणि प्रार्थना फाऊंडेशन, मोरवंची (ता. मोहोळ) या स्वयंसेवी संस्थांना ऊर्जा पुरस्कार देण्यात येईल.

छाया-प्रकाश फाऊंडेशनच्यावतीने हुशार आणि गुणवान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही देण्यात येते. यंदा २९ विद्यार्थ्यांना ८ लाख रुपये इतक्या रकमेची शिष्यवृत्ती वाटप होईल. या समारंभात सिद्धार्थ शिंगाडे 'माझे रंगरेषांचे जग', भरत दाभोळकर 'अजब दुनियेतील रम्यकथा (जाहिरात, नाटक)', कुमार केतकर 'सावध ऐका पुढल्या हाका' या विषयावर आपले विचार व्यक्त करतील. त्याचप्रमाणे किशोर- सौमित्र यांचे मनोगत आणि मॅगसेसे पुरस्कार विजेत्या आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अरुणा रॉय या अध्यक्षीय विचार मांडतील.

#### सौमित्र यांचा 'बाऊल' कार्यक्रम

छाया-प्रकाश फाऊंडेशनतर्फे रविवार, दि.२२ डिसेंबर रोजी 'बाउल' हा कार्यक्रम होईल. अभिनेते किशोर कदम तथा कवी सौमित्र यांनी लिहिलेल्या या दीर्घकवितेचे सादरीकरण ते स्वतःच करतील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून तो हि. ने. वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात सायंकाळी सहा वाजता होईल.

# तूर उत्पादन वाढीसाठी गोदावरी वाण उत्तम

- जिल्हा अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांचा सल्ला
- हिरज येथे शेतकरी मेळावा व शिवार फेरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

शेतकरी बांधवानी तूर उत्पादन वाढीसाठी गोदावरी वाणाचा अवलंब करावा. कृषि विज्ञान केंद्र, सोलापूरच्या हिरज प्रक्षेत्रावर बिजोत्पादनाचे प्लॉट उत्तम पध्दतीने जोपासले आहेत. भविष्यात हे बियाणे म्हणून वापर करावा, असा सल्ला जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी शेतकरी बांधवांना दिला.

शबरी कृषि प्रतिष्ठान, सोलापूर संचलित कृषि विज्ञान केंद्र, सोलापूरच्या हिरज प्रक्षेत्रावर अनुसुचित जमाती उपयोजन कार्यक्रमांतर्गत जागतिक मृदा दिन व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.अध्यक्षस्थानी शबरी कृषि प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदिप गायकवाड होते. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले, मृदा शास्त्रज्ञ विद्यासागर कोळी उपस्थित होते. प्रास्ताविकात केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब तांबडे यांनी शेतकरी बांधवांनी जमिनीच्या आरोग्याबाबत सजग राहीले पाहिजे, तूर पिकामध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढविल्यास हमखास उत्पादनात वाढ होत असल्याचे प्रतिपादन केले. प्रदिप गायकवाड यांनी शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कृषि विज्ञान केंद्राचे प्रयत्न कायम राहतील. शेतकरी बांधवांनी तंत्रज्ञानाचा वापर आपल्या शेतामध्ये वाढवावा. मानवी आरोग्याप्रमाणेच जमिनीचे आरोग्य जपा, ती आपणास भरभरून देईल. रासायनिक खतांचा वापर टप्या-टप्प्याने कमी करा असे प्रतिपादन त्यानी केले. विद्यासागर कोळी यांनी सेंद्रिय शेतीमध्ये रोपांचा वापर करताना नवीन रूट स्टॉकवर वाढविलेल्या भाजीपाला व फळांच्या रोपांचा वापर वाढवण्यासाठी आवाहन केले. तुरीच्या गोदावरी, भिमा वाण, नैसर्गिक पध्दतीने आंबा लागवड इ. क्षेत्राला शेतक-यांसमवेत भेट देण्यात आली. मृदा आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले. प्रगतीशिल शेतकरी बसु बिराजदार, सुर्डी येथील शेतकरी महीला गट, युवाथॉन युवक आयकॉन पुरस्कार प्राप्त प्रतिक झिने, गणेश राठोड, अमोल काकडे इ. शेतक-यांचा सत्कार करण्यात आले. यावेळी कासेगाव, बोरगाव, घोळजगाव येथील ग्रामस्थांनी गाव दत्तक घेण्याचा प्रस्ताव दिला.



### अक्कलकोटमध्ये फटाक्यांच्या आतषबाजीत जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि ५ डिसेंबर-**

राज्याच्या मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे, अजित पवार यांची निवड झाल्याबद्दल अक्कलकोट शहर व तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने अक्कलकोट शहरासह तालुक्यात विविध ठिकाणी ढोल-ताशांच्या गजरात फटाक्यांची आताषबाजी करत जल्लोष करण्यात आला.

भारतीय जनता पक्षाचा विजय असो, देवेंद्र फडणवीस तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है!, आमदार सचिन कल्याणशेट्टी तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है!, भारत माता की जय व वंदे मातरम् अशा विविध घोषणांनी आसमंत दुमदुमला. पेढे वाटून जल्लोष करण्यात आला. याबरोबरच अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी, जेऊर, तडवळ, नागणसूर, तोळणूर, सलगर, वागदरी, चपळगाव, हन्नूर, दहिटणे, वळसंग, कुंभारी, बोरामणी, मुस्ती, तांदुळवाडी आदी भागात भारतीय जनता पक्षासह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. याप्रसंगी शिवशंकर वाले, यशवंततात्या धोंगडे, महेश हिंडोळे, मीलन कल्याणशेट्टी, रमेश कापसे, अंबण्णा चौगुले, शिवशंकर चनशेट्टी, बबलू कामनुरकर,आनंद खजूरगीकर सर ,आनंद पवार , विनोद मदने, नावेद डांगे, सिद्धू चौगुले, सुनिल गवंडी, वैजनाथ मुकडे, उदय नरेगल, स्वप्निल फुकाळे, अभी लोकापुरे, चंद्रकांत दसले, शरणू कापसे, अतिष पवार, देविदास गवंडी, सिद्धाराम माळी, बबलू भागानगरे, हुसेन बागवान, रवी साठे, नितीन जामदार, अमित कोळी, विजय लांडगे, भारत भाडेकर, नूर शेख, शेखर वाले, निशांत निंबाळकर, राजू कोतवाल, सचिन शिंदे, गोविंद शिंदे, चेतन शिंदे, महादेव कामनुरकर, अक्षय तारापुरे, जगदीश बिराजदार, लाला राठोड, रूद्रू स्वामी, संजय जमादार, धनंजय गाडवे, नितुराज बंडगर, सूर्यकांत बाचके, राजाराम पवार, निखिल शिंदे, शिवराज तडवळ, दिनेश शेडम, शिखदर चाऊस, वैजुनाथ मुकडे, नागराज कलबुर्गी, अनमोल सुरवसे, गजेंद्र कोळी, सागर शिंदे, प्रमोद कलशेट्टी, चंदन पाटील, गीतकुमार पवार, अभिजीत चव्हाण, विरेश कळ्ळीमठ, बसवराज स्वामी, शिवराज तडवळ, सिद्धू माशेट्टी सह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### मंद्रुपमध्ये दत्तजयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**मंद्रुप, दि. ५ डिसेंबर-**

दत्तजयंतीनिमित्त मंद्रुपमध्ये १० डिसेंबर ते १४ डिसेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती राजकुमार अतार महाराज यांनी दिली. मंगळवार १० डिसेंबर ते शनिवार १४ डिसेंबरपर्यंत दररोज रात्री जय हनुमान भजनी मंडळाचे भजन होणार आहे. शुक्रवार १३ डिसेंबर श्रीक्षेत्र गाणगापूर येथील दत्त मदिरातून पादुकांचे आगमन होणार आहे. शनिवारी १४ डिसेंबर रोजी पहाटे श्रींच्या मूर्तीस महाभिषेक कार्यक्रम, दुपारी १२ वाजता मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार व गावातील प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत पाळण्याचा कार्यक्रम, दुपारी ४ वाजता दत्त मंदिरापासून ते मुख्य रस्त्यावरून हुतात्मा चौक बसस्थानकापर्यंत पारंपारिक वाद्यांच्या समवेत पालखीसह श्रींची मिरवणूक काढण्यात येणार आहे. दत्त भक्तांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन राजकुमार अतार यांनी केले आहे.

### पत्नीबरोबर भांडण झाल्याने ॲसिड पिऊन पतीची आत्महत्या

**सोलापूर, दि ५ डिसेंबर-**

राजरत्न नगरात पत्नीसोबत तक्रार झाल्याने रागाच्या भरात पतीने बाथरुम धुण्याचे ॲसिड प्राशन केले. त्रास होवू लागल्याने उपचार करण्यासाठी सिव्हिल रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान त्या रुग्णाचा गुरुवारी दुपारी मृत्यू झाला आहे. गुरुनाथ संगप्पा कुंभार (वय ४० रा. राजरत्न नगर, निलम नगर जवळ) असे मयत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. गुरुनाथ त्यांची पत्नी या दोघांमध्ये बुधवारी रात्री अकराच्या सुमारास तक्रार झाली. झालेल्या तक्रारीमुळे रागाच्या भरात गुरुनाथ यांनी घरातील बाथरुम धुण्याचे ॲसिड प्राशन केले,त्रास होवू लागल्याने उपचारासाठी बुधवारी मध्यरात्री भाऊजी रियाल मुल्ला यांनी सिव्हिल रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर उपचार सुरु असताना गुरुवारी दुपारी त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

# विशेष स्वच्छता मोहिमेमध्ये ७९ रस्ते होणार चकाचक

- स्वच्छ व सुंदर शहर ही सोलापुरची ओळख राहण्यासाठी ही मोहिम
- संपूर्ण मोहिमेत ४३७ कर्मचारी, अधिकारी कार्यरत
- महापालिका आयुक्तांनी केली स्वच्छता मोहिमेची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

स्वच्छ आणि सुंदर शहर ही सोलापूरची ओळख व्हावी यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने १३ डिसेंबर पर्यंत सोलापूर शहरातील मुख्य रस्त्याची विशेष स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. या विशेष स्वच्छता मोहिमेमध्ये एकूण ७९ रस्ते होणार चकाचक करण्यात येणार आहेत. संपूर्ण मोहिमेसाठी ४३७ कर्मचारी आणि यंत्रणा कार्यरत आहे. दरम्यान, आज महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांनी या मोहिमेची प्रत्यक्ष पाहणी केली.

या मोहिमेमध्ये आज साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते रेल्वे स्टेशन, डीआरएम ऑफिस ते डफरीन चौक, सात रस्ता ते पत्रकार भवन, विजापूर नाका ते पनाश अपार्टमेंट, बनशंकरी चौक जुळे सोलापूर ते एचएसआर पाणी टाकी, गवळी वस्ती आकाशवाणी रोड ते लोकमंगल हॉस्पिटल, दयानंद कॉलेज ते धरमकाटा चौक, धरम काटा चौक ते रूपा भवानी चौक या विभागात आज स्वच्छता मोहीम घेण्यात आली. रस्त्यावरील धूळ काढणे, झाडांचे फांद्या छाटणी दोन्ही बाजूंवरील फुटपाथ वरील स्वच्छता करणे कचरा काढणे आदी स्वच्छतेची कामे करण्यात आली.

या संपूर्ण मोहिमेसाठी मुख्य आरोग्य निरीक्षक - आठ, आरोग्य निरीक्षक - ४९, स्वच्छता कर्मचारी - ३८०,जेसीबी, डंपर, कॉम्पॅक्टर, कचरा संकलन वाहने, पाण्याचे टँकर आदींसह अन्य अद्ययावत यंत्रणा कार्यान्वित होती. सदर मोहीम ही १३ डिसेंबर पर्यंत सुरू राहणार असून दिलेले नियंत्रण अधिकारी यांच्या अधिपत्याखाली रोज सकाळी सात ते दहा या वेळेत शहरातील मुख्य रस्त्यावरील स्वच्छता मोहीम घेण्यात येणार आहे.

या यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमुर मुलाणी,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले,सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त कृष्णा पाटील, मुख्य सफाई अधीक्षक अनिल चराटे, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, विभागीय अधिकारी श्री महेश क्षीरसागर विभागीय अधिकारी, विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, विभागीय अधिकारी हिदायत मुजावर, विभागीय अधिकारी सतीश एकबोटे पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, सहाय्यक अभियंता विद्युत महादेव इंगळे, उपअभियंता तपंन डंके,उपअभियंता किशोर सातपुते, सहाय्यक अभियंता अविनाश वाघमारे, मुख्य आरोग्य निरीक्षक नागनाथ मेंडगुळे, उद्यान अधिकारी किरण जगदाळे, स्वप्निल सोलंकर , मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, सफाई कामगार, झाडूवाली, बिगारी आदी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

#### स्वच्छता मोहिमेत संस्था, संघटनांनी सहभागी व्हावे : आयुक्त

स्वच्छता मोहिमेसाठी शहरातील सामाजिक संस्था, संघटनांनाही पुढे यावे. शाळा- शाळांमधील मुलांच्या मनात स्वच्छतेचे महत्त्व रुजवावे लागेल. स्वच्छतेच्या विषयाकडे शासकीय मोहीम म्हणून न पाहता प्रत्येक व्यक्तीने स्वयंस्फूर्तीने यात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त शीतल तेली - उगले यांनी केले आहे.

#### रखुमाई महिला बचत गटाचा सक्रिय सहभाग

या स्वच्छता मोहिमेमध्ये आज रखुमाई महिला बचत गटाचे अध्यक्ष सोनाली कसबे,सचिव सुनिता जाधव,अशा लक्ष्मण डोलारे,भाग्यश्री अविनाश खंदारे,मीनाक्षी किशोर जाधव यांनी सहभाग नोंदवला.

#### स्वच्छता कर्मचाऱ्यांना आयुक्तांनी केले मार्गदर्शन

महापालिका विभागीय कार्यालय एक ते आठ मध्ये सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेस महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली- उगले यांनी भेट देऊन पाहणी केली. उपस्थित असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. स्वच्छता मोहीम ही केवळ या कालावधीसाठी जरी असली तरी यामध्ये सातत्य ठेवण्यात यावे, अशा सूचनाही यावेळी आयुक्तांनी सर्व विभागाला दिल्या.


**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)


सोलापूर
दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ‘वालचंद’मध्ये शनिवारी भगवान महावीर अहिंसा प्रश्नमंजुषा स्पर्धा

**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

भगवान महावीरांच्या अहिंसा, सहिष्णुवाद, सर्वोदय तत्वज्ञानाचा प्रचार-प्रसार व्हावा या हेतूने वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स (स्वायत्त) संचलित भगवान महावीर स्टडी सेंटर व श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय अहिंसा तत्त्वज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा शनिवार ७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी आठ वाजता वालचंद सभागृह येथे आयोजित केली आहे. या प्रश्नमंजुषेमध्ये माध्यमिक




प्रशाला, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, प्रौढ श्रावक श्राविका अशा चार विभागातून सुमारे ५० संघांनी भाग घेतला आहे. गुलबर्गा, कोल्हापूर, सांगली, पुणे, धाराशिव अशा विविध ठिकाणाहून संघ स्पर्धेसाठी सोलापुरात येत आहेत.

सकाळी साडेआठ वाजता डॉ. आदर्श मेहता यांच्या उपस्थितीत उद्धाटन सत्र व स्पर्धेनंतर डॉ. सरिता कोठाडिया यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोपाचे होणार आहे. तत्त्वार्थ सूत्र, अहिंसा पाठमाला अशा विविध ग्रंथ माध्यमातून होणाऱ्या या ज्ञानयज्ञात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमान भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठानतर्फे अध्यक्ष डॉ. रणजित गांधी, वालचंदचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी व केंद्रप्रमुख प्रो. महावीर शास्त्री यांनी केले आहे.



## ▶▶संक्षिप्त वृत्त...




### थांबलेल्या रिक्षाला कारची धडक, पाचजण जखमी

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर -**

प्रवाशी भरण्यासाठी थांबलेल्या दोन रिक्षा व रस्त्यावरून जाणाऱ्या तीन दुचाकीस्वारास कारने पाठीमागून येवून धडक दिली. त्यामध्ये पाचजण जखमी होवून २ लाख ७७ हजाराचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी जखमी जावेद अब्दुलगनी बागवान (वय ४७ रा. पद्मानगर,न्यू पाच्छा पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कार चालक (एमएच १३ एझेड ५१५३) यांच्यावर एमआयडीसी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना गंगा टॉवर जवळ सोलापूर याठिकाणी घडली आहे. जावेद बागवान हे त्यांची रिक्षा घेवून गंगा टॉवरजवळ रांगेत थांबला होता. अक्कलकोटकडून येणाऱ्या सिल्वर रंगाच्या कारने (एमएच १३ एझेड ५१५३) ने भरधाव वेगाने येऊन रिक्षाला पाठीमागून धडक दिली. या धडकेत दोन रिक्षा, दुचाकीवरील तिघांना जखमी केले आहे. या तिन्ही वाहनांचे एकुण २ लाख ७७ हजाराचे नुकसान केल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार डोके पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीची सायकलस्वारास धडक, दुचाकीचालकांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर -**

दुचाकी भरधाव वेगाने चालवून एका सायकलस्वारास पाठीमागून धडक देवून जखमी केले, सायकलीचे नुकसान केले याप्रकरणी एका दुचाकीचालकांवर पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना दोन दिवसापूर्वी रेल्वे स्टेशन भाजी मंडई समोर घडली आहे. याबाबत गिरीष यल्लप्पा गायकवाड (वय ४१, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं १) यांनी फिर्याद दिली असून राजेश्वर धोंडप्पा कोनाळे (रा. आवंती नगर, मजरेवाडी) यांच्यावर सदर बझार पोलिसांत बुधवारी मध्यरात्री गुन्हा नोंद झाला आहे. गायकवाड यांचे वडील यल्लप्पा गायकवाड हे त्याच्या सायकलीवरून स्टेशन रोड भाजी मंडई समोरे आले असता, कोनाळे यांनी त्याच्या ताब्यातील दुचाकी (एमएच १३ डीएन ४५७३) ही भरधाव वेगाने चालवून त्यांना मागून धडक देवून गंभीर जखमी केले. सायकलीचे नुकसान केले आहे. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक माडे पुढील तपास करीत आहेत.

### भद्रावती पेठेतून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर -**

शहरातील भद्रावती पेठेतून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबबात संतोष राजेंद्र गडगी (वय ३९, रा. भद्रावती पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० ऑक्टोबर ते ४ डिसेंबर या कालावधीत गडगी यांनी त्यांची एमएच १३ सीआर ५९९६ क्रमांकाची दुचाकी ही घरासमोर हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

### तरूणास मारहाण करणाऱ्या दुचाकीस्वारावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर -**

कारचालक तरूणास मारहाण करणाऱ्या दुचाकीस्वाराविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मंगेश भास्कर थोरात (वय २९, र. रेल्वे लाईन, बिल्डींग नं. १४०, घर नं. १३, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शंकर बाळासाहेब चव्हाण (रा. जय मल्हार चौक, बुधवार पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ डिसेंबर रोजी रात्री पावणे आकराच्या सुमारास मेकॅनिकी चौक येथून मंगेश थोरात हा एमएच १३ बीएन ८३३६ ही घेऊन घराकडे येत होते. त्यावेळी शंकर चव्हाण हा एमएच १३ ईएन ६४६३ या दुचाकीवरून ट्रिपल सीट भरधाव वेगाने चालवित येऊन थोरात यांच्या कारला समोरून जोरदार धडक दिली. त्यानंतर चव्हाण याने थोरात यास शिवीगाळ करून कारमधून बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत मारहाण करून कारचे १५ हजार रुपयांचे नुकसान केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक कामुर्ती पुढील तपास करीत आहेत.

# शपथविधीनंतर भाजपाचा सोलापुरात जल्लोष




## आता महापालिकेवरही महायुतीचा भगवा फडकणार

## भाजपा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या भावना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्यातील सत्तास्थापनेचा शपथविधी सोहळा थाटात पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतल्यानंतर सोलापूर शहरातील काही प्रभागात भाजपा कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांनी जल्लोष करून आनंद व्यक्त केला तर काही ठिकाणी पेढे वाटले. आमदार देवेंद्र कोठे यांच्याही संपर्क कार्यालयासमोर आज शपथविधीनंतर मोठा जल्लोष करण्यात आला. दरम्यान, आता सोलापूर महापालिकेवरही महायुतीचाच भगवा फडकणार असल्याचा आत्मविश्वासही शहराध्यक्ष नरेंद्र काळे, भाजप सरचिटणीस पांडुरंग दिड्डी यांच्यासह शहरातील इतर पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई येथील आझाद मैदानावरील शपथविधी सोहळा लाईव्ह पाहण्यासाठी शहरातील काही प्रभागात मोठे स्क्रीनही लावण्यात आले होते. या सोहळ्यानंतर अनेक प्रभागात फटाक्यांची आतषबाजी करून पेढे वाटत भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी आपला आनंद द्विगुणीत केला. अनेक ठिकाणी पुरूष पदाधिकाऱ्यांनी ढोलताशांवर ठेका धरला तर महिला पदाधिकाऱ्यांनी फुगड्या खेळत आपला आनंद द्विगुणीत केला. बुधवारीही भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र विधीमंडळ गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांच्या निवडीनंतर सोलापूर शहर-जिल्हा भाजप कार्यालयासमोर लाडू वाटून व फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला होता. महायुतीची सत्ता एकहाती आल्याने भाजपा पदाधिकारी, माजी नगरसेवकांनी आपल्या भावना व्यक्त करताना महापालिकाही आता ताब्यात घेणार असल्याचा निर्वाळा दिला. इतकेच नाहीतर सोलापूरच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी मुंबईच्या या शपथविधी सोहळ्यात आपला सक्रीय सहभाग नोंदविला आणि हा शपथविधीचा देखणा सोहळा लाईव्ह पाहून आपल्याला मोठा आनंद झाल्याचे सांगितले. मुंबईच्या आझाद मैदावरील शपथविधी सोहळ्यासाठी भाजपाचे शहर-जिल्ह्यातील सर्व आमदार, महायुतील सर्व जिल्हा, शहरप्रमुख गेले आहेत.

### याची देही पाहिला अतिशय आनंदी क्षण!

मुंबईतील आझाद मैदानावर आज शपथविधी सोहळ्याच्या दिवशी राज्यातील तमाम भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. २०१९ साली शिवसेना भाजपाकडे बहुमत असतानाही देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री होता आले नव्हते. ते पुन्हा सत्तेत आणण्यासाठी भाजपाच्या राज्यातील सर्वच पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी कंबर कसली आणि आजच्या आनंदी क्षणांचा देखणा शपथविधी सोहळा आम्हाला याची देही याची डोळा पाहता आला आणि समाधान वाटले.

### आ. विजय देशमुखांच्या संपर्क कार्यालयासमोरही जल्लोष

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याबद्दल आमदार विजयकुमार देशमुख यांच्या संपर्क कार्यालयासमोर मोठ्या प्रमाणात जल्लोष करण्यात आला. यावेळी सर्व कार्यकर्त्यांना पेढे वाटून तर महिलांनी फुगडी खेळून आनंद साजरा केला. यावेळी माजी नगरसेवक अमर पुदाले, ज्ञानेश्वर कारभारी, श्रीकांत घाडगे, रवींद्र पाटील, गुरुनाथ निंबाळे, पंकज काटकर, नागेश येळमेळी, प्रेम भोगडे, विजय बमगुंडे , आमदार विजयकुमार देशमुख यांचे स्वीय सहाय्यक रमेश गायकवाड , विजय बमगुंडे, वंदना गायकवाड, महिला अध्यक्ष विजया वड्डेपल्ली, विमल कन्ना आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जलजीवनची ५१ कोटींची बिले प्रलंबित

## कॉन्ट्रक्टर असोसिएशनचा जि.प. प्रशासनावर ठपका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

जिल्हा परिषद जलजीवन योजनेअंतर्गत एकूण ५१ कोटींची बीले प्रलंबित आहेत. त्यामुळे ठेकेदारांची आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. निधी आणण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडून शासनाकडे आवश्यक तो पाठपुरावा करण्यात येत नसल्याचा आरोप करत ही बीले तातडीने मिळावी, अशी मागणी ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे कार्याध्यक्ष आनंद तोडकरी यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. दरम्यान बीले थकल्याने अडचणीत आलेल्या असोसिएशनच्या अध्यक्षांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याचीही माहिती मक्तेदार संघटनेने निवेदन देताना केली आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागात जल जीवन योजनेअंतर्गत ठेकेदारांना बिले वेळेवर मिळत नाहीत. जिल्हा परिषदेमध्ये या योजने अंतर्गत ९०० कोटीची तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे ५०० कोटीचे कामे चालू आहेत. नोंदणीकृत सुमारे ५० कॉन्ट्रॅक्टर्स कार्यरत आहेत. जल जीवन योजनेअंतर्गत १३४ कामांची ५१ कोटींची बिले काम




पूर्ण करूनही प्रलंबित आहेत. मार्च २०२३ पासून आजतागायत ही बिले मिळाली नाहीत. १८९ कामांची बिले चौकशीच्या नावाखाली प्रलंबित ठेवण्यात आली आहेत. या प्रकरणाशी ठेकेदारांचा संबंध नाही तर अधिकाऱ्यांशी संबंधित ही प्रकरणे असतानाही बिले प्रलंबित ठेवली आहेत. या चौकशी समितीचा निर्णयही दिला जात नाही. त्याचा नाहक फटका ठेकेदारांना बसत आहे. मुदतवाढीच्या विषयामध्ये विनाकारण ठेकेदारांना दंड लावण्यात येत आहे असा आरोप करत शासनाकडे आवश्यक तो पाठपुरावा करून ही बिले मंजूर करावेत, अशी मागणीही आनंद तोडकरी यांनी केली. या पत्रकार परिषदेस राहुल कौलगे-पाटील, हेमंत जाधव, विनीत पाटील, अण्णाराव पाटील आदी उपस्थित होते.

### संघटनेच्या अध्यक्षाचा आत्महत्येचा प्रयत्न

दरम्यान असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. थकित देयके प्राप्त न झाल्यामुळे गुरुवारी ५ डिसेंबर रोजी संघटनेचे अध्यक्ष मोतीलाल राठोड यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सीईओ कोहिनकर यांच्या निदर्शनास निवेदनाद्वारे आणून दिले. श्री. राठोड हे सध्या खाजगी रुग्णालयात उपचार घेत असल्याचेही त्यांनी सांगितले. कोट्यावधीची देयके थकल्याने त्यांनी विष पिल्याची चर्चा जलजीवन मिशनच्या ठेकेदारांमध्ये होती. परंतु याबाबत पोलिसात कोणतीही नोंद झालेली नाही. यावर कोहिनकर यांनी बैठक घेऊन निर्णय घेऊ असे सांगितले असल्याचे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांशी सांगितले.

# रब्बी हंगामासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून ५४ कोटी पीककर्ज वाटप

## शेतकऱ्यांत समाधानाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने रब्बी हंगामातील पिकांसाठी ५३ कोटी ९३ लाख ८३ हजाराचे ३ हजार ९६५ सभासदांना कर्ज वाटप झाले असून, याचे प्रमाण १४ टक्के असल्याचे कर्ज विभागाच्या वतीने सांगितले. दरम्यान, या कर्जवाटपामुळे काही शेतकरी बांधवांनी समाधान व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक ही शेतकऱ्यांची बँक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहे. सोलापूर जिल्ह्यात यंदा सरासरीच्या दीडपट पाऊस झाल्याने खरिपामधील सोयाबीन, कांदा, उडीद, मूग, भुईमूग, अशी नगदी उत्पन्न देणाऱ्या पिकांची लागवड १०० टक्के हुन जास्त झाली. काही भागात अती पावसाने पिके वाया गेली मात्र बहुतांश शेतकऱ्यांना खरिपातील उत्पन्न चांगले साधले आहे.

सध्या रब्बी पीक लागवड हंगाम चालू आहे. ऊस, फळ पिके, ज्वारी, गहू, हरभरा अशी पिके शेतकऱ्यांनी घेतली आहेत. तर काही भागात अजून पेरणीही चालूच आहे. जास्तीच्या पावसामुळे यंदा पेरण्या लांबल्या होत्या. सोलापूर जिल्ह्यात जवळपास ८० रब्बी पेरणी झाली आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने २४-२५ मधील रब्बी पिकातील ऊस,गहू,हरभरा,ज्वारी व इतर पिकांसाठी सोलापूर जिल्ह्यातील २०७ शाखेतून ३ हजार ९६५ शेतकरी सभासदांना ५३ कोटी ९३ लाख ८६ हजराचे कर्ज



वाटप करण्यात आले. तर २०२३-२४ मध्ये रब्बी हंगामासाठी २ हजार ६६२ सभासदांना ४७ कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले होते. यंदा कर्जवाटपात वाढ झाल्याने शेतकरी बांधवांतून समाधान व्यक्त होत आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्तीने खरीप हंगामात ३९ हजार ५८८ सभासदांना ५४ कोटी ६५५ लाख रुपये वाटप केले होते. दरम्यान, या वाटपामुळे बँकेचे १११.५९ % उद्दिष्ट पूर्ण झाले असल्याचेही कर्ज विभागाच्या वतीने सांगितले आहे.

### थकबाकीदारांनी थकबाकी फेडून नवीन कर्ज घ्यावे

डिसीसी बँकेच्या वतीने रब्बी पीक कर्ज योजनेचा लाभ घेण्यात यावा.ज्या सभासदांनी रब्बी पीक कर्जाची मागील थकबाकी आहे, त्यांनी परतफेड करून नवीन कर्ज घेऊन आर्थिक अडचणी दूर कराव्यात.

**- रवींद्र शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती बँक**

# नवजात बालक मृत्यू प्रकरणी हॉस्पिटलमधील सर्व डॉक्टर, कर्मचाऱ्यांचे घेतले जबाब

## आरोग्य अधिकारी डॉ. माने यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर -**

जिजामाता प्रसूतीगृहातील नवजात बालक मृत्यू प्रकरणी चौकशी समितीने संबंधित डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांचे लिखित जबाब नोंदविले आहेत. लवकरच प्राथमिक अहवाल आरोग्य अधिकारी यांना सादर करणार आहेत. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

सोलापूर महापालिकेच्या जिजामाता प्रसूतीगृहात काल बुधवारी नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या ठिकाणी त्यावेळी संबंधित डॉक्टर्स हजर नसल्याचा आरोप नातेवाईक आणि प्रहार संघटनेने केला आहे. संबंधित डॉक्टरवर कारवाई करावी, अशी मागणीही या संघटनेने केली आहे. या प्रसूतीगृहात संबंधित महिलेवर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, तत्काळ आरोग्य अधिकारी डॉ. माने यांनी या प्रसुतीगृहास भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाशी संदर्भात सर्व माहिती घेतली. चौकशी समिती नेमून अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर दोषी आढळल्यास कारवाई करण्यात येईल असे काल आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर आज गुरुवारी चार सदस्य असलेल्या चौकशी समितीने जिजामाता प्रसूतीगृहातील दिवस व रात्रीच्या काळात कामावर असलेल्या संबंधित डॉक्टर्स, नर्स व इतर कर्मचाऱ्यांचे लेखी जबाब घेतले आहेत. त्यानंतर ही चौकशी समिती आपला अहवाल लवकरच महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. माने यांना सादर करतील. तो अहवाल आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत नियंत्रण अधिकारी उपायुक्त आशिष लोकरे यांना अंतिम निर्णयासाठी पाठविण्यात येईल.

### प्रसूतीगृहात वैद्यकीय स्टाफने सतर्क रहावे : डॉ. माने

महापालिकेच्या सर्व प्रस्तुतीगृहातील डॉक्टर्स, मेट्रन यांच्यासह सर्व स्टाफने आपापल्या कार्यालयीन वेळेत हजर राहिले पाहिजे. सतर्क रहावे. अशा घटना घडणार नाहीत याची दक्षता घ्यावी. प्रत्येक रुग्णांची आवश्यक ती काळजी आणि तपासणी वेळोवेळी करण्यात यावी. कॉम्प्लिकेटेड केसेस आढळून आल्यास मोठ्या दवाखान्यात संदर्भ सेवा देण्यासाठी पाठवाव्यात, अशा सक्त सूचना देण्यात आल्या असल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले.

# रामराज्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांना आ. कोठेंकडून ‘राम दरबार’ची भेट

## मुख्यमंत्रीपदासाठी केले अभिनंदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

महाराष्ट्रात रामराज्य यावे याकरिता शहर मध्य विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना श्रीरामचंद्र, श्री लक्ष्मण, श्री सीतामाई आणि श्री हनुमंताची मूर्ती असलेली 'राम दरबार'ची प्रतिकृती देऊन सन्मान केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आमदार देवेंद्र कोठे यांनी मुंबई येथे अभिनंदन केले.

आमदार कोठे म्हणाले, रामराज्य आणि शिवराज्य म्हणजे जनहिताचे राज्य होते. मुख्यमंत्रीपदावर कणखर नेतृत्व असलेले फडणवीस विराजमान झाल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या विकासाचा रथ अधिक गतिमान होईल, याची सर्वांनाच खात्री आहे. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यावधी जनतेला मनस्वी आनंद झालेला आहे. आगामी



काळात शहरासह संपूर्ण महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आ. गिरीष महाजन, आ. शिवेंद्रराजे भोसले, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. नितेश राणे, प्रवीण दरेकर, संभाजी पाटील-निलंगेकर, पालिकेचे माजी स्थायी समिती सभापती विनायक कोंड्याल, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, रमेश यन्नम, प्रदीप पाटील, सुरज चौहान, सिद्धेश्वर कमटम, झैद बेलीफ, सागर भोसले, विनोद पवार, पवन खांडेकर, आकाश भोसले, भोजराज माने आदी उपस्थित होते.

### हनुमंताप्रमाणे सेवक म्हणून राहणार कार्यरत : आ. देवेंद्र कोठे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात राम राज्य येत असताना मी हनुमंताप्रमाणे सेवक म्हणून कार्यरत राहून सोलापूरचा विकास साधेन, असा शब्द याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे यांनी आपल्या मनोगतातून दिला. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठीवर थाप मारून त्यांचे कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९६६

**नातरी प्राणाचें सोयरें भेटे । मग जीवें भूतली जिये संकटें ।**
**तियें निवेदितां न वाटे । संकोचु कांहीं ॥**

कौरवांबरोबर युध्द करण्यासाठी आलेला अर्जुन आपले सगेसोयरे पाहून त्यांचेबरोबर युध्द न करण्याची भाषा वापरु लागला होता. अर्थात तो मोहग्रस्त झाला होता. म्हणून भगवंत त्याला या मोहातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत होते. तेव्हा अर्जुन भगवंतांना वाट्टेल तसे उलट-सुलट प्रश्न विचारीत होता. प्रश्न विचारतांना तो भगवंताला नांवही ठेवत होता. या युध्द प्रसंगाच्या अगोदर तर तो वाट्टेल तसा वागला होता. वाटतील ती कामे त्याने भगवंतांना सांगितली होती. विश्वरुप दर्शन पाहिल्यानंतर मात्र अर्जून घाबरला. त्याला आपण भगवंताशी किती चुकीच्या पध्दतीने वागलो याची आठवण होऊ लागली. भगवंताचा अधिकार व आपल्या चुका लक्षात आल्याने भगवंतांची माफी मागण्याशिवाय, त्याची क्षमायाचना करण्याशिवाय त्याच्याकडे पर्याय नव्हता. म्हणून तो क्षमायाचना करु लागला आहे. पण तो तुमच्या आमच्या सारखी क्षमायाचना करीत नाही, तो भगवंतावर आपला आपुलकीचा अधिकार दाखवून, तसेच लडीवाळपणे चुका केल्या, म्हणून त्याने त्या चुका माफ कराव्यात असे म्हणतो आहे.



पुत्राच्या अपराधाचे बापाने वाईट वाटून न घेता, आपणाला पुत्र समजून सर्व अपराध पोटात घ्यावेत. मित्राचा उध्दटपणा मित्र जसा शांतपणे सहन करतो, तसे भगवंत आपले मित्र असल्याने आपला आतापर्यंतचा उध्दटपणा सहन करावा. प्रियव्यक्ती प्रियजनाच्या ठिकाणी सन्मानाची अपेक्षा करीत नाही, त्याप्रमाणे भगवंतांनी राजसूय यज्ञात उच्छिष्ट काढले, ते आता क्षमायोग्यच आहे, असेही तो म्हणतो आहे. आज अशा मित्रांची, प्रियजनांची संख्या कमी होत चालली आहे. आपण माऊलींचे शिष्य असल्याने आपण मित्राची, प्रियजनांची परिभाषा विसरु नये.

अर्जुनाने आतापर्यत भगवंताला वाट्टेल ते का सांगितले किंवा वाट्टेल ते का व कोणाला अधिकारात विचारले, हे सांगतांना तो म्हणतो आहे,नातरी प्राणांचे सोयरें भेटे । मग जीवें भूतली जिये संकटें । तियें निवेदितां न वाटे । संकोचु कांहीं ॥. अर्थात, आपले आवडते नातलग भेटल्यानंतर आपल्या आयुष्यात जी संकटे प्राप्त झालेली असतात किंवा त्यांच्या गैरहजेरीत जी संकटे भोगलेली असतात ते सर्व त्यांच्यासमोर कथन करण्यात संकोच वाटत नाही. त्याप्रमाणे मी तुला नातलग समजून सर्व कथन केले आहे असे तो म्हणतो आहे. माऊली अर्जुनाची मानसिकता ओळखून अत्यंत सुंदर उदाहरण देत आहेत. ते म्हणतात, पत्नी आपल्या पतीला स्वत:हून मनोभावे आपले सर्वस्व अर्पण करते. तेव्हा अशी पत्नी आपला पती भेटल्यावर अंत:करणातील सर्व गोष्टी सांगितल्याशिवाय राहात नाही. त्याप्रमाणे भगवंताला सर्वस्व अर्पण केलेल्या अर्जुनाच्या बाबतीत घडत आहे. पती पत्नीत किती विश्वास असावा या बद्दल माऊली बोलून गेले आहेत. माऊलींच्या अपेक्षेप्रमाणे सर्व पती-पत्नी वागू लागले तर अनेकांचे उदध्वस्त होणारे संसार स्थिर होतील, बरेच भांडणतंटे बंद होऊन सुख लाभेल. माऊलींच्या पती-पत्नीतील विश्वास, व आपुलकी बद्दलच्या अपेक्षेचा भंग आपल्याकडून होणार नाही याची दक्षता आपण घ्यावी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - |
| दि. ६ डिसेंबर २०२४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| विक्रम संवत् २०८०-८१ | महापरिनिर्वाण दिन |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. पंचमी (१२.०७) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - श्रवण (१७.१७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ध्रुव (१०.४२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (२३.३९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**वृषभ** : मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**मिथुन**: व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क**: अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह** : व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या** : कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ** : आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक** : अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु** : योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर** : फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ** : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन**: कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग. व्यापारात लाभ.

# राज्यातील दोन लाख अंगणवाडी सेविकांचे हात 'रितेच'

## लाडक्या बहिणींच्या प्रत्येक अर्जामागे मिळणार होते ५० रुपये; अंगणवाडी सेविका मोबदल्याच्या प्रतिक्षेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. प्रत्येक महिलेला महिन्याला दीड हजार रुपये देऊन महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी महिलांना अर्ज करण्यास आवाहन केल्यानंतर राज्यातील बहिणींनी यासाठी अर्ज सादर केले. या योजनेमध्ये अंगणवाडी सेविकांनाही सहभागी करुन घेतले. सदरचे अर्ज सेविका यांच्यामार्फत सादर केल्याबद्दल त्यांना प्रत्येक लाभार्थ्यांमागे ५० रुपये प्रोत्साहन भत्ता दिला जाणार होता. लाडक्या बहिणींच्या खात्यावर ७५०० रुपये जमा झाले. पण राज्यातील सुमारे दोन लाख २१ हजार ११२ अंगणवाडी सेविका अन् मदतनीस यांना शासनाने ठेंगा दाखवला आहे. प्रत्येक अर्जामागे ५० रुपये देण्याचा वायदा करून शासनाने अद्यापपर्यंत सदरचा निधी सेविका आणि मदतनीस यांच्या खात्याकडे वर्ग केला नाही. यामुळे अंगणवाडी सेविकांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.



दरम्यान, लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन म्हणून ५० रुपये प्रत्येक अर्जासाठी देण्याचे शासनाकडून सांगण्यात आले होते. त्यानुसार अंगणवाडी सेविकांनी देखील अर्ज भरण्यासाठी आपला सर्व वेळ गुंतवला. परंतु त्या बदल्यात अंगणवाडी सेविकांना त्याकामाचा मोबदला मिळाला नाही. अंगणवाडी सेविकांसह सेतूकेंद्र, ग्रामसेवक, आशा स्वयंसेविकांनीही अर्ज भरले आहेत. मात्र अद्याप त्यांच्या खात्यात पैसे जमा झाले नाहीत. ते जमा करण्यासाठी सरकारकडून ठोस निर्णय होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

**अंगणवाड्या आणि सेविका मदतनीस**

एकूण प्रकल्प : ५५३, अंगणवाडी सेविका एक लाख १० हजार ५५६, मदतनीस : एक लाख १० हजार ५५, सोलापूर जिल्ह्यातील सेविका-मदतनीस ८ हजार २५०.

**निधीवर्ग करण्यासाठी संघटनेची शासनाकडे मागणी**

राज्य शासनाच्या सूचनेप्रमाणे अंगणवाडी सेविकांनी ऑनलाईन अर्ज भरले. ज्या महिलांचे अर्ज भरले त्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले. पण अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना प्रतीक्षा करावी लागत आहे. यासंदर्भात संघटनेच्यावतीने प्रशासन व सरकारकडे मागणी केली आहे.

**- सूर्यमणी गायकवाड,**
**राज्य कार्याध्यक्ष, अंगणवाडी सेविका**

अंगणवाडी सांभाळून गावागावांत ऑनलाईन अर्ज भरण्याचे काम अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनी केले. मात्र या कामामध्ये दिलेल्या मोबाईलमधील नेटचा वेग कमी असल्याने ऑनलाईन अर्ज भरण्यात अडचणी आल्या. तरीही सर्व अडथळे पार करत त्यांनी अर्ज भरले. मात्र मोबदला मिळाला नाहीच.

**अंगणवाडी सेविकांना इतर कामांचाही ताण**

राज्यातील विविध अंगणवाडी सेविकांना नियमित कामांबरोबरच अर्ज भरण्याचे काम दिल्याने त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण पडला होता. या कामाचा ताण घेऊन सोलापूर जिल्ह्यातील एका अंगणवाडी सेवेकेला हृदयविकाराचा झटका येऊन, दु:ख निधन झाले होते. अशा अनुकूल परिस्थितीत देखील त्यांनी आपले काम चोख बजावले. तसेच नियमित कामांव्यतिरिक्त शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणे, शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचविण्याचे राष्ट्रीय काम आणि राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. बहुतांश राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम उपक्रमांमध्ये या सेविकांना समाविष्ट करण्यात येते. लाडकी बहीण योजनेचा ऑनलाईन अर्ज भरण्याचे प्रशिक्षणही त्यांना देण्यात आले होते. त्यामुळे निरक्षर व अल्पशिक्षित महिलांनी अंगणवाड्यांमध्ये जाऊन या सेविकांकडून अर्ज भरुन घेतले आहेत

## सामान्य प्रशासन विभागाचा प्रभारी कार्यभार पेंढारी यांच्याकडे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर -**

महापालिका सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतुल हे स्वेच्छा निवृत्त झाल्याने या पदाचा प्रभारी कार्यभार भूमी मालमत्ता विभागाचे अधीक्षक आर. एम. पेंढारी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. सोलापूर महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतुल हे ३० नोव्हेंबर रोजी स्वेच्छानिवृत्त झाले. या विभागाचा प्रभारी पदभार भूमी व मालमत्ता विभागाचे अधीक्षक आर. एम. पेंढारी यांच्याकडे देण्यात आला आहे. महापालिका महिला व बालकल्याण अधिकारी तसेच जनसंपर्क आणि कामगार कल्याण अधिकारी या विभागाचा कार्यभार सांभाळणारे रोहित रामटेके यांनी राजीनामा दिला आहे. रामटेके हे नुकत्याच झालेल्या भरतीमध्ये नियुक्त झाले होते. यामुळे या रिक्त पदांवर ओमप्रकाश वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वाघमारे हे यापूर्वी प्राणिसंग्रहालयाची जबाबदारी सांभाळत होते. वाघमारे यांच्याकडे महापालिका कामगार कल्याण व जनसंपर्क, महिला व बालकल्याण अधिकारी आणि निवडणूक कार्यालय आदी विभागांची जबाबदारी दिली आहे.

### महिला व बालकल्याण अधिकारीपदी वाघमारे

## अखेर 'अपार'साठी एक आठवडा मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

केंद्र शासनाने यु-डायस प्रणालीमधून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ऑटोमेटेड पर्मनंट अकॅडमी अकाउंट रजिस्ट्री अर्थात (अपार) आयडी उपलब्ध करून देण्याचा राष्ट्रीय उपक्रम हाती घेतला आहे. त्याअनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील पहिली ते बारावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सुमारे पावणे आठ लाख विद्यार्थ्यांपैकी आत्तापर्यंत ४ लाख ४३ हजार २१ विद्यार्थ्यांचे अपार आयडी कार्ड काढण्यात आले आहे. उर्वरित विद्यार्थ्यांचे कार्ड काढण्यासाठी आता एक आठवड्याची मुदतवाढ मिळाली आहे. त्यामुळे शिक्षकांनी केलेल्या कष्टाचे चीज होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

जिल्ह्यात ४ हजार ७१८ शाळांमधील पहिली ते बारावीचे एकूण ७ लाख ७५ हजार ६१९ इतके विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनवण्याचे काम सुरू केले आहे. यासाठी ३० नोव्हेंबर रोजीची अंतिम मुदत देण्यात आलली होती. परंतु आता या कामासाठी एक आठवड्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेच्या प्रकल्प संचालकांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्रही पाठवले आहे. जिल्हास्तरावर मोहीम राबवण्याचे निर्देश दिल्यामुळे माहितीची पूर्तता करण्यासाठी धडपड सुरू झालेली आहे. याबाबत केंद्र सरकारकडून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

**पालकांकडून संमती घेण्यास सुरुवात**

अपार आयडी बनवण्यासाठी पालकांचे संमती पत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रत्येक शाळेकडून पालकांची संपर्क साधून त्यांच्याकडून संमती पत्र मागण्यात येत आहे. ज्याप्रमाणे संमती पत्र प्राप्त होईल, त्याप्रमाणे यादी परिपूर्ण होणार आहे. या संमती पत्रामध्ये पालकांच्या आधार कार्ड, पॅन कार्ड, किंवा लायसन्स यापैकी एक कागदपत्रांची पूर्तता करून शाळेत सादर करावयाचे आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यानंतर विधानसभा निवडणुकीत शिक्षक मोठ्या प्रमाणात व्यस्त होते. त्यामुळे अपार आयडी च्या कामासाठी खूप कमी वेळ मिळाला. या कामासाठी अखेर मुदतवाढ मिळाली आहे. एक आठवडाभर मुदतवाढ देण्यात आल्याने, कामाला अधिक गती येईल. यासाठी अधिकाऱ्यांसह शिक्षकांच्या दररोज बैठका आणि पाठपुरावा सुरू आहे

**-कादर शेख, शिक्षणाधिकारी**
**प्राथमिक विभाग सोलापूर**

## सोलापुरात स्त्रीरोग प्रसूतीशास्त्र तज्ज्ञांची दोन दिवसीय परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

सोलापूर स्त्रीरोग प्रसूती शास्त्र संघटनेच्यावतीने दि. ७ व ८ डिसेंबर रोजी हॉटेल बालाजी सरोवर येथे अर्भकाचा मातेच्या उदरातील प्रवास (Fetus as a Patient) या विषयावर स्त्रीरोग प्रसूतीशास्त्र तज्ज्ञांची परिषद आयोजित केली आहे, अशी माहिती परिषदेचे चेअरमन डॉ. मिलिंद शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसूती तज्ज्ञांसाठी कार्यशाळा, परिसंवाद, प्रशिक्षण असे आयोजित केले आहे. या परिषदेमध्ये देशभरातून अनेक स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. मातृत्वाचा प्रवास हा प्रेमाचा, अपत्य जन्माचा आणि संगोपनाचा असतो. या प्रवासात अर्भकाची विशिष्ट काळजी घेणे आवश्यक असते. हा प्रवास प्रसूती तज्ञांच्या मदतीने अधिक सुरक्षित आणि आनंददायी होतो. या परिषदेच्या पूर्वसंध्येला म्हणजे शुक्रवार दि. ६ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत इंडियन मेडिकल असोसिएशन सभागृह, डफरीन चौक येथे पोटातील बाळाची कथा व व्यथा या विषयावर खुले चर्चासत्र आयोजित केले आहे. पोटातील बाळाच्या आरोग्याबाबत विविध मुद्द्यांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत व शंकांचे निरसन करणार आहेत. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या चर्चासत्राला उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. मिलिंद शहा यांनी केले आहे. ही परिषद यशस्वी करण्यासाठी संघटनेच्या सेक्रेटरी डॉ. अमृता कुमठेकर, डॉ. राजीव दबडे, डॉ. विद्या तिरणकर, डॉ. चंद्रकांत जाधव, डॉ. ललिता अग्रवाल यांनी परिश्रम घेत आहेत. या पत्रकार परिषदेस अध्यक्षा डॉ. नीता घाटे, डॉ. मोनिका उंबरदंड, डॉ. रोहिणी देशपांडे, डॉ. चंद्रकांत जाधव आदी उपस्थित होते.



## आमदार अभिजीत पाटील यांचा मराठा सेवासंघाच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

माढा विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार अभिजित पाटील यांचा मराठा सेवासंघ माढा तालुक्याचा वतीने पुष्पहार घालून व शिवधर्मगाथा पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश सहसंघटक दिनेश जगदाळे, संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष किरण घाडगे, जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, पंढरपूर विभाग मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक तात्यासाहेब पाटील, माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख, सचिव शिवाजीराव गवळी उपस्थित होते. यावेळी आमदार अभिजित पाटील यांनी आपण संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघाच्या विचारधारेचा असून, मराठा सेवासंघाला नेहमीच माझे सहकार्य राहील असे सांगितले.

## 'त्या' गटप्रवर्तकाच्या कामकाजात आढळली आर्थिक अनियमितता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्याच्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव आरोग्य केंद्रातील गटप्रवर्तकाच्या विरोधात एका आशा स्वयंसेविकेने तक्रार दिली होती. या संदर्भातील चौकशी अहवाल जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. संतोष नवले यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. या संदर्भात दि. १० डिसेंबर रोजी डॉ. नवले यांच्यासमोर सुनावणी होणार आहे.

दरम्यान, कंदलगाव (ता. दक्षिण सोलापूर) आरोग्य केंद्रातील एका गटप्रवर्तकाच्या विरोधातील तक्रारींबद्दल जिल्हा समन्वयक बबिता शिंदे यांनी सादर केलेल्या या अहवालात गटप्रवर्तकाच्या कामकाजात आर्थिक अनियमितता आढळली असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पुन्हा चौकशी करण्याची शिफारस करण्यात आली आहे. गटप्रवर्तक जमेला नदाफ आशा सेविकांना सापत्नभावाची वागणूक देतात. त्यांच्या मर्जीतील सेविकेच्या खात्यावर जादा मोबदला जमा करून आर्थिक गैरव्यवहार करतात. मोबदल्याची चिठ्ठी देत नाहीत, अशा आशयाच्या तक्रारी होत्या. याबाबत आशा सेविका रेखा बगले यांनी थेट काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली होती.

**१० डिसेंबरला सुनावणी**

आशा सेविकेने गटप्रवर्तका विरोधात केलेल्या चौकशीचा अहवाल आपल्या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे. संबंधित तक्रारदार आशा सेविका व गटप्रवर्तक यांची १० डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे. या सुनावणीनंतर योग्य तो निर्णय देण्यात येईल.

**-डॉ. संतोष नवले,**
**जिल्हा आरोग्याधिकारी,**
**जिल्हा परिषद सोलापूर**

# शरदातले चांदणे : नटसम्राट नाटकाची गडद छाप

### नाट्य समीक्षण
### विद्या काळे

**आनंदरंग कला मंच सोलापूर या संस्थेतर्फे शरदातले चांदणे हा नाट्यप्रयोग सादर झाला. या नाटकाचे लेखक व दिग्दर्शक नागेंद्र माणेकरी यांनी केले.**


पडदा उघडताच बागेचा सीन एक म्हातारे गृहस्थ आबा लेखक एका बाकावर.सुरवातीलाच लांबलचक स्वगत सुरू.अंधार. मग बागेत एक वृद्ध बाई सावित्री हार करत असलेल्या.आबा तिच्याशी ओळख करून घेतात. दोघे एकमेकांच्या प्रेमात पडतात. ज्या वयात सोबत हवी असते त्याच वयात दोघांचे एकटेपण. दोघे लग्नाचा निर्णय घेतात.आबांच्या घरी सून मनोरमा याने चिडलेली, आबांचा मुलगा बायको समोर नांगी टाकलेला. पण आबा आणि सावित्री लग्न करतात. त्याच्या ५ वर्षांच्या सुखी संसारात सावित्रीचा पहिल्या लग्नापासून झालेल्या मुलाच्या रूपाने वादळ येतं. शमत. आबाना शरदातले चांदणे कादंबरीसाठी ज्ञानपीठ पुरस्कार मिळतो. कार्यक्रमातच आबांना हृदय विकाराचा झटका येतो. त्याचे प्राणोत्क्रमण होते. इथे प्रयोग संपतो.

नेपथ्य - तारासिंग मरोड यांनी पहिल्या अंकात एकीकडे बाग दुसरीकडे आबांच्या घराचा सीन. घरात मोजक्या गोष्टी. एक टेबल त्यावर काही पुस्तके, ट्रान्जिस्टर इ. कपाळावर टेंगूळ आल्यासारखी घरात मधोमध ठेवलेली आराम खुर्ची, बागेत बाक, दिवा इ.ज्ञानपीठ पारितोषिक समारंभात मोठी मखमलीचे काम असलेली खुर्ची. नेपथ्यात खास काही नाही.

पार्श्व संगीतात ओंकार कोरे, गुरुदत्त जाधव- बासरीचा वापर. लग्नाच्या आठवणी वेळी सनई ठीक. प्रयोगासाठी फार कष्ट घेतले नाहीत. दोन प्रसंगामधील अंधारात काय वाजवायचे कळले नाही की बासरी. काही ठिकाणी संतूरचा वापर. प्रसंगानुरूप संगीताच विचार केला जावा.

रंगभूषा, वेशभूषा ठीक.

प्रकाश योजना - देवदत्त सिद्धम. बागेतील दिवा छान.आजोबा आणि नातू खेळताना प्रेक्षकांच्या डाव्या बाजूला निर्रथक स्पॉट.प्रकाश योजनेत फारसा वाव नव्हता. आबाचे काम करणारे अरविंद माने समजून काम करत होते. पत्नीच्या आठवणीत गुंतून जाणे, सावित्री पाशी लग्नाचा विषय काढताना घुटमळणे, नातवाशी खेळताना लहानाहून लहान होणे. दुसरे लग्न झाल्यावर तरी आबांच्या वेशभूषेत बदल अपेक्षित होता. लांबलचक कंटाळवाणी भाषणे म्हणणे हे धाडसाचे काम चोख पार पाडले. सावित्री - अर्चना सलवारू यांना व्यक्ती रेखा उभी करता आली नाही.पहिल्या अंकात तोंडाला पदर किंवा शालीचा वापर करून लाजल्याचा. दुसऱ्या अंकात घरात दगड येतो. आबाच्या - तुम्हाला कुठे लागले नाही ना?ला उत्तर मानेने होकार तोंडाने नकार या अभिनयाला काय म्हणायचं? मठ्ठ, थंड उभं राहण्याचा अभिनय (?)याचं कोणतं कौतुक करावं? अवघड आहे. नातू अद्वैत - शौर्य कदमनं नाटकात जान आणली. लाघवी, गोड स्वभावाचा सहज अभिनयाने छान उभा केला. शाब्बास छोटे बच्चे. मुलगा प्रकाश - सतीश अंजिखाने . आणि केवळ बडषडणारी सून मनोरमा - खांडेकर कोणताही प्रकाश पाडू शकले नाहीत. घरगडी रामू जोतिबा सावंत ठीक. सावित्री चा पहिल्या लग्नापासून चा मुलगा तरूण - प्रथमेश माणेकरी नी



मस्तवाल,पैशाचा लोभी,प्रसंगी आईवर हात टाकणारा, सुरा उगारणारा, छद्मी व्यक्तीरेखा दमदार पणे उभारण्याचा प्रयत्न केला. बाकी पात्रे ठीक. लेखक - नागेंद्र माणेकरी यांनी हे नाटक लिहिण्याचा का खटाटोप केला? संपूर्ण नाटकातील अनेक प्रसंगावर नटसम्राट नाटकाची गडद छाप आहे. नटसम्राट मधे पहिल्या अंकात सत्काराचे दृष्य इथे दुसऱ्या अंकात. ठमे,भावाने ऐवजी मुलगा असल्याने लांडगोबा एवढेच.भज्याच्या प्रसंगा ऐवजी भेळेचा प्रसंग.स्वगतही तशीच.स्वत: लेखकच दिग्दर्शक असल्याने काटछाट करण्याचा प्रसंगच उद्भवत नाही.अशी नाटके लिहिण्यात कोणता मतलब साध्य होतो न कळे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### बाभुळगाव येथे एल. एल. शिंदे यांची जयंती साजरी

**बार्शी, दि. ५ डिसेंबर-**

तालुक्यातील बाभुळगावच्या आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात संस्थेचे संस्थापक कै. एल. एल. शिंदे यांची जयंती बुधवारी उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी वखारिया विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक शंकर शिंदे यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख वक्ते शंकर शिंदे, संस्थेच्या अध्यक्षा विमलताई शिंदे, सचिव सुहासिनी शिंदे-पाटील, सदस्य श्रीरंगभाऊ शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष शिंदे, मुख्याध्यापक प्रदीप कांदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करुन कै. एल. एल. शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख वक्ते शंकर शिंदे यांनी कै. एल. एल. शिंदे यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचे कौतुक करताना भाऊंनी लोकांच्या टीकेकडे दुर्लक्ष करीत जिद्द, चिकाटी, सचोटी आणि कठोर परिश्रमाने प्रतिष्ठा मिळवली. आयुष्यभर गावच्या विकासासाठी प्रयत्न केल्याचे सांगितले. यावेळी सुहासिनी शिंदे-पाटील यांनी आपल्या पित्याविषयीच्या आठवणी सांगितल्या. प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रदीप कांदे यांनी तर सूत्रसंचालन विजय झिने यांनी केले. धनंजय उकिरडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.




### सोलापूरच्या प्रमिला ठमके यांचे राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत यश

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा योगासन असोसिएशन स्पोर्टस् यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे आयोजिलेल्या ४१ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय योगासन सोलापूरच्या स्पर्धेत प्रमिला ठमके यांनी ६५ ते ७५ या वयोगटातून व्दितीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेमध्ये ठमके या योगसाधना मंडळाच्या माध्यमातून सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेत राज्यभरातून ४०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. ठमके यांनी घवघवीत यश संपादन केल्याने त्यांना पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यांना आरती गोरटे, स्नेहल पेंडसे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच या स्पर्धेमध्ये प्रमिला ठमके यांच्याशिवाय सोलापुरातून जयश्री उमर्जीकर, प्रभा कोडले, दिव्या राका, मोनिका गड्डम, शांता संगा व अशोक बिराजदार यांनी सहभाग नोंदवून विविध वयोगटातून घवघवीत यश संपादन केले.



### कुसमोड येथील यल्लम्मा देवीच्या यात्रेस प्रारंभ

**पिलीव, दि. ५ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील यल्लम्मा देवीच्या यात्रेस परंपरेप्रमाणे रेणुका देवीच्या कुंडाचे दर्शन घेऊन पुजारी व्हनमाने यांनी देवीची आरती करुन गावात जाऊन जोगवा मागून यात्रेस सुरुवात झाली आहे. १० डिसेंबर रोजी जत येथून कुसमोड येथे पायी ज्योत आणली जाणार आहे, ११ डिसेंबर रोजी पालखीचे मंदिराकडे प्रस्थान, १२ डिसेंबर रोजी महानैवेद्य व गंध लिंबाचा कार्यक्रम, १३ डिसेंबर रोजी पालखीची गावातून मिरवणूक व मंदिरासमोर अग्नीहोमाचा कार्यक्रम होणार आहे. तरी या यात्रेसाठी कुसमोड व आसपासच्या परिसरातील नागरिकांनी, भाविक, भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

### नरे मळा, अणदूर येथे आज होणार ओंकारेश्वर नर्मदा शिवलिंगाची स्थापना

**अणदूर, दि. ५ डिसेंबर-**



येथील हजारो भक्तांचे आराध्यदैवत नरे मळा येथील नंदी मंदिरात ओंकारेश्वर नर्मदा शिवलिंगाची प्राण प्रतिष्ठापना होणार आहे. त्यानंतर म हाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असून याचा अणदूर परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन नरे कुटुंबियांनी केले आहे. शुक्रवारी सकाळी १० वाजता अणदूर येथील निलकंठेश्वर मठाचे म ठाधिपती श्रीश्रीषब्र शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते या शिवलिंगाची प्राण प्रतिष्ठापना होणार असून त्यानंतर महाप्रसाद देण्यात येणार आहे. येथील नरे मळ्यामध्ये हे मंदिर असून, विशेषतः महिला भाविकांची मनोकामना पूर्ण करणारे म्हणून प्रसिद्ध असून अनेकांच्या नवसाला पावणारा नंदी म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच मंदिरात शिवलिंगाची प्रतिष्ठापना होणार आहे. याचा लाभ परिसरातील भाविकांनी घ्यावा असे आवाहन नरे कुटुंबाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अक्कलकोटमधील श्वानांवर विषप्रयोग तपास थंडच?

## शहरातील तिसऱ्या डोळ्यांवर साऱ्यांची नजर; मुक्या प्राण्यांबद्दल अक्कलकोटवासीयांची मोठी जागरूकता

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ डिसेंबर-**

अक्कलकोट शहरामध्ये प्रथमच मुक्या प्राण्यांबाबत अक्कलकोटवासीय मोठे जागरूक असल्याचे निदर्शनास येत आहे. श्वानांची संख्या वाढली म्हणून त्यांची विष प्रयोगाद्वारे हत्या करण्याचे षडयंत्र राबविणाऱ्यांचा शोध घेण्याची भीष्म प्रतिज्ञाच प्राणी मित्र संघटना कार्यकर्त्यांनी घेतली आहे. पाल निमल वेल्फेअर फाउंडेशन ही संघटनादेखील आक्रमक झाली आहे. याबाबत दोर्षीवर त्वरित कारवाई न झाल्यास प्राणी मित्र संघटनांसह अक्कलकोटवासीय कॅटल मोर्चासह सदनशिर लढा तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. मुक्या प्राण्यांबाबत अत्यंत आक्रमक संवेदनशीलता व्यक्त होण्याची अक्कलकोटच्या इतिहासातील बहुधा पहिलीच घटना असावी.

अक्कलकोट शहरामध्ये मोठ्या प्रमाणात श्वानांनाच खाद्य पदार्थामध्ये कुठल्यातरी विषारी द्रव्याचा वापर करून विष प्रयोग करून ठार मारल्याची घटना निदर्शनास आली. याबाबत प्राणी मित्र संघटना पाल निमल वेल्फेअर फाउंडेशन यांच्यावतीने कारवाई करण्याबाबत पाठपुरावा चालू आहे. श्वान मालकांनीही पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. मात्र तपासाचे ठोस धागेदोरे व शहरातील सीसीटीव्ही फुटेजवरूनही दोषी संशयितापर्यंत पोलीस पोहचले अथवा नाही याबाबत मोठे गूढ कायम आहे. यामुळे प्राणी मित्र संघटना कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची लाट आहे. दोर्षींना अभय देण्याचे, मोकाट सोडण्याचे काम चालू असल्याची भावना प्राणी मित्र संघटना कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. घटनेतील सत्य जोपर्यंत स्पष्ट होत नाही, दोषीवर कायदेशीर कारवाई जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत प्राणी मित्र संघटना लढा चालूच ठेवणार असल्याचा इशारा व्यक्त होत आहे.

अक्कलकोट शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात श्वानांची विष प्रयोगाद्वारे हत्याची घटना नगर पालिकेने दोषीवर पांघरूण घालण्यासाठी गंभिरतेने घेतली नाही. या घटनेमध्ये विषारी द्रव्याची खरेदीपासून ते अन्नपदार्थामध्ये विषारी द्रव्य मिसळून श्वानांनाच ते खायला टाकण्यापर्यंतची प्रक्रिया एका व्यक्तीची नाही. यामुळे अनेकांचा सहभाग आहे. ही प्रक्रिया कुणाच्या आदेशाने अंमलात आणली. शहरातील सीसीटीव्ही फुटेजबाबत पोलीस गंभीरतेने कारवाई व तपासाची चक्रे गतीने लावण्यात अडथळा कोणाचा आहे. तपासाची चक्रे गतीने लावण्यात ब्रेक कुणाचा कार्यान्वित आहे, याची माहिती प्राणी मित्र संघटनाच घेत आहेत. सीसीटीव्ही फुटेजही उपलब्ध करून देण्याबाबत पोलिसांची कामेही प्राणी मित्र संघटना कार्यकर्त्यांना सांगितली जात असल्याची माहिती प्राणी मित्र संघटना कार्यकर्त्यांनी दिली आहे. यामुळे या घटनेचा तपास गंभिरतेने निपक्ष होईल की नाही याबाबत प्राणी मित्र संघटना कार्यकर्त्यांमध्ये संशय आहे. यामुळे याविरोधात सनदशिर मार्गाने आंदोलन तीव्र करण्याचा मनोदय व्यक्त होताना दिसत आहे. मुक्या प्राण्यासाठी अक्कलकोटवासीयांची संवेदना प्रथमच मोठ्या प्रकर्षाने व्यक्त होण्याची बहुधा ही पहिलीच घटना आहे, असे मत व्यक्त होत आहे. पोलीसही घटना किती गंभीरतेने घेतात, तपास किती गतीने लावतात, पोलिसांची मुक्या प्राण्यांबाबतची संवेदनाही या घटनेने अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.



### प्राणी मित्रांचा संताप अनावर

अक्कलकोट शहरात श्वानांच्या गूढ आणि संशयास्पद मृत्यूचे प्रकरण चांगलेच तापले आहे. शहरातील प्राणी मित्र संघटनेचे पदाधिकारी या प्रकरणी आक्रमक झाले आहेत. निष्पाप जीवांना विषारी औषध घालून मारण्यात आल्याची प्राथमिक माहिती प्राणी मित्रांनी दिली असून मरण पावलेल्या कुत्र्यांचे शवविच्छेदन करून ते तपासणीसाठी प्रयोगशाळेला पाठविण्यात आले आहे. अक्कलकोट शहरातील कुत्र्यांच्या मृत्यूप्रकरणाची दखलही पाल या संघटनेने घेतली असून याप्रकरणी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### माहिती देणाऱ्यास पाल संघटनेकडून २५ हजारांचे बक्षीस जाहीर




अक्कलकोट शहरात २९ व ३० नोव्हेंबर रोजी श्वानांना (कुत्र्यांना) विषारी औषध देऊन मारण्यात आले होते. यामध्ये अनेक कुत्र्यांना विषारी औषध देऊन मारण्यात आल्याचे नागरिक व प्राणी मित्रांच्या निदर्शनास आले आहे. या प्रकरणाचे गूढ वाढत असून या श्वानांच्या वेदनादायी मृत्यूची दखल पाल संघटनेकडून घेण्यात आली. या श्वानांच्या मृत्यूप्रकरणाची माहिती देणाऱ्यास पंचवीस हजार रुपयांचे बक्षीस देण्याचे पाल संघटनेने जाहीर केले आहे.

### नाव गुपित ठेवणार

या प्रकरणातील दोषींवर कारवाईसाठी पाल संघटनेने अधिक माहिती देणाऱ्यास पंचवीस हजार रुपयांचे बक्षीस देण्याचे जाहीर केले आहे. माहिती देणाऱ्यांचे नाव हे गुपित ठेवण्यात येणार आहे. यामुळे अनेक कुत्र्यांच्या संशयास्पद मृत्यूचा छडा लागण्यास मदत होणार आहे असे प्राणी मित्रांनी सांगितले.

## मरवडेत एका संशयित तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ५ डिसेंबर-**

मरवडे येथील आंबेडकर चौकात असलेल्या लोकवस्तीमध्ये मध्यरात्री संशयीतरित्या अंधारात गुन्हा करण्याच्या उद्देशाने दबा धरुन बसल्याप्रकरणी आदित्य हरिभाऊ राऊत (वय २७, रा. चेळेकर गल्ली, मंगळवेढा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यातील आरोपी आदित्य राऊत हा ३ डिसेंबर रोजी रात्री १२ च्या दरम्यान मरवडे येथील आंबेडकर चौकातील लोकवस्तीमध्ये समाधान ऐवळे यांच्या घराजवळ आरोपीने सूर्यास्त ते सूर्योदयादरम्यान संशयीतरित्या अंधारात आपले अस्तित्व लपवून मालाविषयी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने दबा धरुन बसलेल्या परिस्थितीत मिळून आल्याची फिर्याद पोलीस अंमलदार महेश माने यांनी दिल्यावर सदर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याचा अधिक तपास बोराळे बीटचे पोलीस हवालदार मनोज खंडागळे हे करीत आहेत.

## शाह कन्या प्रशालेत माजी विद्यार्थिनी मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ डिसेंबर-**

सन १९६६-६७ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा शाह कन्या प्रशालेत ४ डिसेंबर रोजी पार पडला. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका शुभदा जोशी होत्या.

पुणे, ठाणे, नगर, परभणी व बार्शी या ठिकाणाहून आलेल्या माजी विद्यार्थिनींचे स्वागत एनसीसी पथकातील विद्यार्थिनीच्या कवायतीने झाले. ५७ वर्षांनंतर शाळेच्या आवारात आल्यानंतर प्रत्येक विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. काहींना आंनदाश्रू आवरणे कठीण झाले होते. प्रास्ताविक आय्युब शेख यांनी केले. वैष्णवी हातोळकर यांनी सर्व माजी विद्यार्थिनींचा परिचय करुन दिला. सर्व माजी विद्यार्थिनींचे स्वागत प्रशालेतील शिक्षकांच्या हस्ते बुके देऊन करण्यात आले.



यावेळी माजी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतामधून शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला व शाळेतील संस्कारामुळे जीवनात यशस्वी झाल्याचे सांगितले. तसेच त्या काळातील सर्व शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मंदा वैद्य यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने या कार्यक्रमास लीला बंग, पुष्पा बंग, मंगल कुलकर्णी, पौर्णिमा संघवी, उषा ढाळे, मंदा काटकर, रजनी कुलकर्णी, उषा बेदरकर, मंदा बरबडे, श्यामला पाथरुडकर, विदुला कुलकर्णी, आशा विणेकर, शैला देशमुख, चित्रा वालवडकर, हेमलता कायत, लीला कुलकर्णी, नलिनी देसाई, कीर्ती देसाई, धनलक्ष्मी शहा या माजी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. सर्वांनी शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले व प्रशालेस २५ हजार रुपये देणगी दिली. सूत्रसंचालन संदेश घाडगे यांनी केले. यावेळी संस्था सचिव चिन्मय वालवडकर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिसेवस्ती शाळेस सर्वसाधारण विजेतेपद



### नातेपुते केंद्राची क्रीडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ५ डिसेंबर-**

जिल्हा परिषदेच्या नातेपुते केंद्राच्या क्रीडा स्पर्धेमध्ये लहान व मोठ्या गटात कबड्डी, खो-खो व लंगडी स्पर्धेत दर्जेदार कामगिरी केल्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिसेवस्ती केंद्र नातेपुते या शाळेला सर्वसाधारण विजेतेपद मिळाले.

या स्पर्धेमध्ये नातेपुते केंद्रातील चौदा शाळांचा सहभाग होता. केंद्रप्रमुख प्रशांत सरुडकर यांचे हस्ते विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. विजेत्यांचा सत्कार नातेपुते शाळेचे केंद्रप्रमुख प्रशांत सरोडकर यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी उपक्रमशील शिक्षक धुंडिराज भिडे, मुख्याध्यापक सूर्यकांत रायचूरे, मुख्याध्यापक पोपट पालवे यांनी परिश्रम घेतले.

**स्पर्धेचा अंतिम निकाल (प्रथम तीन) : लहान गट मुले-** १०० मी धावणे : रुद्र सागर लांडगे (मांडवे), अर्जुन राजाराम जाधव (पिसेवस्ती), सार्थक धनंजय बंडगर (पांढरेवस्ती).

**मुली-** शिवानी हनुमंत ठोंबरे (पिसेवस्ती), श्रेया दत्तू पालवे (पाठकवस्ती), नम्रता सचिन कर्णे (बरडकरवस्ती). २०० मी धावणे : मुले - आदर्श आबा सरगर (पिसेवस्ती), विराज देवबा लोखंडे (मांडवे, करण विजय काळे (पिसेवस्ती). मुली- ऋतुजा पोपट कचरे (पिसेवस्ती), अर्पिता दादा रुपनवार (पाठक वस्ती), कार्तिकी भुजाबा लांडगे (मांडवे). बुद्धीबळ : कृष्णा अज्ञान सरगर (पिसेवस्ती), शौर्य जाधव (पाठकवस्ती).

### संघिक विजयी व उपविजयी शाळा

**लहान गट मुले-** खो-खो : पिसेवस्ती, पाठकवस्ती. लंगडी : पिसेवस्ती, पाठकवस्ती. कबड्डी : पिसेवस्ती, पाठकवस्ती. **मुली -** खो-खो : पिसेवस्ती, पाठकवस्ती. लंगडी : पिसेवस्ती, साळुंखेवस्ती. कबड्डी : पिसेवस्ती, पाठकवस्ती. **मोठा गट मुले-** खो खो : पिसेवस्ती, पाठकवस्ती. लंगडी : पिसेवस्ती, बोराटेवस्ती. कबड्डी : पिसे वस्ती, पाठकवस्ती. **मुली-** खो खोः पिसेवस्ती, मांडवे. लंगडी : पिसेवस्तती, पाठकवस्ती कबड्डी : पाठकवस्ती, पिसेवस्ती.



## कुसमोड ग्रामपंचायतीची ग्रामसभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ५ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड ग्रामपंचायतीची ग्रामसभा सरपंच पुरुषोत्तम धायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयांवर चर्चा होऊन खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी विविध विकासकामांचा आढावा, रोजगार हमी योजनेंतर्गत सुरु असलेली कामे व पुढील आराखडा तयार करणे, प्रधानमंत्री घरकुल योजना, अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना यासह विविध विषयांवर व ग्रामस्थांच्या विविध अडीअडचणी यावर चर्चा होत ही ग्रामसभा संपन्न झाली. या ग्रामसभेस उपसरपंच स्वाती मदने, माजी सरपंच तुषार लवटे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब धायगुडे, शहाजी लेंगरे यासह माजी उपसरपंच संजय पाटील, पोलीस पाटील विकास सरगर, रामचंद्र पवार, ग्रामरोजगार सेवक अशोक राजगे, सतिश व्हनमाने, अनिल धायगुडे, देवा धायगुडे, लक्ष्मण पवार, अर्जुन वाघ, कृषी सहाय्यक सुधीर बुगड, शहाजी वाघ, गणेश लेंगरे, नाथा मदने, बंडू बोडरे, उमाजी बोडरे, देवानंद चव्हाण, अंकुश लेंगरे उपस्थित होते. ग्रामविकास अधिकारी नवले यांनी आभार मानले.

# शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित

## महसूल, कृषी विभागाच्या अहवालाचा दणका; शेतकऱ्यांना आर्थिक फटका

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ५ डिसेंबर-**

खरीप हंगामातील ऑगष्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या संततधार पावसामुळे मंद्रुप तहसील कार्यालयांतर्गत शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांनी महसूल प्रशासनाकडे तक्रार केल्यानंतर अनेक शेतकऱ्यांचा पंचनामा करण्यात आला. मात्र महसूल प्रशासनाने संततधार पाऊस झाला नसून नुकसान झाले नसल्याचे अहवाल दिल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपासून वंचित राहण्याची वेळ आली आहे.

गेल्या वर्षी कमी पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळाले. यावर्षी खरीप हंगामात समाधानकारक पाऊस झाला. मात्र पुष्य नक्षत्राच्या संततधार व मघा नक्षत्राच्या जोरदार पावसामुळे उडीद, मूग, सोयाबीन, बाजरी व तूर पिकांचे नुकसान झाले. यावेळी पिकांमध्ये पावसाचे पाणी थांबल्याने पिके कुजून पिकांचे नुकसान झाले. यावेळी शेतकऱ्यांनी महसूल प्रशासनाकडे नुकसानभरपाईसाठी तक्रार केली. कृषी विभागाच्या कृषी सहाय्यकांनी अनेक गावात नुकसान पिकांचा पंचनामा केला.

मात्र मंद्रुप अप्पर तहसीलअंतर्गत तलाठ्यांनी पंचनामा न करता पाऊस झाला नसल्याचे प्रशासनास कळविले. त्यामुळे मंद्रुप अप्पर तहसील कार्यालयाकडून नुकसान अहवाल निरंक पाठविण्यात आला. कृषी विभागाकडूनही पिकांचे नुकसान दाखविण्यात आले नाही. त्यामुळे मंद्रुप अप्पर तहसील व तालुका कृषी कार्यालयहच्या चुकीच्या अहवालामुळे सीना-भीमा खोऱ्यातील ३० गावांतील शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहिले आहेत. यामुळे उडीद, मूग, बाजरी, सोयाबीन व तूर उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे.



### नुकसानभरपाईसाठी पाठपुरावा करणार

मंद्रुप तहसील कार्यालयांतर्गत गावातील शेतकऱ्यांचे संततधार व अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. प्रशासनाच्या अहवालामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असल्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करून नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

**- सचिन व्हनमाने, कार्याध्यक्ष, काँग्रेस, दक्षिण सोलापूर**

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## देवेंद्र फडणवीस यांच्या निवडीबद्दल बार्शीत भाजपा मिरगणे समर्थकांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ डिसेंबर**

भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ गटनेतेपदी तसेच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवडीबद्दल भाजपाचे राज्य कार्यकारिणी सदस्य व गृहनिर्माण विभागाचे सल्लागार राजेंद्र मिरगणे यांच्या समर्थकांनी बार्शी शहर व तालुक्यात विजयोत्सव साजरा करत आनंदाने जल्लोष केला.

यावेळी बार्शी शहरातील मिरगणे यांच्या कार्यालयासमोर तसेच शहर व ग्रामीण भागात वेगवेगळ्या ठिकाणी गुलाल उधळून फटाक्यांची आतिषबाजी करत सर्वांना मिठाई वाटून जल्लोष करण्यात आला. शहरांमध्ये ग्रामीण भागात फडणवीस यांना निवडीबद्दल शुभेच्छा देणारे फलक लावण्यात आले. यावेळी फडणवीस यांना शुभेच्छा देणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी बाजार समितीचे माजी संचालक कुणाल घोलप, भाजपाचे माजी शहराध्यक्ष अश्विन गाढवे,, सूर्यकांत देशमुख, रामेश्वर स्वामी, धामणगाव विविध सेवा सहकारी कार्यकारी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग पाटील, बाळासाहेब पवार, रवींद्र सांगोळे, शरीफ शेख, अविनाश शिंदे, आदी सहभागी झाले होते.



## संक्षिप्त वृत्त...



### गणपती फार्मसीमध्ये डॉ. शेंडगे यांचे औषधनिर्मिती क्षेत्रावर मार्गदर्शन

**टेंभुर्णी, दि. ५ डिसेंबर-**

अकोले खुर्द, टेंभुर्णी येथील श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च येथे विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती क्षेत्राबद्दल अधिक माहिती देण्यासाठी मार्स मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, टेंभुर्णी येथील प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. लालासाहेब शेंडगे यांचे आधुनिक औषधनिर्मिती आणि आरोग्य सेवा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानादरम्यान डॉ. शेंडगे यांनी औषधनिर्मितीच्या क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान आणि औषधांच्या प्रभावी वापराबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी आरोग्यसेवेत फार्मासिस्टच्या भूमिकेचे महत्त्व विशद केले. तसेच औषधनिर्माणशास्त्र शाखेमध्ये करिअरच्या संधी, क्षेत्रातील आव्हाने, आणि औषधनिर्मिती व्यवसायातील भविष्यातील संधी यासंबंधी सखोल मार्गदर्शन केले. त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरले. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. आर. डी. बेंद्गुडे, अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, प्राचार्या डॉ. आर. आर. बेंद्गुडे, प्रा. नामदेव शिंदे, प्रा. शिवराज ढगे, प्रा. धनश्री कारंडे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ.प्रशांत मिसाळ यांनी केले. या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. हे व्याख्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरले असून सदर कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून प्रा. कल्याणी माने यांनी काम केले.

### आगामी सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या : शिवनिंगप्पा वंगे

**अक्कलकोट, दि. ५ डिसेंबर-**

अक्कलकोट विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीन निकालावर संशय निर्माण झाल्याने पुन्हा ताबोडतोब फेरनिवडणूक बॅलेट पेपर घ्या.अन्यथा जोपर्यंत बॅलेट पेपरवर निवडणुका घेणार नाहीत तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांसह अन्य निवडणूक लढवणार नाही. तसेच यापुढे सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकणार असल्याचे जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अपक्ष उमेदवार शिवनिंगप्पा वंगे यांनी इशारा दिल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाले आहे. अक्कलकोट विधानसभा निवडणुकीत शिवनिंगप्पा वंगे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवलेले आहे. त्यांनी दिलेला निवेदनात म्हटले आहे की, मला अनेक बूथवर बहुतांश ठिकाणी एक मत आढळून आलेले आहे. याचा अर्थ त्या बुथवर मला मतदान झालेले आहेत. ईव्हीएम मशीन यंत्रात मात्र मत आढळून आलेले नाही. यामुळे ईव्हीएम मशीनवर संशय निर्माण झाला असल्याने त्याची तपासणी करण्याची मागणी केली आहे. लोकशाहीत अशा गंभीर प्रकारात त्रुटी असल्यास या पुढे निवडणुका लढवणार कसे? यामुळे लोकशाही धोक्यात येणार असल्याने निप:क्षपातीपणे निवडणुका होणे गरजेचं असल्याने बॅलेट पेपरवर फेर निवडणुका घ्याव्यात. याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी योग्य ते निर्णय घेऊन जनतेचा संभ्रम दूर करावेत अन्यथा येत्या निवडणुकांवर बहिष्कार घालण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे उमेदवार शिवनिंगप्पा वंगे यांनी दिला आहे.

### अक्कलकोटमध्ये अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल

**अक्कलकोट, दि ३ डिसेंबर**

भा. न्या. सहिंता कलम ३२५, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ प्रमाणे अक्कलकोट उत्तर पोलिसात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत उत्तर पोलीसात महेश मनोहर धोंगडे, (वय-३२ वर्षे, व्यवसाय शेती, रा. बुधवार पेठ, अक्कलकोट ) यांनी अज्ञाता विरोधात तक्रार दाखल केली आहे. अज्ञात इसमांनी अज्ञात विषारी औषध फिर्यादीने पाळलेल्या पाळीव श्वानास खायला दिल्याने विषबाधा झाल्याने कुत्रा मरण पावला बाबत किर्याद दाखल केली आहे. घटना २ डिसेंबर रोजी रात्री शहरातील नगरपालिका कार्यालय समोर, अक्कलकोट येथे घडली. फिर्यादी पाळलेल्या कुत्र्यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन काहीतरी विषारी पदार्थ खाण्यास दिलेने त्यात कुत्र्यास विषबाधा होवुन फिर्यादी पाळलेले तपकिरी रंगाचा कुत्रा मयत झाला आहे, म्हणून फिर्यादीच्या कुत्र्यास खाऊ घालणारे अज्ञात व्यक्ती विरुध्द तक्रार दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास तपासिक अंमलदार पोहेकॉं टेंगले करत आहेत.




### आझाद युवा फाउंडेशनच्या उपाध्यक्षपदी समीर जहागीरदार

**टेंभुर्णी, दि. ५ डिसेंबर-**

माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथील आझाद युवा फाऊंडेशनच्या उपाध्यक्षपदी समीर जहागीरदार यांची निवड करण्यात आली. एकत्र येऊन आपल्याला अनेक गोरगरीबांना मदत तसेच अडीअडचणी सोडविण्यासाठी सोपे जाते. फाउंडेशनच्या माध्यमातून अनेकांना मदत केली आहे. यावेळी अध्यक्ष अजीज शेख, सचिव इम्तियाज सय्यद, माजी सरपंच दादाभाई पटेल, इम्रान बागवान, डॉ. शहाजान काझी, आसिफ शेख, अस्लम शेख, फारुख सय्यद, फारुख देशमुख, इर्शाद देशमुख, रब्बेसलाम शेख आदी उपस्थित होते.



अकलूज : राजा शिवछत्रपती या महानाट्यात सहभागी झालेले कलाकार चक्क आपली सेल्फी काढून घेण्यात मग्न आहेत. या महानाट्याला राज्यभरातील शिवप्रेमी रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## दत्त जयंतीनिमित्त वटवृक्ष मंदिरात धार्मिक कार्यक्रम

### १४ डिसेंबरला संपन्न होणार दत्त जन्म सोहळा; १५ रोजी पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ डिसेंबर-**

दत्त अवतारी श्री स्वामी समर्थांच्या मूळस्थानी म्हणजेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात दत्त जयंती उत्सव शनिवारी १४ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येत आहे. दत्त अवतारी श्री वटवृक्ष स्वामी समर्थांच्या वटवृक्ष मंदिरातील दत्त जयंती उत्सवास अनन्य साधारण असे महत्त्व असल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली.

दत्त जयंतीनिमित्त १४ ते १५ डिसेंबरअखेर दत्त जयंती उत्सव व सलग शासकीय सुट्ट्या यामुळे मंदिरात स्वामींच्या दर्शनाकरिता मोठ्या प्रमाणात गर्दी होणार आहे. त्यामुळे सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होण्याकरिता स्वामी भक्तांचे नित्यनियमाने होणारे अभिषेक या कालावधीत होणार नाहीत. जे स्वामी भक्त अभिषेकाची पावती करतील त्यांना खडीसाखर प्रसाद, स्वामींचा अंगारा प्रसाद मिळेल अशी माहिती पुरोहित मंदार महाराज पुजारी यांनी दिली. भांडुप, घाटकोपर-मुंबई, तळेहिप्परगा, भातंबरे, कोल्हापूर, सातारा, खर्डी, गावखडी, येथून दिंडी व पालख्या, सोबत पायी येणाऱ्या स्वामी भक्तांच्या निवास व भोजन प्रसादाची सोय मैंदर्गी-गाणगापूर रस्त्यावरील देवस्थानच्या भक्त निवासात करण्यात आली आहे.

वटवृक्ष मंदिरातील ज्योतिबा मंडपात दत्तजयंती दिवशी येथील सत्संग महिला भजनी मंडळाच्या वतीने देवस्थानच्या विश्वस्ता उज्ज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्याखाली दुपारी ४ ते ५.३० या वेळेत दत्त जन्म आख्यान, वाचन व भजन करुन सायंकाळी ६ वाजता अनेक स्वामी भक्तांच्या उपस्थितीत गुलाल पुष्प वाहून श्री दत्त जन्म सोहळा व पाळणा कार्यक्रम होईल.

याप्रसंगी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, श्रीशैल गवंडी, संजय पवार, विपुल जाधव उपस्थित होते.



#### पालखी सोहळ्याचा मार्ग

सायंकाळी ५ ते रात्री ९.३० या वेळेत शहरातून श्रींचा पालखी सोहळ्याची मिरवणूक भजन, दिंड्या व वाद्यांसह पार पडणार आहे. पालखी मार्ग वटवृक्ष मंदिरातून फत्तेसिंह चौक, मेन रोड, कापड बाजार, कारंजा चौक, बुधवार पेठमार्गे समाधी मठ, समाधी मठात भजन सोहळा संपन्न होऊन समाधी मठ, बुधवार पेठमार्गे कारंजा चौक, दक्षिण पोलीस ठाण्यासमोरून मौलाली गल्ली, गुरु मंदिरमार्गे सुभाष गल्ली, भारत गल्ली, देशमुख गल्लीमार्गे वटवृक्ष मंदिर असा असेल.

#### भाविकांसाठी महाप्रसादाची सोय

रविवारी १५ डिसेंबर रोजी दुपारी ११.३० च्या नैवेद्य, आरतीनंतर मंदिर परिसरात प्रसाद वाटप करण्यात येईल. देवस्थानच्या मैंदर्गी- गाणगापूर रोडवरील भक्त निवास भोजन कक्ष येथे सर्व स्वामी भक्तांना भोजन महाप्रसाद दुपारी १२ ते ३ या वेळेत देण्यात येणार आहे. श्रींची पालखी मिरवणूक रात्री ९.३० वाजता मंदिरात आल्यानंतर देवस्थानच्या वतीने शिरा प्रसाद वाटप होऊन श्री दत्त जयंती उत्सवाचा सांगता समारंभ होईल.

## अमर शेख यांच्याकडून महाराष्ट्राची अस्मिता जपण्याचे काम

### पानीपतकार विश्वास पाटील : बार्शीत लोकशाहीर अमर शेख स्मृती साहित्य पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ डिसेंबर**

महाराष्ट्राची अस्मिता जपण्याचे काम संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात लोकशाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे, गव्हाणकर यांच्यासारख्या राष्ट्रभक्त कलावंतांनी केले. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरुंसमोर अखंडित ३० तास हात रक्तबंबळ होईपर्यंत डफ वाजवत मराठी बाणा जपणाऱ्या या शाहिरांचे कार्य दुर्लक्षित झाले आहे, अशी खंत कादंबरीकार विश्वास पाटील यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा बार्शीच्या वतीने आयोजित लोकशाहीर अमर शेख स्मृती साहित्य पुरस्कार प्रदान समारंभात ते ते बोलत होते. यावेळी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रकाश पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविकामध्ये मसापचे बार्शी शाखा अध्यक्ष पा. न. निपाणीकर यांनी सतरा वर्षे पुरस्कार देण्याची परंपरा जपली असून नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन देण्याचे काम या पुरस्कारांमुळे झाल्याचे सांगितले. यावेळी पालघर येथील सुनील जाधव यांच्या मायावी या कथासंग्रहास तसेच अमरावती येथील विशाल मोहोड यांचा कीड या कादंबरीस त्याचप्रमाणे सातारा येथील डॉ. आदिती काळमेख यांच्या दिडदा दिडदा, त्याचबरोबर मालेगाव येथील इंद्रजीत पाटील यांच्या कळ ओठी आली पोटी, तसेच बार्शी येथील रामचंद्र इकारे यांच्या माणुसकीचं आभाळ या काव्यसंग्रहांना साहित्य पुरस्काराने पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी पाटील म्हणाले, शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते असलेल्या वडिलांनी आयुष्यात उच्च ध्येय ठेवायला शिकवले. पाटील उसाच्या, कुस्त्याच्या, तमाशाच्या फडासाठी ओळखले जात असले तरी मी शब्दांचा फड आणि गुऱ्हाळ चालविणारा आहे. सनदी अधिकारी झालो तरी वाचन आणि लेखनाची आवड होती. त्यातून कादंबऱ्या साकारल्या. मराठ्यांचा इतिहास मांडायची संधी पानिपतमधून मिळाली. पांगिरा आणि झाडाझडतीमधून सामाजिक प्रश्न हाताळले. चंद्रमुखीमधून तमाशातील कलावतीचे आयुष्य चितारले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जीवनपट मांडण्याचे काम महानायकमधून केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्र कार्यामधून घेतलेल्या प्रेरणा आणि खरा इतिहास लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम संभाजी या कादंबरीच्या माध्यमातून केले. रणांगण हे नाटक लिहिले. आता छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाचा धांडोळा घेण्याचे काम करतो आहे. शहाजी महाराजांचे कार्य महाराष्ट्रासमोर आलेले नाही. औरंगजेबाच्या आजोबा जहांगीर यांच्या विरोधात लाखाची फौज घेऊन लढणाऱ्या तर शहाजहानच्या विरोधात चारशे वर्षांपूर्वी भातवडी येथे युद्ध करणाऱ्या आणि गनिमी काव्याची युद्धनीती वापरणाऱ्या शहाजी महाराजांची समाधी मोडकळीस आली आहे. त्याचा जीर्णोद्धार होण्याची गरज आहे. आज-काल महापुरुष आणि समाजाच्या चळवळीवर जगणाऱ्यांची संख्या वाढली आहे. पण त्यांच्याबद्दल खरा अभिमान बाळगून त्यांच्या स्मृती जपण्याचे काम होत नाही, अशी टीका पाटील यांनी केली. यावेळी संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, तसेच परीक्षक डॉ. रविकांत शिंदे, डॉ. रविराज फुरडे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. चंद्रकांत मोरे, ॲड. अनिल पाटील, हभप विलास जगदाळे, प्रकाश महामुनी, शारदा पानगावकर, प्रा. किरण गाढवे, सुमन चंद्रशेखर, प्रकाश गव्हाणे, कल्याण घळके, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, गिरीश सोनार, दिलीप कल्याणी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन नीता देव यांनी केले तर आभार बी. आर. देशमुख यांनी मानले.



#### कर्मवीरांच्या भूमीत साहित्य वारसा

यावेळी अध्यक्षीय समारोपामध्ये प्रकाश पाटील यांनी श्रोत्यांना चांगले वक्ते व लेखकाला चांगले वाचक दुर्मिळ झाल्याची खंत व्यक्त करत कर्मवीरांच्या भूमीत विद्यार्थ्यांना साहित्य वारसा अवगत करुन देण्याचे काम होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

#### वाचन संस्कृती लयाला जात आहे : पाटील

मराठी भाषेतूनच शिक्षण घेण्याकडे आता कल वाढला आहे. पण वाचन संस्कृती लयाला जात आहे. मसापसारख्या चळवळी टिकल्या पाहिजेत. नवोदित लेखकांना व्यासपीठ मिळाले पाहिजे. साहित्य पुरस्कारांची रक्कम वाढवली पाहिजे, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

## माधवबाग बार्शी शाखेतर्फे मोफत मधुमेह कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ डिसेंबर-**

येथील माधवबाग मल्टीडिसिप्लिनरी कार्डियाक केअर क्लिनिक्स अँड हॉस्पिटल यांच्यावतीने मधुमेहग्रस्तांसाठी रविवार दि. ८ डिसेंबर रोजी बार्शी-कुर्डूवाडी रस्त्यावरील हॉटेल निकिता येथे दुपारी चार वाजता मधुमेह कार्यशाळा होणार असल्याचे माधवबाग हॉस्पिटल बार्शीचे संचालक डॉ. पवन कोळी व डॉ. क्रांती कोळी यांनी सासंगितले.

या कार्यशाळेत Hb1c या टेस्टची अल्प दरात तपासणी केली जाणार आहे. या कार्यशाळेसाठी मर्यादित रुग्णांना प्रवेश दिला जाणार असून पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे, असे संयोजकांनी सांगितले आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी या नंबर वर संपर्क साधावा ७२७६५१९१११, ८६०५१९१११० ही कार्यशाळा रविवार दि. ८ डिसेंबर २४ रोजी दुपारी चार वाजता हॉटेल निकिता कॉन्फरन्स हॉल कुर्डवाडी रोड बार्शी या ठिकाणी होणार आहे. तरी वरील नंबरशी त्वरित संपर्क साधा.

## साक्षरता वर्गांना शिक्षण संचालकांसह अधिकारी देणार अचानक भेट

### शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांचा आदेश; वर्ग एक, दोनच्या अधिकाऱ्यांचा असणार सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. ५ डिसेंबर-**

राज्यस्तरावरून साक्षरता वर्गाची पाहणी करण्यासाठी शिक्षण संचालनालयातील अधिकारी हे क्षेत्रीय कार्यालय, जिल्हा, तालुका आणि निवडक शाळांना चालू डिसेंबर महिन्यात भेटी देऊन आढावा घेणार आहेत. याबाबत योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

त्या अनुषंगाने कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणीसाठी ऑनलाईन पद्धतीने बैठका घेतल्या जात आहे. या बैठकांमधून दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा, तालुका व शाळा स्तरावरील झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला घेतला जाईल. केंद्र पुरस्कृत उल्लास नव-भारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबतच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा, तालुका व शाळा स्तरावर केलेली पूर्वतयारीचा, उल्लास मेळावा पूर्वतयारी व कार्यवाहीचा, तसेच शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी योजना संचालनालयातील अधिकारी जिल्हा, तालुका कार्यालयांना आणि निवडक शाळांना भेटी देणार आहेत.

भेटीदरम्यान संबंधित अधिकारी (योजना) कार्यालय, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, शाळा तसेच उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत सुरू असलेले वर्गांना भेटी देऊन असाक्षर व स्वयंसेवकांच्याशी चर्चा करणार आहेत. तसेच शाळांमधून विविध शासकीय योजनांची सुरू असलेल्या अंमलबजावणीची पाहणी करून त्याची माहिती घेणार आहेत.

विभागीय शिक्षण उपसंचालकांनी संचालनालय स्तरावरून भेटी देण्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांसोबत जिल्ह्या कार्यालयातील वर्ग-१ किंवा वर्ग-२ दर्जाचे अधिकारी दौऱ्यात पूर्ण वेळ उपलब्ध असणार आहेत, असे प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान शिक्षण सहसंचालक राजेश क्षीरसागर यांनी मंगळवारी राज्यातील सर्व विभागातील संचालक ते केंद्रप्रमुख या सर्व क्षेत्रीय स्तरावरील उल्लास कार्यक्रमाचा आढावा घेतला.



#### याचा घेणार आढावा

प्रत्येकस्तरावर देण्यात आलेले नोंदणीचे उद्दिष्ट, असाक्षर आणि स्वयंसेवक जोडणी, साक्षरता वर्गांची अध्ययन-अध्यापन विषयक स्थिती, स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, मागील वर्षीचे अपूर्ण कामकाज, जिल्हा व तालुकास्तरावरीय समित्यांच्या बैठका, उल्लास कार्यक्रमाच्या प्रचार प्रसारासाठी सार्वजनिक उत्सवातून व अन्यप्रकारे केलेले प्रयत्न, येत्या फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या परीक्षेची पूर्वतयारी, समाजातील अधिकाधिक घटकांचा या योजनेच्या यशस्वीतेसाठी मिळणारा सक्रिय सहभाग अशा विविध पैलूंचा यानिमित्ताने आढावा होणार आहे. शिक्षण संचालकांसह राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून होणारे या झाडाझडतीमुळे जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दूषित पाण्यामुळे नळदुर्गकरांचे आरोग्य धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ डिसेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या गलथान कारभारामुळे शहरातील व्यासनगर येथे दुषित पाणी पुरवठा करण्यात आला असुन यामुळे येथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

नळदुर्ग शहरात नगरपालिकेच्या वतीने नागरीकांना नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र पाणीपुरवठा विभागाच्या गलथान कारभारामुळे व्यासनगर येथील नागरीकांना गाळ मिश्रित तसेच पिवळसर रंगाचा पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

बोरी धरणातुन पाणी जलशुद्धीकरण केंद्रात आल्यानंतर याठिकाणी पाणी शुद्ध करण्यासाठी ब्लिचिंग पावडर तसेच तुरटीचा वापर केला जातो.



पाणी शुद्ध करण्यासाठी ब्लिचिंग पावडर आणि तुरटीचा योग्य प्रमाणात वापर केला तरच पाणी शुद्ध होते. मात्र ब्लिचिंग पावडर आणि तुरटीचा वापर कमी करण्यात आला तर अशा प्रकारचे गाळ मिश्रित, गढुळ व पिवळसर रंगाचे पाणी नळाला येते.

याची चौकशी करून यामध्ये जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी नागरीकांमधुन होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### ईव्हीएम विरोधात परंड्यात स्वाक्षरी मोहीम

**परंडा, दि.५ डिसेंबर -**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभरात ईव्हीएम विरोधी जनआंदोलनाची हाक देण्यात आली आहे. स्वाक्षरी मोहिमेपासून सुरुवात करून टप्या टप्प्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी पुणे येथे झालेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत राज्यात ईव्हीएम विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे. २४३ परंडा विधानसभा मतदारसंघा मध्ये वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परंडा शहरातील किल्लारोड मंडईपेठ येथून स्वाक्षरी मोहीम राबविण्यास सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव धनंजय सोनटक्के, परंडा शहराध्यक्ष किरण बनसोडे, महासचिव राहुल पवार, विलास जाधव, रणधीर मिसाळ, प्रफुल चौतमहाल, अरुण सोनवणे, रणवीर निकाळजे, फिरोज तांबाळी, अरीफ पठाण, धनंजय चौधरी, भाऊसाहेब सुभाष टकले आदी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



### तेर येथे सामान्य ज्ञान स्पर्धेचे उद्घाटन

**तेर, दि.५ डिसेंबर -**

सामान्य ज्ञान स्पर्धा काळाची गरज आहे, असे प्रतिपादन महीला गट प्रेरीका पूजा चव्हाण यांनी केले. धाराशिव तालुक्यातील तेर येथे अकरावी व बारावीच्या विद्यार्थीनी व विद्यार्थ्यांसाठी आयोजित सामान्य ज्ञान स्पधच्या उद्घाटनप्रसंगी पूजा चव्हाण बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाराष्ट्रात संत विद्यालयाचे मुख्याध्यापक जे.के. बेदरे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून तेरणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संतोष गायकवाड, प्रा. प्रदीप कोकाटे, प्रा. दयानंद फंड, प्रा. सतीश भालेराव, प्रा. संदिप पाटील, प्रा. जयश्री भक्ते, प्रा. सुवर्णा घुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक नरहरी बडवे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. संदिप पाटील यांनी केले. आभार प्रा. सतिश भालेराव यांनी मानले.

### शिवाजीराव वडणे यांचे निधन

**उमरगा, दि.५ डिसेंबर -**

भाजपचे जेष्ठ नेते, प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ माजी सदस्य, तथा श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक



संस्था, उमरगाचे संचालक उपप्राचार्य शिवाजीराव वडणे यांचे ५ रोजी पहाटे मुंबई ते उमरगा प्रवासादरम्यान हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. प्रा. हेमंत वडणे (सदस्य -ग्राहक सेवा मंडळ, महाराष्ट्र माहिती अधिकार समिती) यांचे वडील असून त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. अंत्यविधी दि.५ डिसेंबर रोजी उमरगा येथे दुपारी २.३० वा हुतात्मा स्मारक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# तुळजापूर तालुक्यात पवनचक्क्यांचा धुमाकूळ; शेतजमिन पडिक राहण्याची शक्यता



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ डिसेंबर -**

तुळजापुर तालुक्यात सध्या पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांनी अक्षरशा धुमाकुळ घातला आहे. पवनचक्क्या उभरावेत मात्र त्या नापिक जमिनीवर. मात्र आज तालुक्यात अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांच्या चालु जमिनीवर मोठमोठे पवनचक्की प्रकल्प उभारले जात आहेत. शेतकऱ्यांना विशेष करून अशिक्षित शेतकऱ्यांना पैशाचे अमिश दाखवुन या कंपन्या त्यांच्या चालु शेतजमीनी ताब्यात घेऊन त्यावर पवनचक्की उभारत आहेत. एक पवनचक्की उभारल्यानंतर त्याच्या आजुबाजुची बरीचशी शेतजमीन ही शेतकऱ्यांना कसता येत नाही. त्यामुळे कालांतराने ही शेतजमीन पडीक होते.

पवनचक्की प्रकल्प उभारणाऱ्या कंपन्यांनी स्थानिक दलालाना हाताशी धरून त्यांच्या मार्फत शेतकऱ्यांना पैशाचे आमिष दाखवुन तसेच त्यांची दिशाभुल करुन त्यांच्या जमीनी ताब्यात घेत आहेत. आज तालुक्यातील अनेक गावांमध्ये या कंपन्यांनी अक्षरशा धुमाकुळ घातला आहे. यामध्ये रिन्यु ग्रीन सोल्युशन व जेएसडब्ल्यू या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्याच्या विरोधात अनेक गावांमधुन मोठ्या प्रमाणात तक्रारी येत आहेत. कांहीनी तर जिल्हाधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रारी दिल्या आहेत मात्र या तक्रारींची दखल कोणीच घ्यायला तयार नाही यामुळे दिवसेंदिवस या कंपन्यांची मस्ती वाढत चालली आहे. शेतकऱ्यांना धमकाविणे प्रसंगी केसेस करण्याची धमकी देऊन शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या कंपन्यांकडुन व त्यांनी नेमलेल्या दलालांकडुन केला जात आहे. तालुक्यातील काक्रंबा शिवारात उभारण्यात आलेल्या पवनचक्की या कुठल्याही कार्यालयाच्या परवानगी न घेता उभारण्यात आले असल्याचे कांही जणांनी आरोप केला आहे.

> **शेतकऱ्यांनी पैशाच्या मोहाला बळी पडू नये...**
>
> तुळजापुर तालुक्यात पवनचक्की प्रकल्प उभारणाऱ्या कंपन्यांनी अक्षरशः धुमाकुळ घातला आहे.मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतजमीनीवर पवनचक्क्या उभारण्याचे काम सुरु असल्याने येणाऱ्या काळात तुळजापुर तालुक्यात शेतजमिनीमध्ये मोठी घट होणार असल्याचे दिसुन येत असुन हे अतिशय धोकादायक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी क्षणिक पैशाच्या मोहाला बळी पडुन आपल्या जमीनी कंपन्यांच्या घशात घालु नये.

जिल्हा प्रशासनाने याबातची सत्यता पडताळुन घेणे गरजेचे आहे. होर्टी येथे उभारण्यात आलेल्या पवनचक्की संदर्भातही नामदेव घोडके व संजय घोडके यांनी प्रशासनाकडे तक्रार केली आहे.

पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांची अशीच मनमानी सुरु राहिली तर तालुक्यातील शेतकरी अक्षरशा कोलमडुन जाणार आहे. कारण कितीही पैसा दिला तर तो कांही दिवसातच संपुन जाणार आहे. मात्र एकदा आपली गेलेली जमीन पुन्हा परत येऊ शकणार नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी कुठल्याही दबावाला किंवा अमिषाला बळी न पडता पवनचक्क्या उभारणाऱ्या कंपन्यांना आपल्या जमीनी देऊ नयेत किंवा त्यांना आपल्या जमिनीत पाय ठेऊ देऊ नये. नाहीतर एक दिवस असा येईल की तालुक्यात शेतजमिनच शिल्लक राहणार नाही.

## विनापरवाना सावकारकी; पती-पत्नीस तीन वर्षांची शिक्षा



**भूम न्यायालयाचा निकाल...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

परवाना नसतानाही सावकारी करून अवैधरीत्या जमीन बळकावल्याच्या प्रकरणात हिवर्डा येथील आरोपी दाम्पत्यास सोमवारी भूम न्यायालयाने प्रत्येकी तीन वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. शिवाय, आर्थिक दंडही ठोठावला आहे.

भूम तालुक्यातील हिवर्डा येथील सुभाष दासू जाधवर व त्यांच्या पत्नी जयश्री जाधवर हे विनापरवाना सावकारी व्यवसाय करून जमिनी बळकावत असल्याची तक्रार भूम येथील सहनिबंधकांकडे देण्यात आली होती. हिवर्डा येथीलच श्रीमंत परसू मुंडे यांनी आरोपींकडून २० हजार रुपये प्रतिमाह १० टक्के व्याजाने घेतले होते. सुरक्षेपोटी त्यांनी चार एकर जमीन जयश्री जाधव यांच्या नावे करून दिली होती. दरम्यान, व्याजासह सर्व पैसे दिल्यानंतरही आरोपींनी केवळ दोन एकर जमीन परत केली. यानंतर श्रीमंत मुंडे यांचा मुलगा मारुती मुंडे यांनी दोन कोरे धनादेश देऊन ५० हजार रुपये प्रतिमाह पाच टक्के व्याजाने घेतले होते. हे पैसेही परत केल्यानंतर उर्वरित दोन एकर जमीन व कोरे धनादेश परत करण्याची मागणी केली असता, आरोपींनी टाळाटाळ करीत मुंडे पिता- पुत्रांनाच धमकी दिल्याचा दावा करीत भूमच्या सहनिबंधकांकडे विना परवाना सावकारीची तक्रार करण्यात आली. त्यांनी चौकशी करून अहवाल जिल्हा उपनिबंधकांकडे पाठविला. उपनिबंधकांनी सरकारी वकिलांच्या सल्ल्याने या प्रकरणात आरोपी दाम्पत्यावर गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ६ ऑक्टोबर २०१७ रोजी गुन्हा दाखल झाला. तपास अधिकारी तत्कालीन पोलिस निरीक्षक माधव सूर्यवंशी यांनी तपास पूर्ण करून भूमच्या न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. यावर अंतिम सुनावण होऊन २ डिसेंबर २०२४ रोजी निकाल देण्यात आला. सरकारी वकील जे. जे. सरवदे यांनी केलेला युक्तिवाद, साक्षी-पुरावे ग्राह्य धरून आरोपींना न्यायालयाने शिक्षा सुनावली.

शिवाय, प्रत्येकी २० हजार रुपयांचा दंडही ठोठावला असून, दंड न भरल्यास प्रत्येकी तीन महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली.

## तेर येथे भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.५ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमत्रीपदी भारतीय जनता पार्टीचे देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून,पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

यावेळी उपसरपंच श्रीमंत फंड, नवनाथ नाईकवाडी, प्रविण साळुंके, भास्कर माळी, मज्जित मनियार, मंगेश फंड, अमित कोळपे, राहुल गायकवाड, सुनिल गायकवाड, पांडुरंग बगाडे, प्रजोत रसाळ, राजाभाऊ आंधळे, अप्पा काळे, गणेश फंड, किशोर काळे, अर्शाद मुलांनी व भा.ज.पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस; भाजपाच्या वतीने परंड्यात जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ डिसेंबर -**

भारतीय जनता पार्टीचे नेते तथा महायुतीच्या विजयाचे शिल्पकार देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणुन आझाद मैदान, मुंबई येथे दि.५ डिसेंबर गुरुवार रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे राज्यपाल तसेच केंद्रातील राज्यातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली. यावेळी परंड्यात भाजपाच्या वतीने जल्लोष करण्यात आला.

मुख्यमंत्री म्हणुन तर उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी शपथ घेताच परंडा येथे छत्रपती शिवाजी चौक येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या आदेशाने गुलालाची उधळण करित फटाक्याची अतिषबाजी करीत भारतीय जनता पार्टीचा विजय असो अशा घोषणा देत मोठा जल्लोष करण्यात आला.

यावेळी भाजपाचे राज्य कार्यकारणी सदस्य अ‍ॅड. जहीर चौधरी, भाजपाचे तालुकाध्यक्ष गणेश खरसडे, भाजपा शहराध्यक्ष उमाकांत गोरे, सुजित परदेशी, रामकृष्ण घोडके, अरविंद रगडे, अ‍ॅड.तानाजी वाघमारे, सारंग घोगरे, हनुमंत पाटील, अविनाश विधाते, मिलिंद शिंदे, धनंजय काळे, गज्जू तिवारी, आदर्श ठाकूर, जयंत भातलवंडे, विठोबा मदने, साहेबराव पाडुळे, परसराम कोळी, अजित काकडे, किरण देशमुख, नागेश शिंदे, विलास कोसरे, अजित ढगे, जयंत सायकर, ज्योती भातलवंडे तसेच इतर भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आई-वडील हेच आपले खरे दैवत : डॉ. वसंत हंकारे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ डिसेंबर -**

घरातील आईवडिलांना जो सन्मान मिळवून देतो, तोच यशस्वी होतो. आई-वडीलांचे कष्ट आणि त्याग याचा विसर जीवनात पडता कामा नये. आई-वडील एकदा निघून गेले तर जगात कोणीही आपले उरत नाही, जोवर ते आहेत तोपर्यत त्यांना आनंदी ठेवा. एक समाधानी कुटूंब म्हणून जगायला हवे. विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या आदर्शावर चालायला हवे. युवक-युवतीनी आपल्या आईवडीलांची मान खाली जाईल, असे काम करू नये, असा मौलिक सल्ला त्यांनी दिला.

केसरजवळगा (ता. उमरगा) येथील मातोश्री गंगाबाई शिवमुर्ती पाटील यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त डॉ. रोहित पाटील युवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित आई-बाप समजून घेताना या विषयावर डॉ. वसंत हंकारे यांचे व्याख्यान मंगळवारी (ता.३) रोजी संपन्न झाले. यावेळी डॉ. रोहित पाटील युथ फाउंडेशने केलेल्या कामाचा आढावा सादर करताना डॉ. रोहित पाटील म्हणाले की, आपल्या आईच्या आठवणीने प्रत्येकाच्या काळजाला हात घातला. जगात सर्व काही मिळू शकते पण आईची माया कधीच मिळणार नाही.



आपल्या आईबापांचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी आपल्या जीवाचे रान करा, असा संदेश त्यांनी यावेळी दिला. व्याख्याना नंतर मुली आपल्या वडिलांच्या गळ्याला पडून अक्षरशः ओक्साबोक्शी रडत होत्या. डॉ. रोहित पाटील युवा फाउंडेशने जिल्हा परिषद शाळेस शैक्षणिक, क्रीडा साहित्य, टी.व्ही. संच, वृक्षारोपण, तालुकास्तरीय वकतृत्व स्पर्धा, स्मशानभूमी परिसर स्वच्छता, गावातील गरजू रुग्णांना आर्थिक मदत मिळवून देण्यास सहकार्य गुणवंत व कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान, देशभक्तीपर गीत अशा विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. भविष्यात शाळा, आरोग्य व गावाच्या भौतिक सुविधेसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचा मानस यावेळी फाउंडेशनकडून बोलून दाखविण्यात आला. यूथ फाउंडेशनच्या वतीने गावात राबवण्यात येणाऱ्या शैक्षणिक-सामाजिक उपक्रमास सहकार्य म्हणून मयूर राऊत यांनी अकरा हजार, घोडके सूर्यकांत यांनी एकवीस हजार तर कोथळीचे माजी सरपंच आप्पासाहेब पाटील यांनी एकवीस हजार रूपयांचा चेक फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत कलकेरी व शरण कणमुसे यांना सुपूर्द केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रोहित पाटील युथ फाउंडेशनच्या सदस्यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन बालाजी भोसले तर आभार युसूफ गवंडी यांनी मानले. जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेच्या भव्य प्रागंणावर आयोजित कार्यक्रमात महिला, पुरुष व विद्यार्थ्यांसह मुरूम, आलूर, वरनाळवाडी व आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थी-पालक मोठया संख्येने उपस्थिती होते.

## जिल्हा युवा महोत्सवाचा समारोप; ३५० पेक्षा अधिक युवा वर्गाच्या सुप्त कलागुणांना मिळाली चालना



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

दोन दिवशीय जिल्हा युवा महोत्सवात युवा वर्गाच्या अंगी असलेल्या कलेच्या सुप्त कलागुणांना चालना मिळाली. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरु युवा केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने व राष्ट्रीय सेवा योजना, धाराशिव यांच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी नाटयगृह, धाराशिव येथे ४ व ५ डिसेंबर रोजी आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सवाचा उत्साहात समारोप झाला.

जिल्हा युवा महोत्सवात जिल्हयातून ३५० युवक, युवती, विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेतून कला सादर केली. जिल्हा युवा महोत्सवात यश संपादन केलेल्या कलाकारांची विभागस्तरावरील युवा महोत्सवासाठी निवड करण्यात आली.

जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक संपादन केलेल्या संघ व कलाकारांना जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे,सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्यूत) चंद्रकांत चकोते, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, नेहरू युवा केंद्रचे धनंजय काळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे डी.वाय. साखरे, भोसले हायस्कुलचे प्राचार्य नंदकुमार ननवरे यांच्या हस्ते पारितोषक, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी परिक्षक म्हणून मिलींद माने, सतीश ओव्हाळ, सुर्यकांत कापसे, श्रीराम नागरगोजे, विनोदकुमार वायचळ, माधुरी कुलकर्णी, दिपक दहिफळे, प्रा.डॉ. उमेश सलगर, सुहास झेंडे, प्रा.डॉ. वैभव आगळे, एस.डी. भोसले, एस.टी. गांगुर्डे, संजय कोथळीकर, डॉ. दत्तात्रय साखरे, डॉ. होळंबे, डॉ. ननवरे, वाघमारे, समीर माने, पौळ, नागापूरे, चौधरी यांनी काम पाहिले. जिल्हा युवा महोत्सवाचा अंतिम निकाल लोकनृत्य स्पर्धा (प्रथम) भवानी शंकर बहुउद्देशीय संस्था, तुळजापूर (द्वितीय) श्रीपतराव भोसले हायस्कुल, (तृतीय) आर.पी. कॉलेज धाराशिव लोकगीत स्पर्धा (प्रथम).

भवानी शंकर बहुउद्देशीय संस्था, तुळजापूर (द्वितीय). व्यंकटेश महाजन महाविद्यालय धाराशिव, (तृतीय) जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येडशी. कथा लेखन स्पर्धा (प्रथम) मुंढे वैभव, (द्वितीय) वाघमारे सुधांशु दिलीप, (तृतीय) खोगरे वैष्णवी दत्तात्रय. वक्तृत्व स्पर्धा लेखन (प्रथम) शेख समीर मजनू, (द्वितीय) आदिती ओव्हाळ, (तृतीय) सायली मुंडे, कविता लेखन स्पर्धा (प्रथम) अदमिले वैष्णवी धर्मराज, (द्वितीय) मुंडे वैभव, (तृतीय) भोरे रोहित प्रभाकर.

फोटोग्राफी स्पर्धा (प्रथम) वैष्णवी आदमिले, (द्वितीय) उमर फारूक शेख, (तृतीय) वराळे सुनिल बाळासाहेब. चित्रकला स्पर्धा (प्रथम) जगदिश बसवराज सुतार, (द्वितीय) गायकवाड वैष्णवी नितीन, (तृतीय) गोरे काजल माणिक.

संकल्पना आधारित स्पर्धा (विज्ञान व तंत्रज्ञान नवसंकल्पना) (प्रथम) श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय तुळजापूर, (द्वितीय) तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, धाराशिव (तृतीय) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव विजेते ठरले.

**उस्मानाबाद येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्रा बद्दल**

**जाहीरनामा**

**सीएनआर-एमएचओएस०२-००२४०५२०२४ दत्तात्रय/निरंक**
**दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ८२२/२०२४ निशाण क्रमांक-६**

ज्यापेक्षा भयत कै. सुमती दत्तात्रय आडसुळ, रा. सुर्डी, ता. जि. उस्मानाबाद हे दिनांक २४/०८/२०२२ रोजी किंवा त्यासुमारास सिप्ला फाउंडेशन पुणे येथे मयत झाले असून अर्जदार १. दत्तात्रय रामचंद्र आडसुळ, २. सुप्रिया बाळासाहेब जाधव, ३. सायली दत्ता आडसुळ, ४. ओंकार दत्ता आडसुळ, यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत कै. सुमती दत्तात्रय आडसुळ यांच्या नावचे वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदारास सदरहू प्रमाणपत्र हे कै. सुमती दत्तात्रय आडसुळ यांचे मृत्यू पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी अर्जदारांचे नावे वारसा हक्काने नांवे लावणेकामी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सदरहू अर्जदार मयत कै. सुमती दत्तात्रय आडसुळ यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याचा सदरहू मयत कै. सुमती दत्तात्रय आडसुळ चे वारसाचे प्रमाणपत्र देईल.

**दिनांक २३.११.२०२४ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**
**पुढील नेमलेली तारीख -२०/१२/२०२४**

**स्वाक्षरित/-**
**(व्ही. के. बेग)**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**(एस. एम. नावडे)**
**सहा.अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय, क. स्तर उस्मानाबाद**




बीड शहरातील खंडोबा दिपमाळ मंदिरावर चंपाषष्ठी निमित्त शुक्रवार आणि शनिवारी दोन दिवस यात्रेनिमित्त मंदिरावर अशी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे (छाया कृष्णा शिंदे)

# शिक्षक साजेद अली खुन प्रकरणी १४ आरोपी दोषी ;सोमवारी आरोपींना शिक्षा सुनावण्यात येणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ डिसेंबर**

बीड शहरातील बालेपीर भागात राहणाऱ्या शिक्षक साजेद अली यांचा निघूणपणे खून करण्यात आला होता. या प्रकरणी १८ आरोपी विरोधात शिवाजी नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हे प्रकरण बीड येथील विशेष मोक्का न्यायालयात सुरू होते. काल या प्रकरणाचा निकाल होता. न्यायालयाने १८ पैकी १४ आरोपींना दोषी ठरविले असून ३ आरोपींना निर्दोष ठरविलेले आहे. दोषींना सोमवारी शिक्षा सुनाविण्यात येणार आहे. साजेद अली खुन प्रकरणाचा आज निकाल असल्याने जिल्हा न्यायालयाच्या परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

बीड शहरातील बालेपीर भागात राहणारे सैनिकी विद्यालयातील शिक्षक सय्यद साजेद अली (वय ३८) यांची ५ डिसेंबर रोजी धारधार शस्त्राने हत्या करण्यात आली होती. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. या प्रकरणी गुजर खान उर्फ अन्वर खान मिर्झा खान, सरफराज काझी, फैज मोहम्मद खान उर्फ पापा भाई, सय्यद नुर उर्फ मिनाज, मुजी खान पठाण, सय्यद नासेर सय्यद नुर, सय्यद शाहरूख सय्यद नुर, शेख उबेद शेख बाबू, शेख सरफराज, इम्रान पठाण, शेख शाहबाद शेख कलिम, शेख अमर शेख अख्बर, शेख बाबर युसूफ, आवेज काझी, शेख इम्रान उर्फ काला, शेख मजर उर्फ हमसफर, बाबर खान गुल मोहंमद खान पठाण, शेख वसीम शेख बदरोद्दीन यांच्या विरूध्द शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

हे प्रकरण बीड येथील विशेष मोक्का न्यायालयात सुरू होते.या प्रकरणाचा काल निकाल होता. न्यायालयाने १४ आरोपींना दोषी ठरविले असून ३ जणांना निर्दोष मुक्त केलेले आहे. दरम्यान या प्रकरणातील एक आरोपी अद्यापही फरार आहे. दोषींना सोमवारी शिक्षा सुनाविण्यात येणार आहे. साजेदअली खुन प्रकरणाचा निकाल असल्यामुळे जिल्हा न्यायालयाच्या आवारामध्ये कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी स्वतःडीवायएसपी गोल्डे, चार पीआय आणि १५० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते.सरकारी पक्षाच्या वतीने विशेष सरकारी वकील अॅड.अजय तांदळे हे काम पाहत आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची अंबाजोगाईत गुटख्याच्या गोदामवर धाड

## १० लाख ६७ हजार रुपयांचा माल जप्त

अंबाजोगाई (प्रतिनिधी)–राज्य भरात गुटखा विक्रीस बंदी असतानाही अंबाजोगाई व परिसरात १० ते १२ गुटख्याचे व्यापारी बिनधास्त पणे गुटखा पानपट्टी धारका पर्यंत पोचवण्याचे काम करत असून बीड येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुटख्याच्या गोदामवर धाड टाकून १० लाख ६७ हजार रुपयांचा माल जप्त केल्याने गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

महाराष्ट्रामध्ये तंबाखूजन्य पदार्थावर बंदी असताना देखील बीड जिल्ह्यात सर्रासपणे खुलेआम गुटखा विक्री होत असून याकडे अन्न व औषध प्रशासनाने अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्यानेच खुलेआम गुटखा विक्री होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात किराणा दुकान, पान टपरी, हॉटेल मध्ये सहज गुटखा उपलब्ध होतो. स्थानिक गुन्हे शाखा बीडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दराडे यांना आंबेजोगाई शहरात एक गुटक्याचे गोडाऊन असल्याची गुप्त माहिती मिळाल्याने मंगळवारी दराडे यांनी एका गुटख्याच्या गोडावूनवर छापा मारून लाखोंचा माल ताब्यात घेतला. बाळराजे दराडे यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यांवर वाळू, मुरूम, बनावट ग्रीस, गुटखा यावर मोठ्या कारवाया केल्या होत्या. बाळराजे दराडे यांनी पुन्हा एकदा अवैध धंद्यांवाल्यांकडे आपला मोर्चा वळविला असून अंबाजोगाई शहरातील गणेश प्रोव्हिजन या गोडावूनवर छापा मारून रजनीगंधा, आर.एम.डी, विमल, गोवा, बाबा या नावाचा गुटखा ताब्यात घेतला आहे. या कारवाईत १० लाख ६७ हजारांचा माल पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे कळत असून या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, पोलीस उपनिरीक्षक घाडगे, पो.ह.मोराळे, मुंडे, पो. मोराळे पो. मस्के, पो.ना. नामदेव सानप यांचा सहभाग होता. या कारवाईने अवैधधंदे करणाराचे व गुटखा माफीयांचे धाबे दणाणले आहेत.



परळी वैजनाथ – उपजिल्हा रुग्णालय व लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त सोमवारी (दि.०२) एड्स जनजागरण रँलीचे आयोजन करण्यात आले होते.

# देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच

## माजी आ.लक्ष्मण पवारांच्या भाजप कार्यालयात जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.५ डिसेंबर**

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपा महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे त्यामुळे भाजपाचे विधीमंडळ गटनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती तेव्हाच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच होणार जवळपास निश्चित झाले होते त्या.अनुषंगाने आज दि ५ डिसेंबर रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे यांना पद व गोपनीयतीची शपथ दिली याप्रसंगी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी, यांच्या अनेक राज्याचे मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्रिमंडळाती मंत्री उपस्थित होते.



महायुती सरकारच्या शपथ विधीचा लाईव्ह कार्यक्रमाचे आ.लक्ष्मण पवारांच्या संपर्क कार्यालयात आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथग्रहण सुरु असतांना गेवराई भाजपा कार्यालयात पेढे वाटून फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला होता यावेळी नागरिकांसह पदाधिकाऱ्यांसह कार्यक्रत्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची परळी तालुका कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी चित्रा देशपांडे, सचिव गोपाळ आंधळे तर संघटन मंत्री पदी विजया दहिवाळ यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.५ डिसेंबर**

अखिल भारतीय ग्राहक पंचायत परळी वैजनाथ तालुक्याची कार्यकारणी निवडण्यासाठी बुधवार दिनांक ४ डिसेंबर रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत परळी वैजनाथ तालुका अध्यक्षापदी चित्राताई देशपांडे, तालुका सचिव पदी माजी न.प. शिक्षण सभापती गोपाळ आंधळे, संघटन मंत्रीपदी विजयाताई दहिवाळ, तर विधी सल्लागारपदी ड.अशोक शहाणे व ड. वैजनाथ वांजरखेडे यांची नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.



याबाबत अधिक माहिती अशी की अखिल भारतीय ग्राहक पंचायत ही संघटना देश पातळीवर ग्राहकांच्या संरक्षणासाठी निर्माण झाली असून, या समितीची परळी वैजनाथ तालुक्याची कार्यकारणी निवडण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे देवगिरी प्रांत अध्यक्ष डॉक्टर विलास मोरे सर यांच्या अध्यक्षतेखाली परळी येथे बैठक संपन्न झाली. यानंतर परळी वैजनाथ तालुक्याची नवीन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली .यामध्ये परळी तालुका अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्त्या चित्रा देशपांडे सचिव पदी नगरपरिषदेचे माजी शिक्षण सभापती गोपाळ आंधळे संघटन मंत्रीपदी समाज सेवीका विजया दहिवाळ विधी सल्लागार पदी ड. अशोक शहाणे अँड .वैजनाथ वांजरखेडे, कोषाध्यक्षपदी विद्या खिस्ती ,उपाध्यक्षपदी शोभा कुलकर्णी यांची निवड करण्यात आली तर या समितीच्या सदस्य पदी अनिता माळवतकर ज्ञानेश्वरी चाटे संध्या सर्व दे सुनीता बोडके अपर्णा वेताळ सुनिता नरंगलकर डॉक्टर आनंद टिंबे प्रीती टाक तारा अग्रवाल रुक्मिणी अग्रवाल तारामती बनसोडे आदींची निवड जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांनी या समितीमध्ये कशा पद्धतीने ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण करावे याबाबत पुढील प्रमाणे सूचित केले आहे.

दिवसेंदिवस ग्राहकांचे न्याय आणि हक्क राजरोसपणे पायदळी तुडवले जात आहेत त्यामुळे सामान्य माणूस जेरीस आलेला आहे. त्यातच वाढत्या महागाईमुळे त्यांना जीवन जगणे अवघड होत चालले आाहे. ग्राहकांपर्यत जीवनावश्यक वस्तू पोहोचणेही दुरापास्त झाले आहे. शाळा, कॉलेजमध्ये मोठ्या प्रमाणावर देणग्या दिल्याशिवाय प्रवेश मिळेनासे झाले आहे. शासकीय योजनांना भ्रष्टाचाराची गळती लागल्याने नागरिकांपर्यत एक रुपयातील पंधरा पैसे जाईनासे झाले आहे. जनसामान्य माणसाचे स्वातंत्र्य धोक्यात येते की काय ? अशी भिती निर्माण झाली आहे. ग्राहकांच्या हितांचे प्रश्न हाताशी घेऊन अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या गाध्यमातून आपणासारखे ध्येयवादी कार्यंर्ते गेल्या अनेक वर्षापासून कार्य करत आहेत. त्यामूळे समाजात लोकशिक्षण व लोकजागृतीचे कार्य वृध्दींगत होत आहे. आपण करत असलेल्या कार्य अहवालानुसार आपली नियुक्ती करण्यात येत आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे उदिष्ट ध्येय धोरणानुसार आपणाकडून कार्य अपेक्षित आहे.

या बैठकीस राज्य कार्यकारणी वरील गंगाधर कानेटकर अशोक कोकणावर यांचीही उपस्थिती होती या बैठकीचे सूत्रसंचालन विजया दहिवाळ यांनी केले प्रस्ताविक चित्रा देशपांडे तर आभार प्रदर्शन गोपाळ आंधळे यांनी केले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# एपीआय गणेश मुंडेंची गेवराई येथे बदली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ डिसेंबर**

एपीआय गणेश मुंडे यांची गेवराई येथे बदली करण्यात आली आहे, त्यांच्या बदलीचे आदेश (दि.३ डिसेंबर) रोजी काढण्यात आले आहेत.

गणेश मुंडे एक कर्तव्यदक्ष अधिकारी आहेत, त्यांनी बीड जिल्ह्यात अत्यंत चांगल्या पद्धतीने कर्तव्य बजावलेले आहे, अनेक कारवयाच्या माध्यमातून त्यांनी माफीयांना दणके दिलेले आहेत, विशेष म्हणजे त्यांनी वाळूच्या अनेक रेड केल्या असून १० कोटीपर्यंत मुद्देमाल जप्त केलेला आहे, त्यामुळेच माफियानी त्यांची धास्ती घेतली होती, मागच्या काही दिवसांपूर्वी त्यांची नळदुर्ग येथे बदली करण्यात आली होती, आता पुन्हा एकदा त्यांची गेवराई येथे महामार्ग पोलिस विभागात बदली करण्यात आली आहे, तीन डिसेंबर रोजी त्यांच्या बदलीचे हे आदेश काढण्यात आले असून ते लवकरच आपल्या पदाचा पदभार स्वीकारणार आहेत.

# महादेव बादाडे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ डिसेंबर**

वाघोरा (ता. माजलगाव) येथील शेतकरी महादेव रंगराव बादाडे (वय, ६० वर्ष) यांचे मंगळवारी (ता. तीन) रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी (ता. चार) वाघोरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना नातवंड असा परिवार आहे. सार्वजनीक बांधकाम विभागातील शाखा अभियंता धनंजय बादाडे, मनोज बादाडे यांचे ते वडील होत.

# धनंजय मुंडेंचे सिरसाळा एमआयडीसी पूर्णत्वाच्या दिशेने महत्वाचे पाऊल

## मुंडेंनी प्रस्तावित केलेल्या औद्योगिक क्षेत्र विकास आराखड्यास एमआयडीसी ने दिली मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.५ डिसेंबर**

परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील शिरसाळा येथे औद्योगिक विभागाने अधिग्रहीत केलेल्या जागी पंचतारांकित एमआयडीसी पूर्ण करण्याचा ध्यास घेतलेला असून एमआयडीसीमध्ये प्रत्यक्ष उद्योगांना सुरुवात करण्याच्या दृष्टीने एमआयडीसी पूर्णत्वाच्या साठी अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

धनंजय मुंडे यांच्या विनंतीनुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे शिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवर औद्योगिक क्षेत्रात पूरक बाबी विकसित करण्यास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली असून, यामध्ये प्रामुख्याने २० मीटर मुख्य रस्ता, १२ मीटर अंतर्गत रस्ते, १५ मीटर सर्व्हिस रस्ते यांसह लघु व मध्यम उद्योगांसाठी राखीव जागा (प्लॉट) निर्मितीसाठी त्याचबरोबर सहाय्यभूत सुविधा निर्माण करण्याच्या प्रस्तावास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली आहे.

सिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीवर एकूण १६ हेक्टर क्षेत्र हे संबंधित सुविधांसाठी मंजुर करण्यात आले असून, यासाठी धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. धनंजय मुंडे यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिरसाळा येथील मंजूर असलेल्या एमआयडीसीला पूर्णत्वाकडे नेऊन या ठिकाणी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे तसेच येथे उद्योगांना निमंत्रित करण्याचे आश्वासन दिले होते; या शब्दाला पूर्ण करण्यासाठी आणखी आमदार म्हणून शपथ घेणे सुद्धा बाकी असतानाच मुंडेंनी आपल्या कामाला सुरुवात केल्याचे पाहायला मिळत आहे.

सिरसाळ्यात सुमारे २०० हेक्टर पेक्ष्या अधिक क्षेत्र हे एमआयडीसी म्हणून घोषित करण्यात आले असून त्यापैकी ७८ हेक्टर पेक्षा अधिक जमीन आतापर्यंत अधिग्रहित करण्यात आली आहे. सदर ठिकाणास राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे सह दळणवळणाच्या सोयी व पाण्याची उपलब्धता प्रमाणात असल्याने येथे उद्योग उभारणीस मोठा वाव आहे. त्यामुळे सदर एमआयडीसी पूर्ण झाल्यास याठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती करण्याचा धनंजय मुंडे यांचा प्रयत्न आहे.

# गुटखा माफिया मुळे आबाची हर्सूलमध्ये रवानगी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ डिसेंबर**

गुटखा माफिया असलेल्या महारूद्र उर्फ आबा मुळेला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी रात्री धाराशिवमधून अटक केली आहे. आबा मुळेवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली असून मुळेला हार्सुल कारागृहाकडे रवानगी करण्यात आल्याचे स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यात गुटख्याची तस्करी आणि विक्रीसह गंभीर स्वरूपाचे गुन्हे आबा मुळेवर दाखल होते. काही दिवसांपूर्वी आबा मुळेला आंबडच्या बसस्थानकातून सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे यांनी अटक केली होती. त्याच्यावर मोठे गुन्हे दाखल असल्याने एमपीएडीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला होता. अखेर त्याला मंजूरी मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीला धाराशिवमधून काही वेळापूर्वी अटक केल्याचे कळते. स्थानिक गुन्हे शाखेतील विघ्ने यांच्या पथकाने ही कारवाई केल्याची माहिती असून आरोपीला हार्सुल कारागृहाकडे घेवून जात असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी बोलताना सांगितले आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## लातूर जिल्ह्यातील १४० शाळांमध्ये 'परख' सर्वेक्षण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.५ डिसेंबर -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत ४ डिसेंबर २०२४ रोजी देशभरात एकाच दिवशी इयत्ता तिसरी, सहावी व नववी या वर्गाच्या यादृच्छिकपणे निवडलेल्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळामध्ये परख सर्वेक्षण घेण्यात आले.

लातूर जिल्ह्यातील १४० शाळांमध्ये हे सर्वेक्षण आयोजित करण्यात आले होते. या सर्वेक्षणात १८४ अन्वेषक म्हणून डी.एल.एड विद्यालयातील छात्राध्यापक, अध्यापक व तालुका साधन व्यक्ती, विशेष तज्ञ यांनी काम पाहिले.

तसेच निरीक्षक म्हणून सीबीएसई शाळेतील १३१ शिक्षकांनी काम पाहिले.

जिल्ह्यातील ४४ शाळांतील इयत्ता तिसरीचे १ हजार ५५ विद्यार्थी तर ८८ शिक्षक तसेच ४६ शाळांतील इयत्ता सहावीचे ९५६ विद्यार्थी व १२५ शिक्षक आणि इयत्ता नववीमधील ५० शाळांतील १ हजार ३५७ विद्यार्थी व १९२ शिक्षक असे एकूण १४० शाळांतील ३ हजार ३६८ विद्यार्थी व ४०५ शिक्षक यांनी 'परख' सर्वेक्षणात सहभाग घेतला, असे मुरुड येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या डॉ. भागीरथी गिरी यांनी कळविले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### मुख्यमंत्रीपदी फडणवीस निवड; सुनिल दांडगे यांनी भेट घेऊन दिल्या शुभेच्छा

**चाकूर, दि.५ डिसेंबर -**

भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळून महाराष्ट्र एक नंबरचा पक्ष भाजपा झाला आहे. त्यामुळे दि.४ डिसेंबर रोजी विधानभवनात पार पडलेल्या बैठकीत भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र विधिमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्याबद्दल सुनिल दांडगे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन अभिनंदन करुन त्यांच्या पुढील वाटचालीस सुनील दांडगे यांनी शुभेच्छा दिल्या. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात घवघवीत यश संपादन केले. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे तब्बल १३२ आमदार निवडून आले आहेत. भाजप विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष ठरला असून भाजपच्या विधिमंडळ गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली. व ५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. त्यानिमित्ताने सुनिल दांडगे यांनी मुंबई येथे सागर बंगल्यावर देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.



### दिव्यांग विद्यार्थ्यांचे आभा क्रमांक काढण्यासाठी लातूरात प्रतिसाद

**लातूर, दि.५ डिसेंबर -**

जिल्हा परिषद लातूरमार्फत जिल्हास्तरीय दिव्यांग सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ३ डिसेंबर रोजी दगडोजीराव देशमुख सभागृह येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग विद्यार्थ्यांचे आभा क्रमांक काढण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सर्व आरोग्य विभागाचे व आशाताई यांचे कौतुक केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सागिरा पठाण, जिल्हा सनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी मंगेश रणदिवे, डॉ. अपर्णा वाघमोडे व समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. प्रतीक्षा येलडे, भातांगळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य कर्मचारी व्यंकटेश काळे यांनी मोलाची कामगिरी बजावली.



### केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनात स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयाचे यश

**उदगीर, दि.५ डिसेंबर -**

शिक्षण विभाग,पंचायत समिती उदगीर जि.लातूर च्या अंतर्गत जि.प. केंद्रीय प्रा.शा. हंडरगुळी (ता.उदगीर) येथे आयोजित करण्यात आलेल्या ५२ व्या केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनात स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालय सुकणी या शाळेने हर्बल क्वाईल मच्छर पळविणे हा प्रयोग करून दाखवला व माध्यमिक गटात द्वितीय क्रमांक मिळवून त्याची तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. यात मुळे साक्षी, सुकणे श्रुती, सबासारे श्रद्धा या विद्यार्थ्यांनीच हा प्रयोग यशस्वी केलेला आहे. त्यांना गंगोत्री आर.के. यांचे मार्गदर्शन झाले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव सुनिल सुकणे, मुख्याध्यापिका मिरा सुकणे यांनी कौतुक केले. तसेच शिक्षकवृंद कांबळे एम.एस, मुळे, के.के. इंचुरे, टी.एन. डोईफोडे, एस.जी. गव्हाणे, एच.पी. गोणपाट व ग्रामस्थानी अभिनंदन केले.

### १४ ते २७ डिसेंबर दरम्यान सैन्य भरती

**लातूर, दि.५ डिसेंबर -**

पुणे येथील मुख्यालय सैन्य भरती कार्यालयामाफ्रत १४ ते २७ डिसेंबर या कालावधीत अहमदनगर, बीड,



लातूर, धाराशिव, पुणे व सोलापूर या सहा जिल्ह्यातील नव यवुकांसाठी सैन्य भरती मेळावा मेकनाईज इंफंट्री सेंटर व स्कूल (अहमदनगर) येथे आयोजित केलेला आहे. याकरिता लातूर जिल्ह्यातील पात्र उमेदवारांनी सदरील सैन्य भरती मेळाव्यात सहभाग नोंदवून जास्तीत जास्त फायदा घ्यावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि) यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# किल्लारी साखर कारखान्याच्या ४१ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ

## आ. अभिमन्यु पवार यांची प्रमुख उपस्थिती...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.५ डिसेंबर -**

आ. अभिमन्यू पवार यांच्या अथक प्रयत्नाने पुनर्जिवित झालेल्या किल्लारी सहकारी साखर कारखान्याच्या ४१ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ गुरुवार दि.५ रोजी हभप. दत्तात्रय पवार गुरुजी व गेल्या हंगामात सर्वाधिक ऊस पुरवठा केलेले शेतकरी धनराज जयवंत भुजबळ, विजयकुमार मारोती तौर, हणुमंत मारुती दापके, गोविंद पांडुरंग जावळे यांच्या हस्ते करण्यात आला.



लातूर-धाराशिव जिल्ह्याच्या तीन तालुक्यातील शेतकऱ्यांचा आत्मा असलेला किल्लारी येथील शेतकरी सहकारी साखर कारखाना अनेक वर्षापासून आर्थिक अडचणीमुळे बंद पडला होता. नव्याने सुरु करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शब्द दिला होता. त्यानुसार कारखाना सुरु करण्यासाठी थेट राज्य सरकारच्या हमीवर राष्ट्रीय सहकार विकास निगम लि. दिल्ली यांच्याकडून आर्थिक मदत मिळावी. यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी सतत पाठपुरावा केल्यामुळे कारखान्यास आर्थिक मदत मिळाली. त्यामुळे गेल्या हंगामामध्ये अनेक अडचणीवर मात करुन कारखान्याने ट्रायल सिझन यशस्वीपणे पार पाडला.

गेल्या हंगामामध्ये गाळप केलेल्या ऊसाला २७०० रुपये प्रमाणे शेतकऱ्यांना चांगला भाव देण्यात आला आहे. गेल्या चाचणी हंगामात कारखान्याच्या मशिनरीमध्ये ज्या काही तांत्रीक अडचणी आल्या त्या अडचणीची नोंद घेऊन २०२४-२५ च्या हंगामासाठी मशिनरीची दुरुस्ती करण्यात आली आहे.

या गळीत हंगामाच्या शुभारंभासाठी विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस, माजी संचालक शेषेराव मोहिते पाटील, संतोष बेंबडे, युवराज बिराजदार, गोविंद भोसले, संजय निवृत्ती भोसले, शरद भोसले, सिध्दु बिराजदार, गौरीशंकर बालकुंदे, श्रीकांत कोणे, सतिश भोसले गुरुजी, बालाजी बोंडे, रमेश हेळंबे, गुलाब शिंदे, गणेश माने, प्र कार्यकारी संचालक टी.एन. पवार, कारखान्याचे मुख्य सल्लागार सुनिलकुमार डी. देशमुख, चिफ अकॉटन्ट एस.आर. वाडीकर, श्रीराम पाटील, विनोद भोसले, एन.एम. पाटोळे, कल्याण शिंदे, युवराज धुमाळ, गणेश शिंदे, केतन शेटे व कारखाना परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी, सर्व अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

कारखान्याचा गळीत हंगाम सुरु झाला असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्यास पुरवठा करुन सहकार्य करावे, असे आवाहन कारखाना प्रशासनाने यावेळी केले आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांना विधानसभेवर पाठविण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.५ डिसेंबर -**

राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांना विधान परिषदेवर पाठवा अशा प्रकारची ही शिरूर अनंतपाळ येथील सर्व राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीतील कार्यकर्त्यांची शिरूर अनंतपाळ येथे तालुकास्तरावर बैठक घेऊन मागणी केलेली आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या प्रवक्त्या सुनेत्रा पवार यांच्याकडे सर्व कार्यकर्त्याकडून करण्यात आलेली आहे.



तालुक्याला या मार्गाने न्याय मिळेल अशी सर्व पार्टीच्या कार्यकर्त्याकडून अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या. सर्वप्रथम ही कल्पना रा.कॉँ.पार्टी शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष विठ्ठलराव पाटील, तुषार मादळे यांच्याकडून मांडण्यात आली आणि या कल्पनेला सर्व कार्यकर्त्यांनी पाठिंबा दर्शवला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अतूल पाटील, अनिल देवंगरे, नगरसेवक माधव संभाळे, बाळू शिवणे, रोहित तांदळे, ज्ञानोबा मोगले, बबन होनमाने, रवी धुमाळ, सुचित लासुणे, नंदकुमार तांबोळकर, विवेक घारोळे, ऋत्विक सांगवे, सचिन शिंदे, उदय बावगे, केदार लोंढे, चंद्रकांत कांबळे, शिंदाळकर आदी उपस्थित होते.

## शिरूर अनंतपाळ येथे ८३ हजार ७५० रुपयाचा गुटखा जप्त

### शिरुर अनंतपाळ पोलीसांची कार्यवाही...

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.५ डिसेंबर -**

शिरूर अनंतपाळ येथे स्वताच्या फायदयासाठी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य सुगंधी गुटखा शिरूर अनंतपाळ ते येरोळ जणाऱ्या रोड लगत नागनाथ लोहार यांच्या तुरीच्या शेतात आरोपी नागनाथ सूर्यकांत जळकोटे (रा. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर) याने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेले अन्न पदार्थ तंबाखुजन्य गुटखा व लाल काळ्या रंगाची पलसर मोटार सायकल एकूण किंमत ८३ हजार ७५० रुपयांच्या माल शिरूर अनंतपाळ पोलीसानी पकडला या संदर्भात शिरूर अनंतपाळ पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरूर अनंतपाळ पोलीसांनी दिलेली माहिती अशी कि दि.५ डिसेबर रोजी सकाळी ११ च्या दरम्यान शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी स्वता पोलीस कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन धाड टाकून मुद्दे माल पकडला. आरोपी नागनाथ सूर्यकांत जळकोटे (रा. शिरूर अनंतपाळ) याने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला माल यातील नमुद आरोपी याने स्वताच्या फायदयासाठी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेले अन्न पदार्थ तंबाखुजन्य व गुटखा ३ हजार ७५० रुपयेचा माल हा आपले ताब्यातील लाल काळ्या रंगाची पलसर मोटार सायकल जिचा आरटीओ पासिंग (क्र.एम.एच.२४/बी. वाय. ४६३२) असा असलेली जुनी वापरती ज्याची किंमत ८० हजार रुपये असून असा एकूण किंमत ८३ हजार ७५० रुपयांच्या मालासह मिळून आला.



या संदर्भात फिर्यादी पोहेका विकास हनमंत लोखंडे पोलीस स्टेशन शिरूर अनंतपाळ यांच्या फिर्यादीवरून भाग १ ते ५ गु.र.न. २५७/२०२४ कलम १२३, २७४, २७५, २२३ बी.एन.एस. कसार आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल असून पुढील तपास पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे करीत आहेत.

## लातूर शहरातील बंद असलेले पथदिवे, स्ट्रीट लाईट तात्काळ सुरु करावेत

### आमदार अमित देशमुख यांच्या महानगरपालीका आयुक्तांना सुचना...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.५ डिसेंबर -**

लातूर शहरातील रिंगरोड वरील पाच नंबर चौक ते खाडगाव चौक तसेच पाच नंबर चौक ते संविधान चौक, शिवाजी चौक या मार्गावरील बंद असलेले पथदिवे, स्ट्रीट लाईट दुरुस्त करण्याचे काम युद्धपातळीव सुरु करावेत. तसेच बाभळगाव नाका, गरुड चौक याठिकाणी वाढती वाहतुकमुळे वाहतूक कोडी होत आहे. येथील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी सिग्नल बसवण्या बाबत तातडीने कार्यवाही करावी, अशा सुचना आमदार अमित देशमुख यांनी लातूर शहर महानगरपालीका आयुक्त आणि संबंधित यंत्रणेला दिल्या आहेत.



लातूर शहरातील रिंगरोड वरील पाच नंबर चौक ते खाडगाव चौक तसेच पाच नंबर चौक ते संविधान चौक, शिवाजी चौक या मार्गावर नागरीकांची मोठी वर्दळ असतानाही याठिकाणचे पथदिवे व स्ट्रीटलाईट अनेक दिवसापासून बंद आहेत. त्यामुळे रात्रीच्यावेळी या मार्गावर सर्वत्र अंधार असतो. याचा वाहनचालकांना, नागरीकांना त्रास होत असून अंधारामुळे अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तसेच बाभळगाव नाका, गरुड चौक याठिकाणीही वाहनांची कोंडी होत असून त्यामुळे वाहनचालकांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. वाहन कोंडीमुळे वाहनाच्या रांगा लागत असून पायी चालणाऱ्या नागरीकांना, परिसरातील दुकानदारांना याचा त्रास होत असल्याने याठिकाणी सिग्नल बसवणे आवश्यक आहे.

पथदीवे व स्ट्रीट लाईट दुरुस्ती आणि सिंग्नल यंत्रणे बाबत विचार करुन रिंगरोड वरील पाच नंबर चौक ते खाडगाव चौक तसेच पाच नंबर चौक ते संविधान चौक, शिवाजो चौक या मार्गावरील बंद असलेले पथदिवे, स्ट्रीट लाईट तात्काळ सुरु करावेत व बाभळगाव नाका, गरुड चौक याठिकाणी सिग्नल बसवणेबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशा सुचना लातूर शहर महानगरपालिका आयुक्तांना आमदार अमित देशमुख यांनी केल्या आहेत.

## ७ डिसेंबरपासून मैलार येथे खंडोबा यात्रेचे आयोजन

### विविध धार्मिक कार्यक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.५ डिसेंबर -**

कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिदर जिल्ह्यातील भालकी तालुक्यातील खानापुर येथील मल्हारी मार्तंड मल्लण्णा यात्रा महोत्सव सात डिसेंबर पासून सुरू होत असून दि.३ जानेवारी पर्यंत हा यात्रा महोत्सव चालणार आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.७ डिसेंबरला साडेनऊ वाजता मल्हारी आणि म्हाळसा यांच्या विवाहाने या यात्रेची औपचारिक सुरुवात होणार आहे. दि.१० डिसेंबरला रात्री साडेआठ वाजता पालखी महोत्सव आणि नंदीवरून प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात येईल. दि.१४ डिसेंबरला रात्री साडेआठ वाजता शोभायात्रा निघणार आहे. दि.१५ डिसेंबरला रात्री साडेआठ वाजता पालखी उत्सव, तसेच घोड्यावरून देवाच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. दि.२२ डिसेंबरला पालखी उत्सव निघणार असून हत्तीवरून देवाच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. दि.२९ डिसेंबरला देवाच्या मूर्तीची पालखी निघणार असून नंदी शोभायात्रा निघणार आहे. दि.३ जानेवारीला सकाळी ११ वाजता यात्रेचा समारोप होईल. या यात्रा महोत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मल्लांना मंदिर विश्वस्त समितीचे अध्यक्ष प्रकाश म्हेत्रे कार्यकारी अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी केली आहे.

जत्रा महोत्सव दि. ७ ते ३ जानेवारीपर्यंत भव्य पद्धतीने होणार आहे. दि ७ रोजी रात्री ९.३० वाजता मल्हारी आणि मलासकांते आणि भानू यांच्या विवाहाने या जत्रेची औपचारिक सुरुवात होईल. दि.१० रोजी रात्री ८.३० वाजता पालखी सोहळा व नंदीवर मूर्तीची मिरवणूक होईल. दि.१४ रोजी रात्री ८.३० वाजता मोराच्या मूर्तीची मिरवणूक, दि.१५ रोजी रात्री ८.३० वाजता पालखी उत्सव, घोड्यावरून देवाच्या मूर्तीची मिरवणूक, दि.२२ रोजी पालखी सोहळा, हत्तीवरून देवाच्या मूर्तीची मिरवणूक, दि.२९ रोजी पालखी सोहळा, नंदीवरील देवाच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. दि.३ रोजी सकाळी ११ वाजता जत्रा महोत्सवाचा समारोप होईल.

## आलमलातील फार्मसी महाविद्यालयात एड्स जनजागरण रॅलीचे आयोजन

### शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसीचा संयुक्त सहभाग...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.५ डिसेंबर -**

जागतिक एड्स दिन निमित्त औसा येथे तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी व ग्रामिण रुग्णालय, औसा यांच्या संयुक्त विद्यमाने औसा येथे एड्स जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९ वा. रॅलीचा प्रारंभ शहरातील पोलिस स्टेशन पासून करण्यात आला. तालुका आरोग्य अधिकारी डॉ.आर.एस. देवणीकर यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन करण्यात आले.

औसा ग्रामिण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुनीता पाटील, पोलिस निरीक्षक संदिप आन्नेबोईनवाड, संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, संगमेश्वर ठेसे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास कापसे व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सचिन हंगरगेकर यांच्या शुभहस्ते हिरवा झेंडा दाखवुन रलीची सुरुवात करण्यात आली.

औसा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. भरत थडकर, डॉ. संजय मस्के, प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुशेन पाटील, समुपदेशक सिंधु जाधव, प्रमिला शिंदे, महाविद्यालयातील प्रा. विकास मुगळे, डॉ. अक्षय भांबरे, डॉ. रामेश्वर धानुरे, डॉ. वनिता वडीवाले, गिरीशंकर भावले, प्रियंका बंडगर यावेळी उपस्थित होते.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाटय, संदेश फलक व घोषणांनी शहरवासींयाचे लक्ष वेधून घेतले. रॅलीद्वारे एड्स विषयी नागरीकांच्या मनात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शहर प्रदिक्षिणेनंतर रलीचा समारोप औसा येथील ग्रामीण रुग्णालयाच्या प्रांगणात करण्यात आला.




तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर म्हणाले, एड्स सारख्या विविध रोगाबद्दल ग्रामीण भागात व असुशिक्षित लोकांकरीता मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. संस्थेच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात रक्तदान शिबीरे, मोफत आरोग्य तपासणी शिबीरे, शालेय विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी, तुळजापुरला पायी चालत जाणाऱ्या भक्तांची दरवर्षी मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार असे उपक्रम सामाजीक बांधिलकीच्या जाणीवेतून राबविले जातात असे ते म्हणाले. वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुनिता पाटील म्हणाल्या, एड्स होणार नाही याकरीता व झाल्यानंतर कोणते उपाय करावेत. तसेच त्याची लक्षणे, वयोगटानुसार त्याचे प्रमाण किती आहे.

याबाबत माहिती दिली. सर्वांनी याची अचूक माहिती ग्रामीण भागातील, अशिक्षित लोकांपर्यत पोहचवण्याचे कार्य करावे. असे आवाहन त्यांनी उपस्थितांना यावेळी केले. प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे यांनी एड्स विषयी विध्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. एड्स विषयी जनजागरण मोहीम राबविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची, समाजात प्रत्येकाची असल्याचे सांगितले व सहकार्याबद्दल ग्रामीण रुग्णालय औसा यांचे आभार मानले. सानिका चव्हाण या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, औसा ग्रामिण रुग्णालयाचे सर्व कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.